CMYK

# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, २७ जुलै २०२५। युगाब्द ५१२७। वर्ष ४१ वे अंक २५८ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



देशाच्या पुनरुत्थानासाठी काही गोष्टी आवश्यक आहेत. मग सगळे लोक त्या उद्देशाने एकत्र येऊ शकतील, पण तिथे राजकारणाचा प्रवेश व्हायला नको. जर राजकारण आले तर मग त्याला वेगळा रंग येतो. संघटना उभी करण्यासाठी महत्त्वाची गोष्ट हीच आहे की, राजकारणापासून दूर राहा.

– **एकनाथ रानडे**, रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# मुंबई-पुणे महामार्गावर भीषण अपघात

- बोरघाटात ब्रेक फेल झाल्याने कंटेनरची २५-३० वाहनांना धडक
- ४ जणांचा मृत्यू ३० जण जखमी



**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. २६ जुलै -**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर शनिवारी दुपारी खोपोली परिसरातील बोरघाटात एक अत्यंत भीषण अपघात झाला. ब्रेक फेल झालेल्या एका कंटेनरने २५ ते ३० हून अधिक वाहनांना जोरदार धडक दिली, ज्यामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. या अपघातात सुमारे ३० ते ३५ प्रवासी जखमी झाले असून, ४ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. मात्र, अद्याप पोलिसांनी अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सदरील अपघात खोपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीत, नवीन बोगदा ते फूडमॉल हॉटेल दरम्यान, मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर दुपारी घडला. ब्रेक फेल झालेल्या कंटेनरचा ताबा सुटल्याने, त्याने समोर असलेल्या एकामागोमाग एक अशा अनेक चारचाकी, खासगी आणि मालवाहू वाहनांना जोरदार धडक दिली. अपघातातील वाहनांचे प्रचंड नुकसान झाले असून, काही गाड्या अक्षरशः चक्काचूर झाल्या आहेत. वाहनांमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करण्यात बचाव पथकांना यश आले आहे. कंटेनरचे ब्रेक फेल झाल्याने अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलिस, महामार्ग सुरक्षा पथक आणि स्थानिक प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. ३० ते ३५ प्रवासी किरकोळ ते गंभीर स्वरूपाच्या दुखापतींनी जखमी झाले असून, त्यांना खोपोलीतील नगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी २० ते २२ जणांना पुढील उपचारासाठी इतर रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले आहे. परिसरातील ग्रामपंचायतींकडून अतिरिक्त रुग्णवाहिका मागवण्यात आल्या आहेत. या अपघातामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णतः ठप्प झाली आहे. वाहतूक पोलिस आणि महामार्ग प्राधिकरणाकडून वाहने बाजूला करण्याचे व वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. अपघातामुळे अनेक वाहनचालक रस्त्यावर अडकून पडले आहेत, त्यामुळे स्थानिक स्तरावर मदत व पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या खोपोली पोलिस आणि महामार्ग सुरक्षा विभाग अपघाताची तपासणी आणि पंचनामा करत असून, कंटेनर चालकाच्या वैद्यकीय तपासणीसह अपघाताच्या नेमक्या कारणांची चौकशी सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार ब्रेक फेल हे कारण असल्याचे समोर आले असले, तरी इतर कोणतेही तांत्रिक दोष आहेत का याचीही चौकशी केली जात आहे. दरम्यान, मुंबई- पुणे एक्स्प्रेस वेवर जानेवारी २०२१ ते जून २०२५ या कालावधीत तब्बल ५०० हून अधिक अपघात झाले आहेत. या अपघातांमध्ये ३०० हून अधिक प्रवाशांना जीव गमवावा लागला आहे.



आशिया चषक २०२५ : १४ आणि २१ सप्टेंबर रोजी

## भारत विरुद्ध पाकिस्तान सामना

**नवी दिल्ली :** आशिया कप २०२५ हा युएईमध्ये खेळला जाणार आहे. ही स्पर्धा ९ सप्टेंबर रोजी सुरू होईल आणि अंतिम सामना २८ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल. आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी ही माहिती दिली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) अध्यक्ष असलेले नक्वी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले आहे की, मला हे कळवताना आनंद होत आहे की एसीसी आशिया कप २०२५ आता अधिकृतपणे ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान यूएईमध्ये खेळला जाईल. वेळापत्रकाची संपूर्ण माहिती लवकरच शेअर केली जाईल.

# मुकरी सालारसह सहाजणांवर मोक्का

- सालार टोळीच्या मुसक्या आवळल्या
- पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांची तिसरी कारवाई



मुकरी सालार | जाफर शेटे | फैसल सालार | टिपू सालार | अनिस रंगरेज

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २६ जुलै -**

शहरातील विजापूर वेस परिसरातील सालार टोळीवर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी मोक्काअंतर्गत कारवाई केली आहे. त्यामुळे सराईत गुन्हेगार मुकरी सालारसह सहाजणांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांची चालू वर्षातील ही तिसरी कारवाई आहे.



फैसल अब्दुल रहीम सालार (रा. विजापूर वेस, मुल्लाबाब टेकडी, सोलापूर), जाफर महंमद युसूफ शेटे (रा. पेंटर चौक, सोलापूर), सईद उर्फ टिपू अब्दुल रहिम सालार (रा. विजापूर वेस, मुल्लाबाबा टेकडी, सोलापूर), ॲम्बुलन्स चालक अनिस अहमद उर्फ पापड्या रियाज रंगरेज (रा. विजापूर वेस, सोलापूर), अक्रम उर्फ पैलवान कय्युम सातखेड (रा. विजापूर वेस, मुल्लाबाबा टेकडी, सोलापूर) आणि वसीम उर्फ मुकरी अब्दुल रहीम सालार (रा. विजापूर वेस, सोलापूर) अशी मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.

सोहेल रमजान सय्यद यांनी हात उसने दिलेले पैसे परत मागितले असता २ जुलै रोजी दुपारी नई जिंदगी येथील मौलाना आझाद चौक येथे जाफर शेटे, टिपू सालार, फैसल सालार, पापड्या, अक्रम पैलवान व त्याच्या ३ ते ४ साथीदारांनी सय्यद यांना मारहाण केली. तसेच फैसल सालार याने मैं इधर का भाई हूं, कोई आगे आया तो उसे खल्लास कर दुंगा असे म्हणून चाकूच्या सहाय्याने धमकावले. त्यामुळे चौकात दहशत निर्माण झाल्याने नागरीक घाबरून पळू लागले व व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद करून घेतली. तर नागरीकांनीही घरे बंद करून घेतली. त्यानंतर फैसल सालार याने सय्यद यांच्या पोटात चाकू खुपसून त्यांच्या खूनाचा प्रयत्न केला असता सय्यद यांनी डावा हात आडवा घातल्याने डाव्या हाताला तो चाकू लागून गंभीर दुखापत झाली. त्यामुळे ते खाली पडले. त्यानंतर सर्व आरोपींनी तेथून पळ काढला. याबाबत सय्यद यांच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील निष्पन्न आरोपी फैसल सालार, जाफर शेटे, टिपू सालार, पापड्या, अक्रम पैलवान, मुकरी सालार यांनी सन २०१५-२०२५ या दहा वर्षाच्या काळात संघटित गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर केला असल्याचे दिसून आले. या टोळीवर ३ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांचे ७ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. हे सर्व गुन्हेगार हे एकाच टोळीचे सदस्य असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्याने पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी सालार टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम (मोक्का) चे कलम एमआयडीसी पोलिस ठाण्यातील गुन्ह्यात लावण्याचे आदेश दिले. एमआयडीसी पोलिस ठाण्यातील गुन्ह्यात मोक्काचे कलम वाढविण्यात आले आहे. तपास सहायक पोलिस आयुक्त राजन माने करीत आहेत.

# उद्धव ठाकरेंचे आमदार-खासदार भाजपच्या संपर्कात

- मंत्री गिरीश महाजन

**पंढरपूर, दि. २६ जुलै -**

उद्धव ठाकरेंचे अनेक खासदार, आमदार आणि पदाधिकारी भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी पंढरपुरात केला आहे. केवळ तांत्रिक कारणांमुळे ते ठाकरे गटात असल्याचेही गिरीश महाजन यांनी म्हटले आहे.

त्यांच्या या वक्तव्यामुळे उबाठाचे टेन्शन मात्र नक्कीच वाढणार आहे. तर हनी ट्रॅप विषय आपल्यासाठी संपला असल्याचेही महाजन यांनी स्पष्ट केले आहे. राज्यात एकीकडे मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची चर्चा सुरू असताना गिरीश महाजन यांनी केलेल्या खळबळजनक दाव्याने राज्यात पुन्हा राजकीय भूकंप होणार असल्याची चर्चा सुरू झाली असून, ठाकरे गट पुन्हा फुटीच्या उंबरठ्यावर आहे का, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मंत्री गरीश महाजन आज पंढरपूरच्या दौऱ्यावर आहेत. शनिवारी सकाळी महाजन यांनी विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना उपरोक्त दावा केला आहे.



काँग्रेससह सर्वच पक्षांचे लोक भाजपमध्ये यायला तयार आहेत. विशेषतः ठाकरे गटाचे अनेक आमदार आणि खासदार भाजपच्या संपर्कात आहेत. पण काही तांत्रिक कारणांमुळे ते अजूनही ठाकरे गटातच आहेत. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी ठाकरे गटातील अनेकजण भाजपात आल्याचे दिसतील, असे गिरीश महाजन यांनी म्हटले. राज्यातील मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चेबाबत गिरीश महाजन यांना विचारले असता, त्यांनी बोलताना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावरही जोरदार शब्दांत टीका केली. संजय राऊत हे सगळे मंत्रिमंडळ हटवायला बसले आहेत. त्यांना वाटत यांचे मंत्रिमंडळ जावे आणि आमचे मंत्रिमंडळ यावे. संजय राऊत यांना कोण विचारते? असा सवाल करत, खोटे बोलून रेटून न्यायचे हा राऊत यांचा धंदा झाला असल्याची टीका महाजन यांनी केली.

SINHGAD INSTITUTES

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

ACCREDITED WITH GRADE A NAAC

CGPA 3.15 / 4.00

एन बी नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग

केगांव - सोलापूर



प्रा. एम. एन. नवले

संस्थापक - अध्यक्ष

Approved by AICTE, New Delhi, Recongnised by DTE (M S) and Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

ENGINEERING ADMISSIONS

For First Year & Direct Second Year B. Tech. Programs in AY 2025-26

Applications are invited from eligible candidates for admissions under probable Vacant Seats against CAP & IL Quota

DTE CODE EN 6640

राष्ट्रीय स्तरावरील अनेक मानांकने प्राप्त महाविद्यालय

- सोलापूर विद्यापीठाकडून 'A++' ग्रेड प्राप्त महाविद्यालय (93.33%)
- नॅक कडून 'A' ग्रेड प्राप्त महाविद्यालय (CGPA 3.15/4)
- भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व AICTE कडून ARIIA मानांकन
- स्मार्ट इंडिया हॅकेथॉन (SIH) या राष्ट्रीय स्पर्धेत सलग 2 वर्ष ₹ 1 लाखाचे प्रथम पारितोषिक
- Intelliswift कंपनी तर्फे Innovate-2023 स्पर्धेत प्रथम पारितोषिक
- उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार 2024
- उत्कृष्ट कॉलेज पुरस्कार 2023
- उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार 2023
- भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व Innovation Cell कडून 5 पैकी 4.5 स्टार मानांकन

Think Placement... Think Sinhgad

13.5 लाखांचे सर्वाधिक पॅकेज
52 विद्यार्थ्यांना 6 लाखांचे पॅकेज
283 विद्यार्थ्यांना 4 लाखांचे पॅकेज
275 विद्यार्थ्यांना 3 लाखांचे पॅकेज
4.5 लाखांचे सरासरी पॅकेज
96 विद्यार्थ्यांचे Cognizent मध्ये प्लेसमेंट
91 विद्यार्थ्यांचे Capgemini मध्ये प्लेसमेंट
68 विद्यार्थ्यांचे TCS मध्ये प्लेसमेंट
64 विद्यार्थ्यांचे Accenture मध्ये प्लेसमेंट
46 विद्यार्थ्यांचे Wipro मध्ये प्लेसमेंट
46 विद्यार्थ्यांचे UMS मध्ये प्लेसमेंट
35 विद्यार्थ्यांचे Infosys मध्ये प्लेसमेंट
15 विद्यार्थ्यांचे Vodafone Idea Ltd. मध्ये प्लेसमेंट
08 विद्यार्थ्यांचे Tata Auto Comp. मध्ये प्लेसमेंट
06 विद्यार्थ्यांचे Bharat Forge मध्ये प्लेसमेंट
06 विद्यार्थ्यांचे Ultratech मध्ये प्लेसमेंट

अभियांत्रिकीच्या उज्ज्वल करिअर साठी संधीचे प्रवेशद्वार "सिंहगड सोलापूर"

| Sr.No. | Name of the Course | Program Code | Intake |
|---|---|---|---|
| 1 | B.Tech. (Civil Engineering) | 664019110 | 60 |
| 2 | B.Tech. (Computer Science & Engg) | 664024210 | 60 |
| 3 | B.Tech. (Electrical Engineering) | 664029310 | 60 |
| 4 | B.Tech. (E & TC Engineering) | 664037210 | 60 |
| 5 | B.Tech. (Mechanical Engineering) | 664061210 | 120 |
| 6 | M.Tech. (Civil Engineering-Structural) | 664021210 | 18 |

NEP नुसार AI-DS, EV या सारख्या विषयात Minor Degree घेण्याची संधी...

विविध सेंटर्सवर मोफत ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय उपलब्ध.

Contacts for Admission : 9552529260, 8380025624, 9730393182, 9767107149, 8380025688

इन्शुरन्ससुद्धा, सेविंगससुद्धा




माझा नियमित प्रीमियम प्लॅन!

सादर आहे LIC ची

नव जीवन श्री

युआयएन: 512N387V01

प्लॅन नं.: 912

नियमित प्रीमियम पेमेंट प्लॅन

आमच्या ध्येयप्राप्तीसाठी एकमेव उपाय.

- देय गॅरंटीड ॲडिशन्स – टॅब्युलर वार्षिक प्रीमियम (करांशिवाय) च्या प्रमाणात.
- मर्यादित प्रीमियम पेमेंट अवधि.
- 6/8/10/12 वर्षांच्या आकर्षक प्रीमियम पेमेंट अवधि.
- पॉलिसी कालावधी पर्याय: 10 ते 20 वर्ष.

प्लॅन ऑनलाईन देखील उपलब्ध आहे

(एक नॉन–पार, नॉन–लिंक्ड, जीवन, व्यक्तिगत, बचत योजना)

LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

LIC/R1/2025 - 26/09/Mar

LIC मोबाइल ॲप डाउनलोड करा LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827

आमचा व्हॉट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'

अधिक माहितीसाठी तुमचे विमा एजंट/तुमच्या नजीकच्या एलआयसी शाखेबरोबर संपर्क साधा/www.licindia.in वर जा

आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसींची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियमची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी.

कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### बिहार विधानसभा निवडणुकीसाठी स्क्रिनिंग कमिटीमध्ये खा. प्रणिती शिंदे यांची निवड

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

आगामी बिहार विधानसभा निवडणुकांसाठी काँग्रेसची स्क्रीनिंग कमिटी (उमेदवार छाननी समिती) जाहीर करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष अजय माकन असतील तर सदस्य म्हणून सोलापूरच्या खा. प्रणिती शिंदे, इमरान प्रतापगढी आणि कुणाल चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीसोबत काही पदसिद्ध सदस्यांचीही नावे समाविष्ट आहेत. त्यामध्ये कृष्णा अल्लावरू (बिहार प्रभारी), राजेश कुमार (प्रदेशाध्यक्ष), डॉ. शकील अहमद खान (विधानसभा सीएलपी नेते) आणि डॉ. मदन मोहन झा (विधान परिषद सीएलपी नेते), देवेंद्र यादव, शाहनवाज आलम आणि सुशील कुमार पासी (एआयसीसी सचिव) हे या समितीचे सदस्य असतील, अशी माहिती काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या शिफारसीनुसार काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्य असलेल्या खा. प्रणिती शिंदे यांची बिहार विधानसभा निवडणुकीसाठी स्क्रिनिंग कमिटीमध्ये नियुक्ती केली आहे. या माध्यमातून एक महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. खा. प्रणिती शिंदे यांच्यावर पक्ष नेतृत्वाने यापूर्वी कर्नाटक आणि तेलंगणा विधानसभा निवडणुकांमध्येही जबाबदारी सोपवली होती. ती त्यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने पार पाडली. तसेच गुजरात विधानसभा निवडणुकीतही त्यांना वलसाड जिल्ह्याचे निरीक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली असून तेथेही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. याच अनुभवाच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने बिहार विधानसभा निवडणुकीसाठी स्थापना केलेल्या स्क्रिनिंग कमिटीत (उमेदवार छाननी समिती) सोलापूरच्या खा. प्रणिती शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.



### सोनामाता नगरातून साडेतीन लाखांचा ऐवज लंपास

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

विजापूर रस्त्यावरील नवीन आरटीओ ऑफिसजवळील सोनामाता नगरात चोरट्याने घरफोडी करून साडेतीन लाखांचा मुद्देमाल लंपास केला आहे. याबाबत नाथू बाबू पवार (वय ४५, रा. सोनामाता नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जानेवारी २०२५ रोजी रात्री आठ ते १३ मार्च २०२५ रोजी सकाळी दहाच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या घरातील किचन मधील लोखंडी कपाटातून सोन्याचे विविध दागिने लंपास केले आहेत. यामध्ये ९६ हजार रुपयांचे दीड तोळ्याचे सोन्याचे लाकेट, १६ ग्रॅमचे सोन्याचे गंठण, साडेबारा ग्रामचे ७५ हजारांची सोन्याचे जीरामणी माळ, आठ ग्रॅमची ४८ हजारांची सोन्याची बोरमाळ, ४२ हजारांची सात ग्रमची सोन्याची ठुशी असे एकूण तीन लाख ५७ हजारांचे सोन्याचे दागिने चोरीस गेले आहेत. चोरीची बाब निदर्शनास आल्यानंतर पवार यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार परदेशी हे करीत आहेत.



### रेल्वे स्थानक परिसरात भरदिवसा लुटले सव्वा लाखाचे दागिने

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

येथील रेल्वे स्थानक परिसरातील रिक्षा थांब्याजवळ थांबलेल्या कर्नाटकातील बंगळुरू येथील वृद्ध महिलेच्या गळ्यातील सव्वा लाखाचे दागिने लुटून नेल्याची घटना घडली आहे. चोरटे स्पोर्ट्स बाईकवरून आलेले होते. याबाबत मीरा एस शिवाजी उबाळे (वय ६३, रा. फर्स्ट मेन थर्ड क्रास, विद्यारण्यापुरा, बंगळुरु, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन अनोळखी चोरट्यांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी उबाळे या रेल्वे स्थानकासमोरील रिक्षा थांब्याजवळ आल्या होत्या . त्यावेळी स्पोर्ट्स बाईकवरून दोन चोरटे तेथे आले. त्यातील पाठीमागे बसलेल्या चोरट्याने फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याचे पाच तोळ्याचे मंगळसूत्र हिसका मारून ते दोघे चोरटे भरधाव वेगाने मोटारसायकल वरून निघून गेले. त्यानंतर फिर्यादीने सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक सागर काटे हे करीत आहेत.




# पंढरीत कॉरिडॉरला वाढता विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ जुलै -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीमप्रोजक्ट असलेल्या पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पास शहरातील संभाव्य बाधित मालमत्ताधारक नागरिकांकडून तीव्र विरोध केला जात आहे. संभाव्य बाधित मंडळींनी शनिवारी दुपारी अनोखे आंदोलन करीत कॉरिडॉरचा नकाशा, बाधित मंडळींना चर्चेसाठी प्रशासनाकडून काढण्यात आलेल्या नोटीसा आणि विठ्ठल मंदिरासाठी खास राज्य शासनाकडून करण्यात आलेला १९७३ सालचा अन्यायकारक मंदिर कायदा ( टेम्पल अँक्ट ) चंद्रभागा नदीच्या पाण्यात विसर्जित करुन शासनाचा निषेध केला. यावेळी संभाव्य बाधित मालमत्ताधारक मंडळींकडून एकच जिद्द कॉरिडॉर रद्द, कोण म्हणतंय कॉरिडॉर रद्द होत नाही, आम्ही रद्द केल्या शिवाय रहात नाही या बरोबरच शासनाच्या ताब्यातून मंदिरे मुक्त करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

यावेळी पश्चिमद्वार व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बाबाराव महाजन बडवे यांनी शासनाच्या अजब धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त केला. ते म्हणाले, सातत्याने मंदिर परिसरातील स्थानिक लोकांवर अन्याय होत आहे, आमच्यावर आत्तापर्यंत तीन आघात झाले आहेत, त्यातला पहिला आघात म्हणजे, १९७३ साली टेम्पल अँक्ट करून बडवे, उत्पात तसेच इतर सेवाधारी मंडळींना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातून बाहेर काढले, यानंतर दुसरा आघात म्हणजे १९८२ ते १९८४ या दरम्यानच्या काळात खास करुन मंदिर परिसरात मास्टर प्लॅन आणून शेकडो लोकांना बेघर करण्यात आले. त्यांना अद्यापही जागा, नुकसानभरपाई मिळाली नाही आणि तिसरा आघात म्हणजे हा नव्याने उरावर येऊ घातलेला कॉरिडॉर प्रकल्प. ज्यात मंदिर परिसरातील हजारो घरे, दुकाने बेचिराख करण्यात येणार आहेत.

दर पाच वर्षांनी पंढरपूर येथे मास्टर प्लॅन करण्यात येत असून त्यामुळे मंदिर परिसरातील लोकांना सतत टेन्शन असते. यामुळे अनेक लोक तणावा खाली येवून मृत्युमुखी पडत आहेत. कालच कॉरिडॉरच्या टेन्शन मुळे मंदिर परिसरातील बाळासाहेब काशिद यांची आई हृदयविकाराने मरण पावली. सात लोक आत्तापर्यंत मरण पावले आहेत. युवक व्यसनाधीन होत आहेत, अनेकांची झोप उडाली आहे असेही महाजन बडवे यांनी सांगितले. अभी नही तो कभी नही, कॉरिडॉर रद्द करा या घोषणा दिल्या.

यावेळी बाबा महाजन बडवे, प्रशांत बडवे, चैतन्य उत्पात, श्रीकांत हरिदास, रामकृष्ण महाराज वीर, गणेश लंके, डॉ. प्राजक्ता बेणारे, विवेक बडवे, संजय जव्हेरी, मुकुंद बडवे, योगेश बैरागी, सुरज उबाळे, व्यंकटेश कुलकर्णी, गोविंद बडोदकर, विवेक जव्हेरी, कपिल देशपांडे, कैवल्य उत्पात आदी उपस्थित होते.






#### शासनासमोर आव्हान

दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शक्तीपीठ महामार्गाच्या प्रकल्पाला एकीकडे शेतकऱ्यांचा वाढता विरोध होतो आहे. त्यातच आता भरीसभर म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीमप्रोजक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर कॉरिडॉरला देखील संभाव्य बाधित मालमत्ताधारक मंडळींकडून विरोध होत असल्याने हे दोन्ही प्रकल्प राबविण्या विषयी राज्य शासनापुढे आता मोठे आव्हान निर्माण होत असल्याचे दिसत आहे.

#### शासन, प्रशासना विरुध्द स्थानिक नागरिकांचा सामना

प्रशासनाचा कॉरिडॉर बाबत कामाचा वेग वाढला असून त्याच बरोबर आंदोलक सक्रिय झाले असून कॉरिडॉरला तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे. तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने पुढेही विविध आंदोलने करण्याचा इशारा देण्यात आला असून त्यामुळे एकीकडे शासन आणि प्रशासन विरुद्ध दुसरीकडे कोणत्याही नेत्यांविना केवळ स्थानिक नागरिक असा सामना निर्माण पहायला मिळतो आहे.

#### सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांचे बिल्कुल पाठबळ नाही

येथील राजकीयदृष्ट्या बलशाली असलेले स्थानिक नेते हे भाजप या सत्ताधारी पक्षाचे असल्याने त्यांच्याकडून बिल्कुलच राजकीय पाठबळ मिळत नाही. तसेच अन्य पक्षांचे नेते देखील कॉरिडॉर विषयी मुळ गिळून गप्प असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे अन्यायाची भावना निर्माण होऊन संभाव्य कॉरिडॉरबाधित मालमत्ताधारक आंदोलक अधिक आक्रमक होताना दिसत आहेत.

#### प्रशासनाकडून नोटीसा पाठविणे व बैठकांचे सत्र सुरुच

प्रशासनाकडून कॉरिडॉर प्रकल्प राबविण्याच्या हालचालींना गती आलेली आहे. त्याचाच भाग म्हणून २५ जुलै ते ५ आगस्ट या काळात संभाव्य बाधित मंडळींशी चर्चेसाठी तीन उपजिल्हाधिकारी दर्जाच्या आधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. २५ जुलै रोजी २५ नागरिकांचा एक ग्रुप अशा पध्दतीने एका दिवसात तीन ग्रुपशी यासाठी नियुक्त केलेल्या आधिकाऱ्यांनी चर्चा केली. शनिवारी (ता. २६ जुलै) देखील चर्चेसाठी संभाव्य बाधित मंडळींना आमंत्रित करण्यात आलेले होते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कॉरिडॉर प्रकल्प व त्या सोबतच शहर विकास आराखडा अर्थात (डीपी.प्लॅंन ) एकत्रित राबविण्यावर शासन,प्रशासन ठाम असल्याचे दिसत आहे. त्यादृष्टीनेच प्रशासनाकडून अत्यंत शांतपणे आपले काम चोखरित्या पार पाडले जात असून एक, एक स्टेप कायदेशीर रित्या अत्यंत सावधपणे पार केली जात आहे.

## श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात गळती; पुरातत्त्व विभागास दिले पत्र

**त्रयस्थ शासकीय संस्थेमार्फत ऑडिटबाबत जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२६ जुलै-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्धाराची कामे शासन निधीतून पुरातत्व विभागामार्फत १६ डिसेंबर २०२३ पासून सुरू करण्यात आली आहेत. सदर कामाचे पर्यवेक्षण करून गुणवत्तापूर्ण कामे पुरातत्व विभागामार्फत करून घेण्यात येत आहेत. तथापि, दिनांक २२ व २६ जुलै रोजी मंदिरात मुसळधार पाऊसाने गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पुरातत्व विभागास दि.२२ व २६जुलै रोजी पत्रव्यवहार करून कळविण्यात आले आहे.

सदर जतन व संवर्धन काम ासंदर्भात मंदिर समितीच्या वेळोवेळी झालेल्या सभेमध्ये आढावा घेण्यात येत आहे व तशा सुचना पुरातत्व विभाग व कंत्राटदार यांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय, यंदा पावसाळा लवकर सुरू झाल्याने वॉटरप्रुफींगची कामे वेळेत पूर्ण करता आली नाहीत, असे पुरातत्त्व विभागाने कळवले आहे. परंतु, गळती होऊ नये म्हणून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात आलेल्या आहेत. आराखड्यातील सर्व कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण व्हावीत व आतापर्यंत झालेल्या कामाचे त्रयस्थ शासकीय संस्थेकडून ऑडीट करणेबाबत मा जिल्हाधिकारी सोलापूर यांना प्रस्ताव देण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## वेणेगांवजवळ ट्रेलरची दुचाकींना धडक; दोन जागीच ठार

**सोलापूर-पुणे महामार्गावर अपघात**

**टेंभुर्णी,दि.२६ जुलै-**

आडव्या आलेल्या बोलोरो गाडीला वाचवताना कंटेनरने साईडने जाणाऱ्या दोन दुचाकीस चिरडले. या तिहेरी भीषण अपघातात दुचाकीवरील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून हा अपघात सोलापूर-पुणे महामार्गावर वेणेगांव (ता.माढा) येथील ब्रिजजवळ शनिवारी २६ जुलै रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान झाला.

याबाबत टेंभुर्णी पोलीसांच्या माहितीनुसार कंटेनर (के.ए-३४-डी २९७६) हा पुण्याहून सोलापूरकडे निघाला होता. तो वेणेगांव ब्रिजजवळ आला असता ब्रिज खालून उजव्या बाजूने पंढरपूरकडून अचानक बोलोरो गाडी आली. या सोलापूरकडे जाणाऱ्या भरधाव गाडी (एम.एच-३० ए.एफ-९६२१) वाचवण्यासाठी ट्रेलर चालकाने त्याचा कंटेनेर ट्रेलर रस्त्याच्या बाजूला घेत असताना पावसाची रिमझिम चालू असल्याने ब्रेक दाबूनही जास्त लोड असल्याने तो साईडपट्टीच्या दिशेने वळला कंटनेर ट्रेलरने (एमएच- १२-इके ९७७६) या दुचाकीवरील तानाजी तुकाराम खंडाळे (वय.७०) रा.सापटणे (टें) ता.माढा यांना व दुचाकी (एमएच ४५-एजे-०४७६) वरील सुखराम राधाकृष्ण जांगीड (वय-५०) रा.सारंडा ता.मेडतासिटी,जि. नागुर,(राजस्थान) या दोन दुचाकी स्वरांना पाठीमागून जोरदार धडक देऊन चिरडले.हा अपघात एवढा भीषण होता की, या अपघातात एका दुचाकी चालकांच्या अंगावरुन ट्रेलरची चाके गेल्यामुळे तसेच ट्रेलरने त्यांना तसेच काही अंतर फरफटत रस्त्याच्या बाजूला नेल्यामुळे दोन्ही दुचाकी स्वरांचा जागीच चिरडून मृत्यू झाला. अपघाताचा टेंभुर्णी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे.

## समृद्धी कला मंच अध्यक्षपदी चव्हाण, सावंत प्रमुख कार्यवाह

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

समृद्धी कला मंचची सन २०२५-२६ ची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी कृष्णकांत चव्हाण तर प्रमुख कार्यवाह संजय सावंत यांची निवड करण्यात आली

समृद्धी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ संचलित समृद्धी कला मंचची या कार्यकारिणी बैठक चंद्रकांत होळकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तसेच नाट्य सेवेतील कार्याबद्दल सुमित फुलमामडी व किरण लोंढे यांना समृद्धी नाट्य सेवा पुरस्कार २०२५ मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. सूत्रसंचालन पुंडलिक कलखांबकर यांनी केले. डॉ. माधुरी भोसले यांनी आभार मानले.



अन्य पदाधिकारी असे : उपाध्यक्ष : मल्हारी बनसोडे (प्रशासन), सुमित फुलमामडी, किरण लोंढे (उपक्रम), सहकार्यवाह हरालाल धुळम (प्रशासन), पुंडलिक कलखांबकर व श्रीमंत कोळी (उपक्रम). कार्यकारिणी सदस्य: मल्लिनाथ निंबर्गी, रेणुका बुधाराम, डॉ. माधुरी भोसले, अर्चना कलखांबकर,मल्लिकार्जुन सोमेश्वर, जितेश कुलकर्णी, अनिल खरटमल,बालाजी चव्हाण. विशेष निमंत्रित: गोवर्धन कमटम, प्रशांत बडवे, बसवराज मठपती, अरविंद मोटे. सल्लागार: चंद्रकांत होळकर व रमेश बसाटे.

## विनयभंग करून जखमी केल्याप्रकरणी लोणार येथील तिघांविरूध्द गुन्हा

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. २६ जुलै**

तु माझे आईसोबत भांडण करते काय असे म्हणून अश्लिल भाषेत शिवीगाळ करून एका ४० वर्षीय महिलेचा ब्लाऊज फाडून तीच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य करून फरशीचा तुकडा मारुन जखमी केल्याप्रकरणी सुनिल जावीर,शशिकला जावीर,राधिका जावीर सर्व रा.लोणार या तीघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील ४० वर्षीय फिर्यादी महिला दि.२३ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वा. फिर्यादीची बहिण तंग्याव्वा जावीर व शशिकला जावीर यांचेत झालेला वाद मिटवून घरी जात असताना लोणार येथील लक्ष्मीआई मंदिराजवळ फिर्यादी आली असता वरील आरोपीने तु माझे आईसोबत भांडण करते काय,असे म्हणून अशलिल भाषेत शिवीगाळ करून पिडीतेचा हात धरून ब्लाऊज फाडून आरोपीने मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून पडलेला फरशीचा तुकडा हातात घेवून पाठीत मारून गंभीर जखमी करून पिडीतेस दमदाटी केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलिस हवालदार कोष्टी हे करीत आहेत.

## वस्त्रोद्योगात सौर ऊर्जेसाठी समिती स्थापन करावी

**मुख्यमंत्री फडणवीस यांचे अधिकाऱ्यांना निर्देश**

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ जुलै :**

सामाजिक न्याय, आदिवासी विकास आणि इतर बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या नवीन सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत एकसमान निकष ठरवावे. या विभागांतर्गत असणाऱ्या सूतगिरण्यांसाठी त्या त्या विभागाने अतिरिक्त तरतूद करून द्यावी. तसेच वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरामध्ये येत असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी वस्त्रोद्योग आणि ऊर्जा विभागाची समिती स्थापन करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वस्त्रोद्योग विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, विधान परिषदेचे आमदार अमरीश पटेल, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने, रेशीम संचालनालयाचे संचालक विनय मुन आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सहकारी सूतगिरण्यांना प्रति चाती रुपये पाच हजार प्रमाणे द्यावयाच्या कर्जावरील व्याज अनुदान योजनेस मुदतवाढ देताना यामध्ये आधुनिकीकरण आणि श्रेणीकरण करण्यात यावी. राज्यामधील राष्ट्रीय वस्त्र महामंडळाच्या अंतर्गत बंद असलेल्या मिल पुन्हा सुरू करण्याबाबत अहवाल तयार करावा. त्या आधारे बंद मिल पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

नवीन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ निर्माण करणे, वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलीनीकरण करून वस्त्रोद्योग व रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करणे, सहकारी सूतगिरण्यांकडील अतिरिक्त जमीन विक्रीस परवानगी देण्याबाबतची योजना, सूतगिरण्यांना पुनर्वसन कर्ज देण्यासाठी नवीन योजना तसेच सूतगिरण्या भाडेपट्टीवर देण्यासाठी योजना तयार करणे, सहकारी सूतगिरणी यांची प्रकल्प अहवाल किंमत ८०.९० कोटी वरून ११८ कोटी इतकी सुधारित करण्याबाबतची कार्यवाही करणे, सातारा जिल्ह्यातील वाई येथील रेड क्रॉस सोसायटी यांच्याकडील लिजवरील जागा जिल्हा रेशीम कार्यालयाकरिता कायमस्वरूपी घेणे आदी विषयांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

## हृदयस्पर्शी गायनाने रसिक सुखावले

**हिराचंद नेमचंद वाचनालयात सांगीतिक कार्यक्रम**

**उस्ताद झाकीर हुसेन यांना आदरांजली**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

तबल्याचे सुखावणारे बोल आणि पखवाजचा घुमावदार नाद तसेच किराणा घराण्याचे वैशिष्ट्य दर्शविणाऱ्या हृदयस्पर्शी गायनाने सोलापूरकर सुखावले.

हिराचंद नेमचंद वाचनालय आणि श्रीराम पुजारी प्रतिष्ठानतर्फे आज (दि. २६) किर्लोस्कर सभागृहात सांगीतिक कार्यक्रम झाला. उस्ताद झाकीर हुसेन यांना आदरांजली वाहण्यासाठी पखवाज आणि तबला वादनाची जुगलबंदी झाली. सुखद मुंडे (पखवाज) आणि यशवंत वैष्णव (तबला) यांनी पेशकार, तालविस्तार, ठेकाविस्तार, प्रस्तार, कायदे, तुकडे, मुखडे यांच्यासह पखवाज व तबला वादनातील चक्करदारची पेशकश सादर केली. यशवंत वैष्णव यांनी सादर केलेली योगेश समसी यांची रचना तसेच पखवाज वादनाचे वैशिष्ट्य दर्शविणारे वादन रसिकांना विशेष भावले. लहेरा साथ अभिषेक शिनकर यांची होती. तीन युवा प्रतिभावान कलाकारांच्या सादरीकरणाला रसिकांनी उभे राहून मानवंदना दिली.



कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात किराणा घराण्याचे सुप्रसिद्ध गायक पंडित कैवल्यकुमार गुरव (धारवाड) यांचे शास्त्रीय गायन रंगले. त्यांनी मैफलीची सुरुवात राग श्यामकल्याणमधील 'सखी मोरा मन लागेना' या बंदिशीने केली. प्रियतमाशिवाय मन लागत नाही त्यामुळे झालेला विरह दर्शविताना पंडित गुरव यांनी भावस्पर्शी गायन सादर केले. त्यानंतर राग मल्हारमधील 'घुमड घुमड आए' तसेच पंडित कुमार गंधर्व यांची 'पिहरवा अजहून आए' ही रचना सादर केली. खास सोलापूकरांसाठी पंडित गुरव यांनी विठ्ठल नामाचा जयघोष करीत 'आले वारकरी पंढरीसी' ही भक्तिरचना सादर करून भावपूर्ण वातावरणाची निर्मिती केली. 'आयी देखो भोर भयी' या भैरवीने त्यांनी मैफलीची सांगता केली. उत्तम दमसास, सप्तकात सहज फिरत असलेला आवाज, त्याला रसिकांची मिळालेली उत्स्फूर्त दाद यातून मैफल उत्तरोत्तर रंगत गेली. मयंक बेडेकर (तबला), अभिषेक शिनकर (संवादिनी), वज्रकाय कदम, सचिन जाधव, वैष्णवी बरकते (तानपुरा, सहगायन) यांनी साथ केली.

डॉ. नवनीत तोष्णिवाल, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. किरण जोशी, डॉ. विद्याधर बोराडे यांनी कलाकारांचा सत्कार केला. यास रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# थायलंड-कंबोडिया संघर्षात ३६ ठार

## ९० नागरिक जखमी ● ड्रोन, क्षेपणास्त्रांनी हल्ले ● अमेरिका-चीनची मध्यस्थी नाकारली

◆ **बँकॉक, २६ जुलै**

थायलंड आणि कंबोडियामध्ये सीमावाद आणि दोन शिवमंदिरांवरून सुरू असलेला संघर्ष तिसऱ्या दिवशी शिगेला पोहोचला. दोन्ही देशांनी हल्ल्यासाठी शनिवारी ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा वापर केला. यात कंबोडियाचे १६ तर थायलंडचे २० असे एकूण ३६ नागरिक ठार झाले. या हल्ल्यात १२ सैनिकांचा मृत्यू झाला असून ९० पेक्षा अधिक जण जखमी आहेत. दोन्ही देशांत मध्यस्थी करण्याचा अमेरिका आणि चीनने दिलेला प्रस्ताव शनिवारी थायलंडने फेटाळून लावला आहे. संघर्षात तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप स्वीकारणार नसल्याचे हंगामी पंतप्रधान फुमथम वेचायचाई यांनी स्पष्ट केले.

कंबोडियाच्या संरक्षण मंत्रालयाने शनिवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, थायलंडने देशाच्या सीमावर्ती भागात ड्रोन आणि क्षेपणास्त्राने हल्ले केले, यात सहा सैनिकांसह १६ जण ठार झाले आणि ७१ जखमी आहे. या हल्ल्यात अनेक इमारती आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आहे.

दुसरीकडे थायलंडच्या लष्कराने निवेदनात सांगितले की, कंबोडियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात २० जणांचाही मृत्यू झाला यात १४ नागरिक आणि ६ सैनिकांचा समावेश आहे, तर २० पेक्षा अधिक जण जखमी आहे. सीमावर्ती भागातून दोन लाखांपेक्षा अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. कंबोडियाने ग्रॅड क्षेपणास्त्रे डागल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान थायलंडचे हंगामी पंतप्रधान फुमथम वेचायचाई यांनी सीमावर्ती भागातील ८ जिल्ह्यांमध्ये मार्शल लॉ लागू करण्याची घोषणा केली. ◂(वृत्तसंस्था)


हल्ल्यात ठार झालेल्या नागरिकाचा मृतदेह घेवून जाताना थायलंडचे सैनिक

### दोन्ही देश चर्चेसाठी तयार

दोन्ही देशातील युद्धसदृश्य परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर संयुक्त राष्ट्र संघाने आपत्कालीन बैठक घेतली. यावेळी कंबोडियाचे राजदूत म्हणाले, आम्हाला शांतता हवी आहे आणि संवादाद्वारे तोडगा काढायचा आहे, तर थायलंडच्या राजदूताने सांगितले की आम्हालादेखील युद्ध नको आहे, आम्ही चर्चेसाठी तयार आहोत. कंबोडियाला हवे असेल तर आम्ही मलेशियाच्या मदतीने चर्चा करण्यास तयार आहोत. त्याचवेळी त्यांनी या संघर्षात अमेरिका आणि चीनची मध्यस्थी नाकारली. ■

# खात्यात पैसे नसले तरी नॉमिनीला आता थेट ५०,००० मिळणार

### ईपीएफओच्या नियमात बदल

◆ **नवी दिल्ली, २६ जुलै**

जर एखाद्या कर्मचाऱ्याचा नोकरीदरम्यान मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबाला किमान ५०,००० चा विमा लाभ निश्चितपणे मिळेल, असे केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने कर्मचारी ठेवीशी संलग्न विमा योजनेत अत्यंत महत्त्वाचे बदल केले आहेत. या बदलांमुळे आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही कठोर अटी राहणार नाहीत. त्याचा थेट फायदा लाखो कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना होणार आहे.

पूर्वी या लाभासाठी कर्मचाऱ्याच्या पीएफ खात्यात किमान ५०,००० जमा असणे आवश्यक होते. आता ही अट काढून टाकण्यात आली आहे. याचा अर्थ, खात्यात कमी रक्कम असली तरी, कुटुंबाला किमान विमा रक्कम मिळेलच.

**६० दिवसांच्या अंतराला ब्रेक मानले जाणार नाही**

नियमांमध्ये आणखी एक मोठा बदल करण्यात आला आहे. जर एखाद्या कर्मचाऱ्याला दोन कामांमध्ये जास्तीत जास्त ६० दिवसांचा ब्रेक असेल, तर तो नोकरीतील व्यत्यय मानला जाणार नाही. याचा अर्थ, ६० दिवसांपर्यंतच्या अंतराचा १२ महिन्यांच्या सतत सेवेच्या मोजणीवर कोणताही परिणाम होणार नाही. यामुळे अशा कर्मचाऱ्यांना फायदा होईल ज्यांनी वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम केले आहे, परंतु त्यांना नोकरी बदलताना थोडा ब्रेक मिळाला आहे.

**मृत्यूनंतरही सहा महिन्यांपर्यंत लाभ**

नवीन नियमांनुसार, जर एखाद्या कर्मचाऱ्याचा शेवटचा पगार मिळाल्यापासून ६ महिन्यांच्या आत मृत्यू झाला, तर त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीलासुद्धा योजनेचा विमा लाभ मिळेल. म्हणजेच, पगारातून पीएफ कपात झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत मृत्यू झाला तरीही नॉमिनीला विम्याचा लाभ मिळू शकेल. ◂(वृत्तसंस्था)

# बालाकोटमध्ये पराक्रम, बायकोपुढे झाला हतबल

## भांडण आपसात मिटविण्याचा सुप्रीम कोर्टाचा सल्ला

◆ **नवी दिल्ली, २६ जुलै**

भारतीय हवाई दलातील वैमानिक आणि त्याची पत्नी यांच्यातील घरगुती वादाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आले आहे. दोघांनीही एकमेकाची क्षमा मागावी आणि पुढील जीवनाला सुरूवात करावी, असा सल्ला न्यायालयाने या जोडप्याला दिला आहे.

२०१९ मध्ये पुलवामा हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानात घुसून बालाकोटमध्ये हवाई हल्ला केला होता. या हल्ल्यात सहभागी असलेल्या वैमानिकाविरोधात आयआयएमची पदवीधारक असलेल्या पत्नीने तक्रार दाखल केली आहे. ही तक्रार रद्द करावी यासाठी वैमानिकाने पंजाब उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती पण ती फेटाळण्यात आली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणावर न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्तील अतुल एस. चांदुरकर यांच्या न्यायासमोर सुनावणी झाली. तुम्ही दोघेही तरूण आहात आणि तुमच्यापुढे खूप सारे आयुष्य पडलेले आहे. सुडाचे जीवन न जगता दोघांनी चांगले आणि सुखकर जीवन जगावे. झाले गेले विसरून एकमेकांना क्षमा करा आणि पुढे जा, असे मत न्यायासनाने व्यक्त केले. मला आणि माझ्या कुटुंबातील लोकांना माझी पत्नी आणि सासरे मानसिक त्रास देत असून माझ्याविरोधातील प्राथमिक चौकशी अहवाल रद्द करावा, अशी मागणी वैमानिकाने याचिकेत केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# त्रिपुरा सीमेवर दोन बांगलादेशी तस्कर ठार

◆ **आगरतळा, २६ जुलै**

दक्षिण त्रिपुरातील आंतरराष्ट्रीय सीमेवर सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफच्या जवानांनी दोन बांगलादेशी तस्करांना गोळ्या घालून ठार केले, असे अधिकाऱ्यांनी शनिवारी सांगितले. गोळीबारात एक बांगलादेशी जखमी झाला, तर दोन भारतीय तस्करांना अटक करण्यात आली.

ही कारवाई अमजदनगर येथे शुक्रवारी पहाटे करण्यात आली. डोळ्यात तेल घालून सीमेवर नजर ठेवणाऱ्या बीएसएफच्या जवानांना तस्करीचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसून आले. त्यांची हस्तक्षेपाचा प्रयत्न करतात तस्कर हिंसक झाले. जवानांनी आत्मरक्षणासाठी गोळीबार केला, असे बीएसएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

गोळी लागल्याने तीन तस्कर जमिनीवर कोसळले. त्यापैकी एकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. उर्वरित दोघांना बांगलादेशच्या जवानांनी उपचारासाठी परत नेले. त्यांना बांगलादेशातील परशुराम उपजिल्हा आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला, तर दुसऱ्यावर उपचार सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. घटनास्थळावरून १५ लाख रुपयांची औषधे जप्त करण्यात आली. ठार झालेल्या बांगलादेशी तस्कराचा मृतदेह बीजीबीच्या अधिकाऱ्यांना शुक्रवारी सोपवण्यात आला, असे बीएसएफच्या अधिकाऱ्याने सांगितले. त्यानंतर ध्वजबैठक आयोजित करण्यात आली. त्यात बांगलादेशी अधिकाऱ्यांनी गोळीबारावर चिंता व्यक्त केली. भारत-बांगलादेश सीमेवर तस्करी खपवून घेतली जाणार नाही, अशी भूमिका भारताने स्पष्ट केली. ◂(वृत्तसंस्था)

# आपले वाटोळे झाले; हिंजेवाडीतील आयटी कंपन्या बाहेर जाताहेत्

## नागरी कामांची पाहणी करताना अजित पवार संतापले

◆ **पुणे, २६ जुलै**

येथील हिंजेवाडीतील आयटी कंपन्या बंगळुरू आणि हैदराबाद येथे जात असल्याची माहिती उघड करून अजित पवार यांनी खळबळ उडवून दिली. पिंपरी-चिंचवडमधील नागरी कामांची पाहणी करताना अजित पवार संतापल्याची चित्रफीत व्हायरल झाली आहे.

पाणी साचणे तसेच इतर समस्यांचा आढावा घेण्यासाठी अजित पवार शनिवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास हिंजेवाडी येथे धडकले. पिंपरी-चिंचवडमधील काही भागांना त्यांनी भेट दिली. पवार परिसराची पाहणी करीत असताना, जांभुळकर यांनी त्यांच्यासोबत संपर्क साधला आणि माध्यमांच्या उपस्थितीतच स्थानिक समस्यांबाबत तक्रार केली.

धरणं बांधली की मंदिरं विस्थापित होतात. तुम्ही काहीही म्हणू शकता, मी ते ऐकेल. पण, मला जे करायचे आहे, तेच करेल. आपले वाटोळे झाले आहे. हिंजेवाडीतील संपूर्ण आयटी पार्क बाहेर जात आहे. त्या माझ्या पुण्यातून आणि महाराष्ट्रातून बंगळुरू-हैदराबादेत जात आहेत. तुम्हाला याची काळजी नाही का? तुम्ही येथे पाहणी करण्यासाठी सकाळी का आलात, हे मला कळनासे झाले. कठोर कारवाईशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही, असे माध्यम प्रतिनिधींना त्यांचे बंद करण्यास सांगताना पवार म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### पार्कमध्ये कंपन्यांची शेकडो कार्यालये

हिंजेवाडीमध्ये राजीव गांधी इन्फोटेक पार्क आहे, जो महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बांधलेला असून, २,८०० एकरांवर पसरलेला एक मोठा तंत्रज्ञान आणि व्यवसाय पार्क आहे. या व्यवसाय पार्कमध्ये ८०० पेक्षा जास्त कंपन्यांची कार्यालये आहेत. ■

# जिल्हा न्यायाधीशांना मिळते शूद्रासारखी वागणूक

## मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची असमतोलावर कडवट टिप्पणी

◆ **भोपाळ, २६ जुलै**

जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांना शूद्रांसारखी वागणूक दिली जाते, तर उच्च न्यायालयातील न्यायाधीश स्वतःला सवर्ण समजतात, अशी कडवट टिप्पणी मध्य प्रदेशच्या उच्च न्यायालयाने व्यापम घोटाळ्याशी संबंधित एका प्रकरणात केली. यावेळी खंडपीठाने बडतर्फ करण्यात आलेल्या जिल्हा न्यायाधीशांची सेवा बहाल करण्याचा निर्णय दिला.

न्या. अतुल श्रीधरन आणि न्या. दिनेश कुमार पालीवाल यांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयात व्यापम घोटाळ्यातील वेगवेगळ्या जामीन आदेशांवरून २०१४ मध्ये बडतर्फ करण्यात आलेल्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जगतमोहन चतुर्वेदी यांची सेवा बेकायदेशीररित्या संपवण्यात आली होती, असा ठपका ठेवत ती रद्द केली. तसेच, त्यांचे पेन्शनसंबंधी सर्व हक्क पुन्हा लागू करण्याचे आदेश दिले. खंडपीठाने आपल्या निकालात म्हटले की, उच्च न्यायालय आणि जिल्हा न्यायपालिका यांच्यातील संबंध परस्पर आदरावर नव्हे, तर भीती आणि न्यूनगंडावर आधारलेले आहेत. अवचेतन पातळीवर, जातीय व्यवस्थेची काळी छाया येथे दिसते. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि जिल्हा न्यायपालिकेचे न्यायाधीश यांच्यातील संबंध हे जमीनदार आणि वेठबिगार यांच्यासारखे आहेत, असे खंडपीठाने न्यायव्यवस्थेतील सत्तात्मक विषमता उघड करताना नमूद केले.

**काय आहे प्रकरण?**

हे प्रकरण माजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश जगत मोहन चतुर्वेदी यांच्याशी संबंधित आहे. २०१४ मध्ये व्यापम घोटाळ्याशी निगडित काही प्रकरणांमध्ये वेगवेगळे जामीन आदेश दिल्याबद्दल त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते. ◂(वृत्तसंस्था)

### भीतीच्या छायेखाली न्याय मिळणार नाही

कनिष्ठ न्यायाधीशांच्या मानसिक स्थितीवर भाष्य करताना खंडपीठाने म्हटले की, जिल्हा न्यायाधीशांनाही कुटुंब, मुलांचे शिक्षण, आई-वडिलांचे आजारपण आणि भविष्याची चिंता असते. अशात अचानक नोकरी गमावल्यास ते रस्त्यावर येतात आणि समाज त्यांच्या सचोटीवर संशय घेतो. सततच्या भीतीखाली काम करणारी न्यायपालिका निर्भीडपणे न्याय देऊ शकत नाही. याच भीतीमुळे अनेकदा योग्य प्रकरणांमध्ये जामीन नाकारला जातो किंवा पुराव्यांअभावीही शिक्षा सुनावली जाते. केवळ आपली नोकरी वाचवण्यासाठी हे केले जाते. ■


हिंदू मुलींचे बळजबरीने हिंदू मुलींचे धर्मांतर करणारा आरोपी छांगुर बाबा ऊर्फ जलालुद्दीन याचा पुतण्याही या प्रकरणात आरोपी आहे. नोटीस बजावल्यानंतरही पोलिसांसमोर हजर न झाल्याने प्रशासनाने बलरामपूर येथील त्याची स्थावर मालमत्ता बुलडोजरने शनिवारी जमीनदोस्त करण्यात आली.

# १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्रातील ७ खासदारांचा समावेश

**नवी दिल्ली, २६ जुलै**

संसदेच्या दोन्ही सभागृहातील १७ खासदारांसह दोन सांसदीय स्थायी समित्यांना आज संसदरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे हा पुरस्कार मिळवण्यात महाराष्ट्रातील ७ खासदारांचा समावेश आहे.

नवीन महाराष्ट्र सदनात राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या या कार्यक्रमात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, संसदीय काम काज राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावर्षी महाराष्ट्रातील भाजपाच्या डॉ. मेधा विश्राम कुळकर्णी, स्मिता उदय वाघ, शिवसेनेचे नरेश गणपत म्हस्के, श्रीरंग अप्पा बारणे, शिवसेना उबाठाचे अरविंद गणपत सावंत, काँग्रेसच्या वर्षा एकनाथ गायकवाड आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या विशेष आग्रहावरुन प्राईम पॉईंट फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने २०१० मध्ये संसदरत्न पुरस्कार सुरु केल

# सर्वांत मोठ्या गुहेत सापडला ३४ कोटी वर्षांपूर्वीचा दात

## आधी येथे होता उथळ समुद्र ● शार्क प्रजातीतील जीवाश्माचा दात

◆ **फ्रँकफर्ट, २६ जुलै**

जगातील सर्वात मोठ्या गुहा केंटकीच्या मॅमथ केव्ह नॅशनल पार्कमध्ये सुमारे ३४ कोटी वर्षे जुन्या दाताचा शोध लागला आहे. पूर्वी अज्ञात असलेल्या प्राचीन शार्क प्रजातीतील एका जीवाश्माचा हा दात आहे. या प्रजातीला आता मॅकाडेन्स ओल्सोनी असे नाव देण्यात आले आहे, ती मिसिसिपीच्या उत्तरार्धातील स्टे. जेनेव्हिव्ह फॉर्मेशनमध्ये आढळली आहे.

सुमारे अर्धा इंच लांबीचा हा दात प्रागैतिहासिक सागरी जीवनाबद्दल मौल्यवान माहिती देतो. राष्ट्रीय उद्यान सेवेने 'शार्क वीक' सुरू झाल्यानंतर लगेचच या शोधाची घोषणा केली. यामुळे प्राचीन शार्कबद्दल जाणून घेण्याची लोकांची उत्सुकता वाढली आहे. हा शोध प्राचीन सागरी जीवनाबद्दलच्या समजुतीत एक उल्लेखनीय भर आहे. नैसर्गिक इतिहासाचे जतन आणि अभ्यास करण्याचे महत्त्व देखील अधोरेखित करते, असे अधीक्षक बार्कले ट्रिम्बल यांनी सांगितले. या शार्कच्या दातांची ठेवण गोलाकार आहे. यामुळे ते समुद्रातील लहान प्राणी सहज खाऊ शकतात. ही प्राचीन शार्क एक फुटापेक्षा कमी लांबीची असावी. तसेच तिचे खाद्य मॉलस्क आणि अळ्या असण्याची शक्यता आहे. मॅकाडेन्स ओल्सोनीचे जीवाश्म स्टे. जेनेव्हिव्ह फॉर्मेशनमध्ये सापडले, ते अंदाजे ३३ ते ३४ कोटी वर्षांपूर्वीचे आहे. त्या काळात, मॅमथ ही गुहा एका उबदार, उथळ समुद्रात बुडाली होती. यामध्ये क्रिनॉइड्स आणि कोरलसह अनेक जीवसृष्टी होती.

हे संशोधन नॅशनल पार्क सर्व्हिस पॅलिओन्टोलॉजी प्रोग्राम, मॅमथ केव्ह नॅशनल पार्क आणि स्मिथसोनियन पॅलिओबायोलॉजी विभागातील शास्त्रज्ञांच्या पथकाने केले. मॅकाडेन्स ओल्सोनी व्यतिरिक्त, संशोधकांनी आणखी एका प्राचीन शार्कचा अभ्यास केला, हेलोडस कोक्सानस, ज्याचे आता रोटुलाडेन्स असे नाव देण्यात आले आहे, ज्याचा अर्थ 'व्हेल टूथ' आहे. ही प्रजाती मॅकाडेन्स ओल्सोनीशी साम्य दर्शवते आणि प्राचीन सागरी जीवनाची विविधता अधोरेखित करते. ◂(वृत्तसंस्था)



# अनुकंपा नोकरी ही कल्याणकारी उपाययोजना

## अवलंबितांसाठी नियुक्ती प्रक्रिया केली जाऊ शकते शिथिल

◆ **प्रयागराज, २६ जुलै**

अनुकंपावर करण्यात येणारी नियुक्ती ही कल्याणकारी उपाययोजना आहे. त्यामुळे मृताच्या पात्र अवलंबितांसाठी नियुक्ती प्रक्रियेत शिथिलता आणली जाऊ शकते, असा निर्वाळा अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे. मृत कर्मचाऱ्याची पत्नी आणि आई यांच्यातील अनुकंपा नियुक्तीविषयक वादावर न्यायमूर्ती अजय भानोत यांनी हा निर्णय दिला आहे.

वाराणसी येथील युको बँकेत सिंगल विंडो ऑपरेटर म्हणून कार्यरत असताना याचिकाकर्तीच्या पतीचे निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि आई, असा परिवार आहे. याचिकाकर्ती नैना गुप्ता यांच्या मासिक वेतनातून २० टक्के रक्कम मिळण्यास सासू पात्र आहे. अवलंबितांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याबाबतचे अपरिवर्तनीय शपथपत्र नैना गुप्ता यांना न्यायालयात द्यावे लागेल. मिळणारे मासिक वेतन, कौटुंबिक स्थिती, दीर्घकालीन बांधिलकी लक्षात घेऊन सासूला मिळणाऱ्या रकमेची निश्चिती केली जाईल. कौटुंबिक वाद पात्र सदस्याच्या नियुक्तीच्या दाव्यांना अडथळा आणू शकत नाहीत आणि मृत व्यक्तीवर अवलंबून असलेल्या सदस्यांना आर्थिक लाभाच्या हक्कापासून वंचित ठेवले जाऊ शकत नसल्याचे सांगत न्यायमूर्ती भानोत यांनी नैना गुप्ता यांची अनुकंपा नियुक्तीची मागणी मंजूर केली आहे.

**नियुक्तीसाठी संमतीपत्र देण्यास सासूचा विरोध**

दरम्यान, वेतनातून सासूला आर्थिक मदत देण्याचे शपथपत्र नैना गुप्ता यांनी सादर केल्याचे वकिलांनी न्यायालयाला सांगितले. नैना गुप्ता यांना अनुकंपा तत्त्वावर नोकरीच्या नियुक्तीसाठी संमतीपत्र देण्यास त्यांच्या सासूने विरोध केला आहे. मात्र, सासू-सुनेच्या वादामुळे मृताच्या नातेवाईकांना त्रास होऊन अनुकंपा नियुक्तीचा उद्देश सफल होणार नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मालदीवच्या क्षमता वाढीसाठी भारत वचनबद्ध

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**माले, २६ जुलै**

मालदीवसोबत भागीदारी आणखी वाढवण्यास भारत उत्सुक आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी उपराष्ट्रपती उझ हुसैन मोहम्मद लतिफ यांच्यासह मालदीवच्या नेत्यांच्या भेटीत सांगितले. ते दोन दिवसांच्या मालदीव दौऱ्यावर होते. मालदीवच्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रम ालाही उपस्थित होते.



लतिफ यांच्याशी झालेल्या चर्चेत भारत-मालदीव संबंधांच्या प्रमुख स्तंभांवर चर्चा झाली. यात पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्याचा समावेश होता. आपले देश पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, हवामान बदल, ऊर्जा आणि इतर क्षेत्रात जवळून काम करीत आहेत. हे आपल्या लोकांसाठी खूप फायदेशीर आहे. येणाऱ्या काळात ही भागीदारी आणखी दृढ करण्यास आम्ही उत्सुक आहोत, असे मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. मालदीवच्या स्वातंत्र्यदिनाच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी शुभेच्छा दिल्या.

त्यांनी सन्माननीय पाहुणे म्हणून समारंभात उपस्थिती लावली. दोन्ही बाजूंनी खोलवर रुजलेल्या आणि विशेष संबंधांवर विचारांची देवाण-घेवाण केली. गरजेच्या वेळी मालदीवला भारताने सतत मदत केल्याबद्दल उपराष्ट्रपती लतिफ यांनी नरेंद्र मोदी यांचे आभार मानले, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यम ावरील पोस्टमध्ये म्हटले आहे. या वर्षी भारतासोबतच्या औपचारिक संबंधांना ६० वर्षे पूर्ण होत असताना, नरेंद्र मोदी आणि मी दोन्ही देशांनी घेतलेल्या मैत्रीच्या आणि परस्पर सहकार्याच्या प्रवासावर विचार केला. मला अपेक्षा आहे की, भारतासोबतचे सहकार्य बळकट होईल, असे लतिफ म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## रोखठोक


दिनेश गुणे

# राजकारण म्हणजे काय रे भाऊ?

सामान्य जनतेस राजकारणात मोठा रस असतो. राजकीय वर्तुळात घडणाऱ्या घडामोडी, कुरघोडीचे खेळ, धोबीपछाडचे डावपेच, कात्रजचे घाट आणि असे बरेच काही राजकारणात जे चालत असते, त्यावर मनसोक्त गप्पा मारणे, अशा घडामोडींचे आपापसातील विरंगुळ्याच्या चर्चांमधून विश्लेषण करणे आणि त्यावर बेतलेली भाकिते छातीठोकपणे वर्तविणे हा अनेकांचा आवडता छंदही असतो. पण बरेचदा, राजकारण म्हणजे नेमके काय, ते कसे चालते, ते कोण चालविते, याचा नेमका अंदाजच कोणासही नसतो. अनेकांस तर, राजकारण कशाशी खातात हेही ठावूक नसते. त्यामुळेच, राजकारणावर मनसोक्त गप्पा मारून, चर्चा करूनही, राजकारण म्हणजे काय याचे नेमके उत्तर मात्र फारसे कोणास देता येत नाही. राजकारण हे चार आंधळे व हत्ती यांच्या एका जुन्या गोष्टीसारखे असल्याने, आपल्या आपल्या आकलनशक्तीनुसार राजकारण समजून घेण्याचा अनेकांचा अट्टहास मात्र नेहमीच असतो. काहींच्या मते, राजकारण हे सत्ताकारण असते, काहींना राजकारणाचे मूळ समाजकारणात दिसते, तर काहींना राजकारण हा बुद्धिबळाचा, डावपेचांचा आणि कुरघोडीचा खेळ वाटतो. काही जणांना राजकारण हे कमाईचे साधन वाटते, तर काहींना पैसा उडविण्यासाठी राजकारणाचा आसरा घ्यावा लागतो. प्रत्यक्षातील राजकारणाची व्याख्या मात्र खरोखरीच निर्मळ असते. राजकारण म्हणजे समाजासाठी निर्णय घेणे व संसाधनांचे समाजात वाटप करणे, तसेच सत्ता मिळविणे व सत्तेच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याकरिता सत्ता सांभाळण्याकरिता धडपडत राहणे या प्रक्रियेस साधारणपणे राजकारण म्हटले जाते. त्यामध्ये साहजिकच, समाज, सरकार, निवडणुका, धोरणे आणि सार्वजनिक जीवनातील इतर गोष्टींचा राजकारणात समावेश होतो. त्यामुळे राजकारण ही एक व्यापक बाब असल्याने, ज्याला ज्या अर्थाने राजकारण करावयाचे असते, तसे ते करण्याची त्यास मुभादेखील प्राप्त होत असते. समाजासाठी महत्त्वाचे निर्णय घेणे हा राजकारणाचा पाया असल्याने, साहजिकच, समाजाच्या सहकार्याखेरीज अथवा पाठिंब्याखेरीज राजकारण करता येत नसल्याने अनेकांनी आपल्या राजकारणास समाजकारणाचा मुलामा चढवून सत्तेचे राजकारण केले. त्यामध्ये साहजिकच संघर्षही असतो. हा संघर्ष सत्तेचा असल्याने, दोन गटांमध्ये, विचारसरणींमध्येही तसा संघर्ष अपरिहार्य असतो. अशा संघर्षात मात्र, ज्या समाजासाठी निर्णय घेण्याकरिता राजकारण राबवायचे असते, त्या समाजास फारसे स्थान नसते. त्यामुळे असे संघर्ष लांबूनच न्याहाळत समाज त्याचे विश्लेषण करतो आणि जेव्हा विश्लेषणाहून वेगळेच काही घडताना दिसते, तेव्हा तो एकमेकांस विचारतो, 'राजकारण म्हणजे काय रे भाऊ?'...

सध्या महाराष्ट्रात, म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही घडत आहे, ते पाहून त्याचे विश्लेषण करणारा सामान्य माणूस मात्र, पुरता संभ्रमावस्थेत सापडला असल्याने हाच प्रश्न एकमेकांस विचारत असावा. निवडणुका पार पडल्यानंतर पुढे जी काही राजकीय प्रक्रिया सुरू होते, ती बव्हंशी सत्तास्थापनेची असल्याने, सत्तासंघर्ष हा त्या प्रक्रियेचा अपरिहार्य भाग असतो. त्यामुळे, त्या संघर्षात केवळ दोन राजकीय प्रतिस्पर्धी असतात. कधी ते राजकीय पक्षांच्या रूपाने एकमेकांसमोर असतात, तर कधी व्यक्तींच्या नेतृत्वाखालील गटातटांच्या रूपाने परस्परांवर कुरघोडीचे डावपेच आखत असतात. महाराष्ट्राच्या राजकारणात हे नेहमीच घडत आले आहे. ८० टक्के समाजकारणाचा वसा घेत राजकारण करणाऱ्यांच्या एकाहून एक सुरस कथांनी राजकारणाचे भलतेच रंग सध्या उजळताना दिसत आहेत. राजकारण हा केवळ एका क्षेत्रापुरता मर्यादित मुद्दा नाही. कुटुंबातही राजकारण असते, समाजघटकांतही असते, उद्योग-व्यवसायांतही त्याचे स्थान अढळ असते आणि अर्थकारणाचाही राजकारणाशी घट्ट संबंध असतो. म्हणूनच, राजकारणाला असंख्य कंगोरे असतात. केवळ सत्ताकारण किंवा राज्यशास्त्रापुरत्या एका विषयाच्या विळख्यात राजकारण अडकलेले नसते, त्यामुळे, जेव्हा व्यक्ती-व्यक्तींमधील संघर्ष तीव्र होतो, तेव्हाही राजकारणाची नवनवी वळणे दिसू लागतात आणि त्याचा अर्थ शोधणे अनाकलनीय होत जाते. त्यामुळे, जेथे राजकारण नाही, असे क्षेत्र दाखविणे अवघडच असते. तरीही, सत्तेच्या राजकारणाविषयी सर्वांस कमालीचे कुतूहल असते. साहजिकच, ज्याकडे समाज कुतूहलाने पाहतो, ते क्षेत्र अधिक वेगवान असते, तेथील घडामोडी वेगवान असतात. त्याचे पडसाद अन्य समाजजीवनावरही उमटत असतात. त्यातूच नेते, त्यांचे गट आणि प्राबल्याचे संघर्ष सुरू होतात व शक्तिप्रदर्शनासारख्या प्रथा सुरू होऊन प्रभावक्षेत्रे आखण्याची वर्चस्वाची स्पर्धा सुरू होते.

महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे काही आठवड्यांपूर्वी एका वादग्रस्त वक्तव्यामुळे अडचणीत आले आणि त्यांच्या राजकीय कारकीर्दीची कसोटी सुरू झाली. अशा वेळी पाठीराखा भक्कम असेल, तर अशा वादग्रस्त विषयांच्या वादळातून एखाद्यास सहज बाहेर काढले जाते. माणिकराव कोकाटे हे त्या वादग्रस्त वक्तव्यानंतरच्या वादळातून बाहेर पडले आणि तो मुद्दा मागे पडला, तेव्हा त्यांच्या पाठीशी अशी कोणती तरी शक्ती आहे, असा समाजाचा समज पक्का झाला होता, पण त्यापाठोपाठ पुन्हा, विधिमंडळाच्या भर सभागृहात, कामकाज सुरू असताना त्याकडे कानाडोळा करत बाकड्याखाली लपविलेल्या मोबाईमधील खेळात रंगल्याचे त्यांचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसृत झाले आणि कोकाटे नव्या वादळाच्या तडाख्यात सापडले. आपण रमी खेळत नव्हतो, तर विधिमंडळाच्या कामकाजाचे प्रक्षेपण पाहात होतो, तेव्हा मध्येच जाहिरात समोर आली, असा त्यांनी केलेला काही थातुरमातुर खुलासा फारसा पचला नाही, तेव्हा कोकाटे यांना या वादळाची किंमत मोजावी लागणार असे आडाखे राजकारणाच्या चर्चेच्या अड्ड्यांवर बांधले जाऊ लागले, कोकाटे यांची गच्छंती अटळ असल्याच्या आणाभाका घेत कोणी त्यांच्या राजीनाम्यासाठी पिच्छा पुरवू लागले आणि अशाही स्थितीत निश्चल राहून कोकाटे यांनी अखेर शक्तिप्रदर्शनाचा अखेरचा उपाय आखला. आता बहुधा कोकाटे यांच्या शक्तिप्रदर्शनाचा घाट पूर्ण झाला आहे. आपल्या पाठीशी जनसमर्थन आहे, असे भासवत, आपल्या



मंत्रिपदाचा दावा मजबूत करण्याच्या राजकारणातील कुरघोडीच्या खेळाचे आता विश्लेषण सुरू होईल आणि कोकाटे यांच्या कारकीर्दीचे आणखीही काही वादग्रस्त मुद्दे समोर येऊ लागतील. तसेही, १९९५ ते १९९७ या काळात, अल्प उत्पन्नगटातील असल्याचे भासवून राज्य सरकारच्या स्वेच्छाधिकार कोट्यातून घर मिळविल्याच्या आरोपावरून कोकाटे यांच्या विरोधात सुरू असलेल्या प्रदीर्घ सुनावणीचा निकालही वादग्रस्ततेने ग्रासलेल्या याच काळात लागावा आणि त्यामध्ये कोकाटे यांना न्यायालयाने शिक्षादेखील ठोठावावी, हा त्यांच्या राजकारणास मिळालेला जोरदार धक्का ठरला होता. याच घरात त्यांनी व्यवसायदेखील थाटला होता, असेही स्पष्ट झाल्याने या वादग्रस्त व्यक्तिमत्त्वाभोवतीचे वलय अधिकच गडद होऊनही, त्यांच्या सत्तापदास धक्का लागला नव्हता. राजकारण हा सत्तेचा आणि कुरघोडीचा खेळ असल्याने कोकाटे यांना धोबीपछाड देण्याचे अनेक प्रयत्न विरोधकांकडून सुरू आहेत. एकामागून एक वादाच्या भोवऱ्यात सापडलेले कोकाटे त्यातून सुटण्याचा एकाकी प्रयत्न करत असताना, एका भावनेच्या भरात त्यांनी राज्य सरकारलाच भिकारीदेखील ठरविले आणि खुद्द मुख्यमंत्र्यांचीच नाराजी ओढवून घेतली. या साऱ्या गदारोळात स्वच्छ प्रतिमेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्रास होतोय. ते विकासाचे राजकारण करतात. पण अशा मंत्र्यांमुळे त्यांचा त्रास वाढतो. मंत्रिमंडळातील वादग्रस्त आणि सरकारला अडचणीचे ठरणारे, अडचणीत आणणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे स्पष्ट होऊनही कोकाटेंसारख्यांच्या गच्छंतीची भाकिते वर्तविणाऱ्यांना पुढच्या काळाची पंचांगे पाहात नव्या ग्रहस्थितीचा आढावा घेण्याची वेळ आली आहे, हा भाग वेगळा.

याच सरकारातील संजय शिरसाट नावाचे आणखी एक मंत्रीदेखील नोटांनी भरलेल्या बॅगेची ऊब अनुभवत निवांतपणे फोनवर गप्पा मारत असल्याचा एक कथित व्हिडीओदेखील याच काळात समाजमाध्यमांवर फिरू लागला आणि ८० टक्के समाजकारणाचा वसा घेत राजकारण करण्याच्या बांधिलकीवर समाजातून प्रश्नचिन्हे उमटू लागल्यावर, सामान्य माणसाला पुन्हा तोच प्रश्न पडला, 'राजकारण म्हणजे काय रे भाऊ?'...

राजकारण हा कुरघोडीचा खेळ आहे, एवढी बाब आता निश्चित झाली आहे. त्यामुळे या खेळात उतरण्यासाठी काही हत्यारे परजावीच लागतात. आरोप-प्रत्यारोप ही त्यातील हुकमी हत्यारे असतात.

कोणाही नेत्याची, राजकीय पक्षाची प्रतिमा मलिन करण्यासाठी प्रामुख्याने याच हत्याराचा वापर केला जात असतो. जनमानसातील प्रतिमा उद्ध्वस्त करून कुरघोडीच्या राजकारणात प्रतिस्पर्ध्यास चीत करता येते हा राजकारणातील सर्वसाधारण समज असला, तरी आजकाल आरोप-प्रत्यारोपांच्या खेळाचे गांभीर्यच कमी झाले आहे. कोणीही कोणावरही कोणतेही आरोप करावेत आणि तात्पुरते वादळ उठवून त्याचा तात्कालिक फायदा घेण्याचा प्रयत्न करावा हे सर्रास होत असले, तरी तेच आरोप फिरून समोरूनही होऊ लागले, की ही हत्यारे आपोआप म्यान होतात, असाच सर्वसाधारण समाजाचा अनुभव आहे. गेल्या काही दशकांत राजकारणातील अनेकांवर असंख्य आरोपांची प्रच्छन्न चिखलफेक झाली. असे काही घडताना दिसू लागले, की राजकारणात रस असलेली जनता उत्सुकतेने पुढे काय होणार याकडे डोळे लावून बसते. तोवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुटतच असतात आणि अचानक कोणीतरी सगळी हवा काढून टाकणारे एखादे वाक्य उच्चारतो. आम्हाला तोंड उघडायला लावू नका, आम्ही तोंड उघडले तर तुम्हाला तोंड लपवायला जागा उरणार नाही, असा पठडीबाज इशारा उच्चारला गेला, की आपोआप सारे काही शांत होऊ लागते. सामान्य जनता मात्र, ही तोंडे उघडण्याची व कोण कोणत्या बिळात तोंड लपवून बसते याची वाट पाहात बसते. तोंड उघडले तर लपायला जागा राहणार नाही हा इशारा म्हणजे या खेळात शह देण्याचा एक हमखास उपाय असल्याचे आता निर्विवादपणे स्पष्ट झाले आहे. अलिकडेच, नोटांच्या बॅगेची ऊब अनुभवतानाचा संजय शिरसाट यांचा कथित व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसृत झाल्यानंतर त्यांनीदेखील हाच उपाय वापरलेला दिसतो. शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी शिरसाट यांचा तो कथित व्हिडीओ प्रसृत करून राळ उडवून दिल्यानंतर, शिरसाट यांनी संजय राऊत यांना हाच इशारा दिला होता. आम्ही तोंड उघडले तर संपूर्ण महाराष्ट्रात तुमची बेअब्रू होईल असा इशारा देत शिरसाट यांनी कुरघोडीचे अस्त्र वापरले, तर काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांच्या घरावर दगड फेकू नयेत असा इशारा देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाच्या नेत्यांस गप्प राहण्याचा सल्ला दिला. कोणी व्हिडीओ प्रसृत करू लागले, तर कोणी आपल्याकडे सीडी असल्याचा आरोप करत प्रकरणे बाहेर काढण्याच्या धमक्या देऊ लागले. सामान्य माणूस मात्र, या प्रकाराकडे अचंबित होऊन पाहात राहिला आहे. एकमेकांच्या विरोधात एवढे सज्जड पुरावे असताना, एखाद्यास कायमचे तोंड लपवावे लागेल एवढी भक्कम माहिती हाती असताना, केवळ एकमेकांस इशारे देणारे हे राजकारण एकदाचा सोक्षमोक्ष का लावत नाही, अशा विचाराने तो संभ्रमित झाला आहे आणि त्याला प्रश्न पडला आहे, राजकारण म्हणजे काय रे भाऊ?...

अशा एकूण परिस्थितीने कळस गाठला, की त्यास राजकारणाची अधोगती झाली असे म्हटले जाते. या अधोगतीची अनेक कारणे असली तरी सत्तास्पर्धा हेच मुख्य कारण असते, हेही आता स्पष्ट झाले आहे. पक्षांतील फूट, गट, स्पर्धा, वैयक्तिक वैर, असे अनेक घटक एकत्र येऊन एकमेकांचे पाय ओढण्याचा खेळ खेळू लागतात आणि त्यात ज्याला यश मिळते, तो साहजिकच प्रबळ ठरतो. राजकारणातील या अधोगतीच्या प्रवासाचे पहिले श्रेय कोणास द्यावयाचे यावरून वेगवेगळे मतप्रवाह समोर आलेले दिसतात. आधी व्यक्तींमधील नैतिकतेची अधोगती होते आणि त्यातून गट, पक्ष आणि व्यापकपणे राजकारणाची अधोगती होते, हे या प्रवासाचे टप्पे आहेत. महाराष्ट्राचे राजकारण आजच्या घडीला यापैकी नेमके कोणत्या टप्प्यावर आहे, असाही प्रश्न आज सामान्य माणसास भेडसावत असेल यात शंका नाही. हे केवळ महाराष्ट्रातच घडते आहे असेही नाही. शेजारच्या मध्य प्रदेश, कर्नाटकातही सीडी, पेन ड्राईव्ह, हनी ट्रॅपच्या आरोपांनी राजकारणास विळखा घातला आहे. अशा वेळी, दूध का दूध करण्याचे आव्हान देणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पवित्रा राजकारणातला नव्या औत्सुक्याचा विषय ठरतो. हनी ट्रॅप नावाच्या नव्या वादाने राजकारण ढवळून निघालेले असतानाच, अजित पवार यांनी मात्र, या वादाचे पुरावे जाहीर करण्याचे आव्हान दिले आहे. अशा आरोपांतून केवळ धमक्या देणे बंद करा आणि ज्यांच्याकडे पेन ड्राईव्ह आहे, व्हिडीओ आहेत, त्यांनी ते जनतेसमोर आणावेत असे स्पष्ट आव्हान अजित पवार यांनी दिले आहे. या सामान्याचा निर्णय अखेर जनताच घेणार आहे, याचे भान कोठे तरी जिवंत आहे, ही समाधानाची बाब नव्हे काय? तसे झाले नाही, तर राजकारण हा जनतेस मूर्ख बनविण्याचा धंदा आहे या समजुतीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता अधिक! ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### पुन्हा दीदीच्या अश्रूंची नौटंकी

पश्चिम बंगालमधील राजकारण हे गेल्या काही वर्षांत एक विचित्र, गुंतागुंतीचे आणि राष्ट्रीय सुरक्षेला सतत आव्हान देणारे क्षेत्र ठरले आहे. ममता बॅनर्जींच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेसने ज्या प्रकारे राजकारणात धर्म, जाती आणि परकीय घुसखोरीचा वापर करून मतांचे समीकरण पक्के केले, ती एक गंभीर राष्ट्रीय शोकांतिका आहे. पण सध्या केंद्र सरकारच्या कठोर भूमिकेमुळे या सर्व समीकरणांना सुरुंग लागला असून, त्याचे फलित म्हणजे ममता बॅनर्जींची सध्या दिसणारी अस्वस्थता, बडबड आणि नाट्यमय अश्रू.



अलिकडेच जेव्हा केंद्र सरकारने घुसखोर रोहिंग्या आणि बांगलादेशी नागरिकांच्या विरुद्ध धोरणात्मक पावले उचलायला सुरुवात केली, त्यावेळी बंगालमधील सत्ताधाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली. याच भूमीवर त्यांनी 'घुसखोर म्हणजे माझं मतबँक' असं गुप्त समीकरण तयार केलं होतं. संदेशखालीपासून कोलकात्याच्या उपनगरांपर्यंत लाखोंच्या संख्येने घुसखोरी झाली. त्यांचे नाव बदलून, कागदपत्रे बनवून त्यांना देशाचा नागरिक बनवण्यात आले आणि मतदानासाठी वापरले गेले. आज जेव्हा केंद्र सरकार राष्ट्रीय नागरिक नोंदणी, नागरिकत्व दुरुस्ती कायदा यासारख्या उपाययोजना राबवते आहे, तेव्हा या साऱ्या घुसखोर 'मतदारां'च्या भवितव्यासमवेत ममतांचे राजकीय भविष्यही डळमळीत झाले आहे. आणि म्हणूनच ममता आज अश्रूंचा प्रयोग करत आहेत. एकीकडे त्या केंद्र सरकारवर हल्ला करत आहेत आणि दुसरीकडे स्वतःला बळी दाखवत आहेत. हे सारे राजकारण नव्हे काय? वास्तविक, पश्चिम बंगालमधील परिस्थिती म्हणजे 'राष्ट्रविरोधकांचे सुरक्षित आश्रयस्थान' झाले आहे. बंगालच्या सीमाभागांतून सतत बांगलादेशी घुसखोर भारतात येत आहेत आणि त्यात काही रोहिंग्या दहशतवाद्यांचीही घुसखोरी होत असल्याचे गुप्तचर विभागाचे दाखले आहेत. या सर्वांचा थेट उपयोग केवळ राजकीय फायद्यासाठी केला गेला आहे. ममतांचे म्हणणे असते, ''हे सगळं मानवतावादासाठी आहे.'' पण प्रत्यक्षात हा मतवाद आहे. माणुसकीच्या मुखवट्यामागे लपलेला स्वार्थाचा कुरूप चेहरा हेच ममतांचे खरे रूप आहे. जेव्हा असाम, त्रिपुरा आणि आता बंगालमध्ये सुद्धा सीएए-एनआरसी राबवण्याची तयारी सुरू झाली, तेव्हा ममतांनी 'दंगली, आंदोलने आणि स्वतःवर अन्याय झाल्याचे नाटक' सुरू केले. हे रोहिंग्यांचे डोळे आहेत की ममतांचे अश्रू हे सामान्य नागरिकालाही आता समजायला लागले आहे.

आज बंगालमधील सामान्य जनतेमध्ये रोष आहे. शांततामय सहअस्तित्वाच्या भूमीत आज धार्मिक ध्रुवीकरण, बांगलादेशी गँग्सचा त्रास, हिंदूंवरील अत्याचार आणि महिला असुरक्षा या गोष्टी सामान्य झाल्या आहेत. पोलिस फक्त ममतांच्या कार्यकर्त्यांसाठी काम करत आहेत आणि जेवढे काही सरकार चालते ते मुस्लिम मतांसाठी.

पण याचा शेवट आज दिसतो आहे. कारण केंद्र सरकार आता एका स्पष्ट, राष्ट्रहिताच्या भूमिकेवर उभे आहे. सीएएमुळे पीडितांना संरक्षण मिळेल, एनआरसीमुळे घुसखोरांवर कारवाई होईल आणि सीमांचे संरक्षण होईल. याचाच अर्थ ममतांच्या 'मतबँकेवर' कुऱ्हाड पडणार आहे. आणि म्हणूनच त्या नाटक करत आहेत. हे ''माझ्यावर अन्याय होतोय'' वगैरे रडगाणे म्हणजे केवळ वाचवण्याचा अपयशी प्रयत्न आहे. आज ममता बॅनर्जींच्या अश्रूंचा खरा अर्थ लोकांनी समजायला हवा. हे अश्रू केवळ घुसखोरांचे हक्क हिरावले म्हणून नव्हे, तर स्वतःची सत्ता, स्वतःचा मतबँक आणि स्वतःच्या फायद्याचे राजकारण कोसळतेय म्हणून आहेत. ही एक राजकीय नौटंकी आहे, जी आपल्या राष्ट्रीय सुरक्षेशी, सामाजिक समतेशी आणि प्रामाणिक नागरिकांच्या हक्कांशी प्रतारणा करते आहे.

शेवटी एवढंच की, पश्चिम बंगालमधील राजकारण हे देशातील सर्वांत धोकादायक वळणावर पोहोचले आहे. ममतांची ढोंगबाजी आता उघडी पडते आहे. रोहिंग्या, बांगलादेशी घुसखोर, धार्मिक तुष्टीकरण आणि दडपशाही यांच्या आधारे उभा केलेला सत्तेचा बुरुज आता कोसळताना दिसतो आहे. आणि म्हणूनच या ''ममताच्या अश्रूंना'' दया न वाटता सावध व्हा, कारण हे अश्रू देशासाठी नाहीत, फक्त स्वतःच्या सिंहासनासाठी आहेत.

**प्रा. भागवत भांगे**/नागपूर

### म्हातारपण नको देऊ गा देवा!

लहानपण देगा देवा अशी मागणी सगळेच करतात. लहानपण हे निरागस असते. या वयात समज नसते. कुठलाही हट्ट हा खपवून घेतला जातो. लहान मुलांना फुलासारखे जपले जाते. त्यांचे लाड पुरवले जातात. आजच्या परिस्थितीत हे पण अवघड होऊन बसले आहे. जिथे आई-वडील नोकरीवर असतात किंवा कामाला जातात. ज्या मुलांची आई घरी असते त्या मुलांचे बालपण हे सुखात जाऊ शकते. ज्या घरांमध्ये आजी-आजोबा असतात. तिथेच नातवांचे खरे लाड, कौतुक होत असतात. फाजील लाड वडील माणसे खपवून घेत नाहीत. आज हे चित्र दुर्मिळ होत चालले आहे. यास कारण विभक्त कुटुंब पद्धती. नोकरी निमित्ताने,अर्थार्जन करण्यासाठी दोघांनाही बाहेर पडावे लागते आहे. यामुळे मुलांचे संगोपन हा विषय दिवसेंदिवस कठीण होत चालला आहे. मुलं व कौटुंबिक जबाबदारी नको असल्याने लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याच्या प्रकारात वाढ होताना दिसून येत आहे. यामुळे कुटुंब व्यवस्था डळमळीत होत आहे. दोघेही नोकरी करणाऱ्या दाम्पत्यांना मुलांची अडचण वाटते आहे. सासू-सासरे, आई -वडील नकोसे वाटतात. असे चित्र मोठ मोठ्या शहरांमध्ये, फ्लॅट संस्कृतीमध्ये पाहायला मिळते आहे. अजूनतरी खेडे विभागात, ग्रामीण भागात हे लोण पोहचलेले नाही, ही समाधानाची बाब ठरते आहे.

जुनी पिढी हेल्थ इज वेल्थ समजून असत. आज हेल्थकडे दुर्लक्ष करून वेल्थकडे धाव घेताना नवीन पिढी दिसून येत आहे. यामुळे शारीरिक व्यायामाचा प्रकार दैनंदिन जीवनातून बाद झाला आहे. यासाठी हेल्थ क्लब, फिटनेस क्लबचा बाजार मांडला जातो आहे. त्यांची फी अव्वाच्या सव्वा असते. ती सामान्य माणसांच्या आवाक्यात नसते. यात भर म्हणून सप्लिमेंटरी फूड, प्रोटीनयुक्त आहार घेण्यास सांगतात. याकडे तरुणाईचा जास्त कल दिसून येतो आहे. याचे बरे वाईट परिणाम शरीरावर होत असतात. याकडे दुर्लक्ष करून कसे चालणार आहे?

म्हातारपणात शरीर साथ देत नाही. डोके, कान, डोळे, हातपाय इ. साथ देत नाही. आज बहुतांश कुटुंबांत एक किंवा दोनच मुले असतात. सुशिक्षित व उच्च शिक्षित कुटुंबातील मुले नोकरी निमित्ताने बाहेरगावी, परदेशात असतात. याचकारणाने उतारवयात परत एकटेच राहण्याची पाळी पालक वर्गांवर येत आहे. यामुळे उतारपणात एकटेपणाची जाणीव त्यांना अस्वस्थ करते आहे. त्यांची काळजी घेणारे कुणीही राहत नाही. ग्रामीण भागात आजही अनेकजण अनेकांना ओळखतात. माणुसकी आजही खेडेगावात जपली जाते आहे. या उलट शहरातील परिस्थिती पाहायला मिळते आहे. शेजारचे पाजारचे एकमेकांना ओळखत सुद्धा नाहीत.

बहुतांश सरकारी दवाखाने हे नरक यातना देणारे ठरतात. यात सुधारणा करण्याची गरज सरकारला वाटत नाही. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असते ते कसेतरी खाजगी दवाखान्याची वाट धरतात. आजच्या काळात मेडिकल इन्शुरन्स, कॅशलेस उपचार मिळणाऱ्या दवाखान्यावर पेशंटचा जास्त भर आढळून येतो. याची खात्री करून घेऊनच पुढचे पाऊल उचलले जाते. अशा दवाखान्यात पेशंट भरती झाला की डॉक्टर लोक त्या पेशंटच्या खात्यात पैसे शिल्लक असेपर्यंत चांगली काळजी घेतात. मग काहीतरी कारणे सांगून पेशंटला घेऊन जाण्यास भाग पाडतात. असा सर्व प्रकार सुरू झालेला आहे. म्हातारपणी ज्याचे आरोग्य सुदृढ असते तो खरा श्रीमंत असतो. कारण या वयात दाताने आपले काम थांबवलेले असते. दृष्टीने साथ देणे कमी केलेले असते. कानाने कुणाच्या भानगडीत पडायचे नाही असे ठरविले असते. हातापायाने जास्त श्रम करणे सोडलेले असते. या वयात एकतर डोके खूप चालते किंवा काहीच काम करीत नाही. जिभेचे चोचले या वयात पुरवणे शक्य नसते. शरीरातील पोषक घटकांचे, जीवनसत्त्वांचे संतुलन बिघडलेले असते. असा सर्व शरीराचा जांगडगुत्ता



झालेला असतो. म्हणून म्हातारपण नकोसे होते. आज सर्वत्र पैशाचा बोलबाला दिसून येतो आहे. नातेवाईक, सगेसोयरे पैसेवाले असतील तरच त्यांची विचारपूस करतात. नाहीतर कुणी कुणाला विचारण्याच्या, मदत करण्याच्या स्थितीत आढळून येत नसल्याने नको ते म्हातारपण अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे.

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

### मतदारयादी पुनरीक्षण आवश्यकच

मतदार पुनरीक्षण या विषयावर काँग्रेसच्या ताटाखालचे मांजर असलेले काही बुद्धिजीवी, ढोंगी धर्मनिरपेक्षतावादी आणि मोदीद्वेषाने पिसाळलेले पत्रकार, वादग्रस्त लेख लिहून जनतेची दिशाभूल करत आहेत. संवैधानिक आणि स्वायत्त संस्था असलेल्या भारतीय निवडणूक आयोगाच्या एकूण संवैधानिक अधिकार, कर्तव्ये आणि कामकाज पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करत आहेत. भारतीय निवडणूक आयोगाने संविधानात दिलेल्या अधिकारांचा वापर करून भारतीय मतदारांचे पुनरीक्षण करण्याच्या निर्णयावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्षांसह, इंडिया आघाडीचे इतर नेते मोदीविरोधाने एवढे पछाडलेले आहेत की आपण काय बोलतो आहोत, याचेही भान त्यांना राहिलेले नाही.

निवडणूक आयोगाने बिहारमधील सर्व महत्त्वाच्या राजकीय पक्षांनी नेमस्त केलेल्या, जवळपास साठ हजार बुथ लेव्हल एजंट्सना आधी पुनरीक्षण कसे करायचे याबद्दल सविस्तर प्रशिक्षण दिले होते. या प्रशिक्षणाबद्दल सर्वच प्रतिनिधींनी आनंद आणि समाधान व्यक्त केले. पुनरीक्षणाच्या कामातील प्रत्येक पायरीवर निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींबरोबरच राजकीय पक्षांचे प्रशिक्षित नेमस्त प्रतिनिधीही उपस्थित होते. या संपूर्ण पारदर्शक प्रक्रियेला बिहारमधील ९८ टक्क्यांच्या वर मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक आयोग अधिकृत भारतीय नागरिक असलेल्या सर्व मतदारांची यादी जुलै २०२५ अखेर जाहीर करणार आहे. यानंतर एखाद्या मतदाराची यादीबाबत काही तक्रार असेल, काही बदल असतील तर ते सुचवण्यासाठी तब्बल एक महिन्याची मुदत दिली आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या माहितीनुसार मृत मतदार, बिहारमधून इतर राज्यांत विस्थापित झालेले मतदार, दोन ठिकाणी नोंद असलेले मतदार आणि बनावट आधार कार्ड बनवून भारतीय निवडणुकीत मतदान करणारे घुसखोर मतदार यांची संख्या पन्नास लाखांच्या वर आहे. अशा मतदारांची नावे मतदारयादीत ठेवणे हे संविधानाच्या विरुद्ध आहे, संविधानाचा अपमान आहे. बिहारमधील सीमावर्ती चार जिल्ह्यांमधील आधारकार्डचे प्रमाण १२५ टक्क्यांच्या वर आहे. म्हणजे शंभर लोकांमध्ये १२५ आधार कार्ड असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे आणि ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. त्याची दखल घ्यायला नको? काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे हेच गट मतदार आहेत का? आजवर काँग्रेस आणि तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी पक्ष देशातील बहुसंख्य समाजाच्या मागे कधीच उभे राहिले नाहीत. मात्र देशद्रोही, अवैध घुसखोर, अतिरेकी, भ्रष्टाचाऱ्यांच्या मागे मात्र काँग्रेस सदैव बचावासाठी उभी का राहते? वास्तविक सर्व राजकीय पक्षांनी या प्रक्रियेचे स्वागत करून त्याला सकारात्मक सहकार्य करायला हवे होते. पण आपल्या देशात सगळे उलटेच!

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीबद्दल मुंबई उच्च न्यायालयात गेलेल्या काँग्रेसचे न्यायालयाने काढलेले वाभाडे काँग्रेस विसरली आहे का? त्याचबरोबर ईव्हीएमबाबत जवळपास चाळीसहून जास्त वेळा न्यायालयात गेलेल्या काँग्रेस आणि इतर राजकीय पक्षांनाही न्यायालयाने काय सुनावले याकडेही याकडे काँग्रेस सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, बिहारमधील मतदारयादी पुनरीक्षणाबद्दल सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने आयोगाच्या संवैधानिक अधिकार आणि कर्तव्यात हस्तक्षेप करण्यास साफ नकार दिला. याची पुढील सुनावणी येत्या २८ जुलै रोजी होणार आहे. त्याआधीच विरोधी पक्षनेते दबावतंत्राचा वापर करत आहेत. निवडणूक आयोगाने संपूर्ण देशात मतदारयादीचे पुनरीक्षण करून अवैध मतदारांची नावे वगळण्याबरोबरच केंद्र सरकारने संबंधित घुसखोरांना देशनिकाला दिला पाहिजे.

शेवटी काय तर आपण जिंकू तेथे सगळे काही उत्तम आणि आपण हारलो तेथे सगळे काही वाईट, मात्र आपल्यात काहीही दोष नाही अशी धारणा असलेल्या राजकीय पक्षांचे भवितव्य काय असेल ते सांगण्याचीही गरज नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### नरेंद्र मोदी : वर्तमानातील चाणक्य

उत्तम राज्यकारभार कसा चालवावा याचे ज्ञान 'चाणक्य'नीतीतून मिळते आणि नरेंद्र मोदी यांची कार्यशैली या 'चाणक्य'नीतीची सदोदित आठवण करून देणारी आहे. सलग पंतप्रधानपदी राहण्याच्या विक्रमात नरेंद्र मोदी यांनी इंदिरा गांधी यांना मागे टाकले असून जवाहरलाल नेहरू यांचा विक्रमही ते मोडीत काढू शकतील. इंदिरा गांधी यांनी आणिबाणी लादून लोकसभा निवडणूक दोन वर्षे समोर ढकलली आणि सत्ता उपभोगली हे लोकशाहीच्या अभ्यासकांनी लक्षात घ्यावे. अन्यथा इंदिरा गांधी यांचा विक्रम यापूर्वीच मागे पडला असता. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोइझ्झू यांच्याशी थेट विरोधी भूमिका न घेता मोदींनी खुल्या मोहम्मदीला ताळ्यावर आणले. चीनच्या कच्छपी लागून मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोइझ्झू यांनी भारतविरोधी जहाल भूमिका घेतली. मालदीवची अर्थव्यवस्था मुख्यतः पर्यटनावर आणि त्यातही भारतीय पर्यटकांवर आधारित आहे.

मोदींनी स्वतःचे समुद्र किनारी पर्यटनाचे एक छायाचित्र जाहीर केले की लगेच मालदीवला जाणारा भारतीय पर्यटकांचा ओघ आटला आणि मालदीवच्या अर्थव्यवस्थेला हेलकावे बसू लागले. आता त्याच मालदीवच्या अध्यक्षांनी नरेंद्र मोदी यांना मालदीव येथे पाहुणे म्हणून निमंत्रित केले आहे. पावसाळा संपल्यावर झेलम, सतलज नद्यांचे पाणी न मिळाल्याने पाकिस्तानला ज्यावेळी पाणीटंचाई जाणवेल त्यावेळी पाकिस्तानचे तुर्रमखान राज्यकर्ते भारतासमोर हात बांधून, मान झुकवून उभे राहतील हा दिवस फार दूर नाही.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

### तरुण पिढी व्यसनाधीन होते तेव्हा...

मनुष्य या विश्वातील एक अभिनव आणि अद्वितीय निर्मिती आहेत. तुमच्यासारखे फक्त तुम्हीच आहात. ही तुमच्या आयुष्याची खरी किंमत आहे. शून्यातून विश्व निर्माण करण्याची ताकद फक्त मानवातच आहे. ध्येय नसलेली माणसे साबणाच्या फेसासारखी असतात. काही क्षणापूर्वी ती दिसतात आणि काही क्षणानंतर ती नाहीशी होतात, असे महात्मा फुले म्हणतात. अजूनही वेळ गेलेली नाही. उद्याचा दिवस माझा असेल या सकारात्मकतेच्या दृष्टीने प्रेरित होऊन विचार बदलण्याची गरज आहे. मानवाचा जन्म झाल्यानंतर बालपण हे हसत खेळत जाते. परंतु शिक्षण घेत असताना घरातील आई-वडिलांचे संस्कार हे त्या मुलांवर अथवा मुलींवर होत असतात. त्याप्रमाणे लहानाचा तो मोठा होत जातो. पण शिक्षण घेत असताना त्याला मिळालेली संगत यावर सुद्धा बरेच काही अवलंबून असते. आजच्या तरुण पिढीची वाटचाल व्यसनाधीनतेकडे होते तेव्हा मात्र सर्वत्र निराशा होते. शरीराला घातक पदार्थांचे सेवन हे कमी वयातील मुलांना वाईट मार्गाने जाण्याची सवय लागलेली असल्याचे दिसून येत आहे. आई-वडील मोठ्या आशाआकांक्षा घेऊन आपल्या मुलांकडे बघत असतात. जेव्हा त्यांच्या मुलांचे कारनामे त्यांना माहीत होतात, तेव्हा मात्र त्यांच्या पायाखालची जमीन सरकलेली असते. आई-वडील आपल्याला जन्म देतात. लहानाचे मोठे करतात. स्वत:कडे दुर्लक्ष करून मुलाबाळांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यादृष्टीने ते आपले हित पाहतात. परंतु आजच्या युगात मात्र भलतेच होतानाचे चित्र सर्वत्र उमटून येत आहेत. तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारच तरुणांना जागे करू शकतात. महापुरुषांना आदर्श मानून त्यांच्या विचारांवर चालण्याची गरज आजच्या युवकांवर आली आहे. त्यामुळे नव्या वर्षात आपण सर्वांनी निश्चय करून व्यसनांपासून लांब राहावे जेणेकरून उद्याची तरुण पिढी चांगली राहील.

ऊठ तरुणा, जागा हो, व्यसनांपासून दूर हो या उक्तीप्रमाणे त्याने जीवन जगणे गरजेचे आहे. सरकारने व्यसनमुक्तीसाठी दवाखाने काढलीत परंतु त्याचा लाभ किती प्रमाणात झाला हा संशोधनाचा विषय आहे. युवकांनी शिकाल तरचं टिकाल या ओळी मनावर बिंबवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**ललित प्रभाकर नगराळे**/८९७५६२११५९

### नागपुरातील एकांकिका बंद का झाल्या?

माझ्या लहानपणी नागपुरात अनेक नाट्य कलाकार घडविणाऱ्या संस्था होत्या. रंगतरंग, अमॅच्युअर आर्टिस्ट, कलास्वानंद, बालरंजन व अशा अनेक संस्था मोठी नाटके किंवा बाल नाटके घेऊन धनवटे रंगमंदिर येथे किंवा वसंतराव देशपांडे सभागृह येथे प्रयोग सादर करायचे. मला आठवते सी. पी. बेरार कॉलेजमध्ये दोन नाटके ''चोरा येशील कधी परतून'' व ''झाली हवालदिल राजधानी'' ही दोन नाटके तुफान गर्दीत झाली होती. तिसऱ्या घंटेची आम्ही आतुरतेने वाट बघत असू. रंगतरंग संस्थेने ''चिलया बाळ'' नावाचे नाटक सादर करायचे ठरवले होते. त्यात मला 'चिलया बाळ'ची भूमिका देण्यात आली होती. त्याची तालीमसुद्धा सुरू होती परंतु काही कारणास्तव ते सादर होऊ शकले नाही. त्यावेळी मी खूप निराश झालो होतो. तसेच दूरदर्शन नवीन आले होते तेव्हाही अनेक संस्थांची नाटके त्यावर प्रसारित होत असे. शाळकरी मुलांना अभिनयाचे धडे देणे व त्यातूनच मराठी भाषा समृद्धी, संवाद कला, सादरीकरण, वेळेचे ताळमेळ आणि मुख्य म्हणजे पाठांतर इत्यादी गुणांचा वर्षाव जणू मुलांवर होत असे आणि पालकही आपल्या पाल्याला कौतुकाने नाटकात भाग घ्यायला पाठवत असत. एकूणच रंगभूमी सेवा अनेक ज्येष्ठ कलाकार करत असत. कालांतराने नाट्य सादरीकरणाची शैली बदलली. आता तर सिनेमास्टाईल नाटके सादर होत आहेत. आपण नाटक बघतोय की सिनेमा हेच कळत नाही. तरी पण नाट्यचळवळ नागपुरात ज्येष्ठ रंगकर्मी संजय भाकरे यांच्या सं. भा. फाऊंडेशनच्या वतीने निरंतर सुरू होते. अनेक लेखक, दिग्दर्शक व कलाकार मागील काही वर्षात घडले परंतु हल्ली संभाची नाट्यचळवळ बंद झाल्यासारखी दिसतेय. इतक्यात एकही नाटक आले नाही. यात मुलांची उदासीनता आहे की कसदार लेखकांचा अभाव की रसिकांची पाठ की अयोग्य वातावरण. चांगली नाट्यसंहिता व चांगले कलाकार घडविण्याचे हे एक साधन होते आणि भाकरे ते इमानेइतबारे करत होते. ही नाट्यचळवळ त्यांनी पुन्हा सुरू करावी असे वाटते. नव्याने नाट्य सादरीकरण जरी अस्तित्वात असले तरी प्रत्यक्ष संवादफेकीतून जो आविष्कार दिसतो त्याची मजा काही औरच. मुलांना स्पर्धात्मक युगात ढकलताना काही वेळ मनोरंजासाठी व त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी असावा असाही विचार पालकांनी करण्याची गरज आहे. त्याकरिता नागपूरात जिथे कुठे अशा नाट्यचळवळी चालतात त्याला प्रोत्साहन देणे की काळाची गरज आहे अन्यथा 'नाटक' हा कलाप्रकार लुप्त होऊन जाईल. ▮



**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उजनीच्या कामाचे पाईप अंगावर पडून मजुराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

उजनीच्या पाईपलाईनचे कामासाठी ठेवलेले पाईप माती खचल्याने अंगावर पडून कामगाराचा मृत्यू झाला. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील बंकलगी परिसरात शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला.

मिरासाब महम्मद नदाफ (वय ५२, रा. अजूर ता बेळगाव राज्य कर्नाटक) असे मृत पावलेल्या मजुराचे नाव आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील देगाव येथून ही पाईप लाईप अक्कलकोट तालुक्यातील कोर्सेगावच्या दिशेने जात आहे. त्यासाठी बंकलगी परिसरात पाईपचा साठा करून ठेवण्यात आला आहे. हे पाईप साधारण १२ मीटर लांब आणि दोन रुंद या आकाराचे आहेत. शुक्रवारी पावसामुळे काम बंद ठेवण्यात आले होते. दुपारी बाराच्या सुमारास मिरासाब पाईप ठेवलेल्या ठिकाणी गेला होता. त्यावेळी पाईप ठेवण्यात आलेल्या ठिकाणाची माती खचल्याने त्यातील पाईप मिरासाबच अंगावर पडले. त्यात त्यांच्या छातीला आणि डोक्यावर पडल्याने रक्तस्त्राव झाला. दुपारी ३.३० च्या सुमारास त्यांना महमद तांबोळी याने उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### महत्वाचे...



### स्वाती राठोडला सहाय्यक जिल्हाधिकारी पदाची पोस्टिंग

**सोलापूर,दि. २६ जुलै-**

खड झालेल्या स्वाती राठोड या सोलापूरच्या तरुणीने आज केरळमध्ये सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. स्वाती यांचा प्रवास हा केवळ वैयक्तिक यश नाही, तर तो संघर्ष, जिद्द आणि समाजातील बंधने तोडणाऱ्या धैर्यशीलतेचा प्रतीक आहे. बंजारा समाजाच्या पारंपरिक वाटेवरून शासनाच्या निर्णय केंद्रापर्यंत पोहोचणाऱ्या या प्रवासाने दाखवून दिलं की स्वप्नं मोठी असली की मार्ग आपोआप निर्माण होतो. आज स्वाती राठोड हे नाव शेकडो तरुणींना आणि उपेक्षित घटकांतील विद्यार्थ्यांना आशेचा किरण वाटतो आहे.

### वाघोली येथे महिलेच्या गळ्यास हत्यार लावून जबरी चोरी

**सोलापूर,दि. २६ जुलै-**

वाघोली (ता. मोहोळ) येथे घरात घुसलेल्या चौघां चोरट्यांनी महिलेच्या गळ्यास हत्यार लावून ८० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरून नेले. याबाबत उदय मल्लिनाथ पाटील (वय २९, रा. वाघोली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघांविरुध्द कामती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ जुलै रात्री एकच्या सुमारास पाटील यांच्या घराच्या मेन दरवाजाचे लॉक तोडून चार अनोळखी चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यापैकी एका चोरट्याने पाटील यांच्या आईच्या गळ्यास धारदार हत्यार लावून त्यांच्या गळ्यातील ५ ग्रॅम सोन्याची ठुशी, ४ ग्रॅम चे कानातील टॉप्स, ४ ग्रॅमची कानातील साखळी असलेली फुले, ६ भार वजनाचे पायातील चांदीचे पैंजण आणि घरातील दोन मोबाईल असा ८० हजार रुपये किंमतीचा ऐवज जबरदस्तीने चोरून नेला. याबाबत कामती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक दिक्षित पुढील तपास करीत आहेत.

### महसूल अधिकाऱ्यास दमदाटी करून जेसीबी पळवून नेला

**सोलापूर,दि. २६ जुलै-**

महसुल अधिकाऱ्यास वाळू माफियांनी दमदाटी करून जेसीबी पळवून नेला. याबाबत पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ग्राम महसुल अधिकारी गणेश आनंदा पिसे (वय २६, रा. शिरढोण, ता. पंढरपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघां अनोळखी व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ जुलै रोजी सकाळी सहाच्या सुमारास पंढरपूर येथील जुना अकलूज रोडवरील श्रीनाथ पॅलेसशेजारील रोडवर ग्राम महसुल अधिकारी गणेश पिसे यांना एक बिगर नंबरचा जेसीबी नदी पात्रातून येत असल्याचे दिसल्याने त्यांनी तो थांबविण्याचा इशारा केला. त्यावेळी जेसीबी चालकाने जेसीबी जागेवरच सोडून पळ काढला. त्यामुळे पिसे हे तो जेसीबी कारवाईसाठी घेऊन जाण्याच्या तयारीत असताना पळून गेलेला जेसीबी चालक हा इतर दोन साथीदारांसह तिथे आला. त्यांनी पिसे यांच्याशी हुज्जत घालून त्यांना दमदाटी करून सरकारी कामात अडथळा आणून तो जेसीबी पळवून नेला. म्हणून पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहा. पोलिस निरीक्षक वाघे तपास करीत आहेत.

### ज्ञानेश्वर साळवे यांची किसान काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

दयानंद महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि प्रसिद्ध शेतकरी नेते ज्ञानेश्वर साळवे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या किसान काँग्रेसच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मान्यतेने किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे यांनी केली. ज्ञानेश्वर साळवे यांनी आजवर राज्याच्या मंत्रालयासमोर आणि जिल्हास्तरावर शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी अनेक प्रभावी आंदोलने उभारली आहेत. त्यांच्या या निवडीमुळे शेतकरी वर्गात तसेच काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे.



# पारंपरिक महाविद्यालयाकडे विद्यार्थी फिरवणार पाठ?

- पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक बंधनकारक
- कुलपतींचे राज्यातील सर्व विद्यापीठांना आदेश






**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. २६ जुले -**

पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक आहे. हा नियम पूर्वीपासूनच आहे, तो कागदोपत्रीही दाखवण्यातही येत होता. परंतु आता मात्र, बायोमेट्रिक प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांची उपस्थिती विद्यापीठांना कळविणे बंधनकारक करण्यात आले असून तशा सूचनाच महामहिम राज्यपाल तथा कुलपतींनी राज्यातील सर्व विद्यापीठांना दिल्या आहेत.

उपस्थिती बंधनकारकमुळे विद्यार्थी मुक्त विद्यापीठाकडे वळण्याचा धोका मात्र निर्माण झाला आहे. त्यामुळे आतापर्यंत महाविद्यालयात उपस्थित न राहता महाविदयालये या विद्यार्थ्यांच्या खोट्या हजेऱ्या दाखवून परीक्षेला बसू देत होती ते आता कठीण होऊन पारंपरिक महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश घेण्याचे प्रमाण कमी होत जाईल.

### मुक्त विद्यापीठाची केंद्रे

सोलापूर, बार्शी, वैराग, गौडगाव, पंढरपूर शहर, अक्कलकोट, करमाळा, माढा, कुर्डूवाडी, मंगळवेढा, मोहोळ, बार्शी, वैराग, सांगोला, जुनोनी, पाणीव, नातेपुते, अकलूज.

### मुक्त विद्यापीठात मुक्त परीक्षा पद्धती

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने याची अद्याप अंमलबजावणी केली नसल्यामुळे मुक्त विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण इ.च्या अभ्यासकेंद्रामधील विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सोलापूर विद्यापीठ सोलापूर व संलग्नित महाविद्यालय अंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा योग्य पद्धतीने सीसीटीव्ही कक्षामध्ये होतात. तर मुक्त विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण इ.च्या अभ्यासकेंद्रामध्ये मुक्त परीक्षा पद्धती आहे. हीच परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्र राज्याची आहे.

### उपाययोजना काय : शिक्षण तज्ञ

- मुक्त विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण इ.च्या अभ्यासकेंद्रातील प्रवेशासाठी (पदवी किमान वयोमर्यादा= २५ व पदव्युत्तर किमान वयोमर्यादा= ३०) व सीसीटीव्ही कक्षामध्ये परीक्षा या उपाययोजना लागू करणे आवश्यक आहे. या उपाययोजना लागू न करता परिस्थिती अशीच राहिल्यास भविष्यामध्ये मानव संसाधन, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ऱ्हास अटळ आहे.
- मुक्त विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण तसेच इतर विद्यापीठांनी सोलापूर विद्यापीठ परीक्षेत्रामध्ये विविध महाविद्यालयांत मुक्त विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण यांच्या अभ्यास केंद्राना परवानगी देताना त्या महाविद्यालयांची विद्यापीठाशी असलेली संलग्नता मुलभूत मानली आहे. त्यामुळे या सर्व अभ्यासकेंद्रांच्या कार्यप्रणालींची विशेष तपासणी प्रस्तुत विद्यापीठाच्या समितीमार्फत होणे गरजेचे आहे.

### पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी तातडीने अंमलबजावणी



बायोमेट्रीक प्रणालीची अंमलबजावणी करण्याचा निर्णय सोलापूर विद्यापीठाने घेतलेला आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी तातडीने अंमलबजावणी करण्यात आली आहे. अन्यथा त्यांचे प्रवेश थांबविण्यात येणार आहेत. पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑक्टोंबर २०२५ पासून बायोमेट्रिक प्रणालीचा वापर करण्याच्या सूचना संलग्न महाविद्यालयास दिल्या आहेत.

**- प्रा. डॉ. प्रकाश महानवर, कुलुगुरू,**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

### कठोरता आणल्याशिवाय गुणवत्ता सुधारणार नाही



मुक्त विद्यापीठाला काही कोर्सेस चालविण्याची परवानगी न देणे किंवा दिली तर त्यांच्या पर्यवेक्षणाची मजबूत व्यवस्था करणे. मुक्त विद्यापीठाने अभ्यासकेंद्र व परीक्षा केंद्रे देताना कठोर नियम लावावेत.पारंपरिक महाविद्यालयातील प्राध्यापकांनी आपले अध्यापन सुधारावे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात यावे, असे वातावरण तयार करावे. शासनाने उद्योगपूरक व कौशल्याधारित अनुदानित कोर्सेस सुरु करण्यासाठी महाविद्यालयांना व विद्यापीठांना स्वातंत्र्य द्यावे. एकूणच प्रशासनिक कठोरता आणल्याशिवाय शिक्षणाची गुणवत्ता सुधारता येणार नाही.

**- प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप,** ज्येष्ठ शिक्षण तज्ञ

### पदवीच्या विद्यार्थ्यांना लागू न होण्यासाठी प्रयत्न




सोलापूर विद्यापीठाच्या परिक्षेत्रामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ दिल्ली अशा अनेक विद्यापीठाचे अभ्यास केंद्रे सुरू असल्यामुळे सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. त्यामुळे महाविद्यालयातील अनेक शैक्षणिक तुकड्या बंद होऊन शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. अशीच परिस्थिती राहिली तर विद्यार्थी अभावी भविष्यात अनेक पदवी महाविद्यालये बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रीक प्रणाली लागू करू नये, यासाठी प्रयत्न करणार.

**- प्रा. सचिन गायकवाड,**
व्यवस्थापन परिषद सदस्य, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

### विद्यार्थ्यांचा ओढा मुक्त विद्यापीठाकडे

केंद्र शासनाच्या ऑल इंडिया सर्वे ऑन हायर एज्युकेशनच्या (AISHE) अहवालात महाराष्ट्रातील एकूण ४०५ अनुदानित महाविद्यालयातील पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सत्र २२-२३च्या तुलनेत २३-२४ मध्ये अत्यंत कमी झाल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. शिक्षण तज्ञांच्या म्हणण्यानुसार याची तीन प्रमुख कारणे आहेत. एक तर आता पदवीचे शिक्षण घेवून नोकरी मिळत नाही. त्यामुळे पदवी शिक्षणातील फोलपणा विद्यार्थ्यांच्या लक्षात आलेला आहे. दुसरे कारण म्हणजे महाविद्यालयातील शिक्षणाचा दर्जा खालावत चाललेला आहे. महाविद्यालयातील शिक्षक किती तास घेतात. विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या अध्यापनात कितपत गोडी वाटते, हा संशोधनाचा विषय आहे. हजेरी लावून बाहेर फिरणाऱ्या प्राध्यापकांची संख्याही वाढत आहे. महाविद्यालयात नीटसे तास होत नाहीत, ही अवस्था आहे. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे य. च. म. मुक्त विद्यापीठाने विविध विषयांचे कोर्सेस सुरु केले आहेत ते प्रत्येकाला नोकरी करून करता येतात. मग महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी कां जावे? हा प्रश्न उपस्थित होतो. याशिवाय मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा मुक्तपणे होत आहेत त्यांच्यावर पाहिजे तसे नियंत्रण नाही. वास्तविक ही केंद्रे महाविद्यालयातच आहेत परंतु महाविद्यालये आपला याच्याशी संबंध नाही अशा भूमिकेत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अशा फुकट पदव्या मिळत असतील तर साहजिकच विद्यार्थी तिकडे आकर्षित होत आहेत.



(छायाचित्र : केवल तिवारी)

**सोलापुरात रिमझिम पाऊस...**
**सोलापूर : रिमझिम पावसाच्या पाण्याने सिद्धेश्वर मंदिर परिसरात वॉकिंग ट्रॅक शनिवारी स्वच्छ धुऊन निघाले.**

### गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

सोलापूर : विजापूर रोडवरील नेहरू नगर परिसरातील घरात गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केली. हा प्रकार शनिवारी सकाळी ७.०५ वाजता उघडकीस आला.

मिथून बजरंग वाघमोडे (वय ३४, रा. झोपडपट्टी नंबर दोन- सध्या रा. नेहरू नगर, सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. राहत्या घराच्या लाकडी वाशाला असलेल्या पंख्याला साडीने गळपफास घेतलेल्या अवस्थेत मिथून दिसून आला. तेव्हा शेजारी रहाणारे नाम देव देशमुख आणि श्रीकृष्ण वाघमोडे यांच्या मदतीने त्याला गळफासातून सोडविले. त्यानंतर हवालदार शेख यांनी सकाळी १० वाजता शासकीय रुग्णालयात बेशुध्द अवस्थेत मिथूनला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वी तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## मुख्याधिकारी डॉ. विश्वनाथ वडजेविरुध्द लाच प्रकरणाची दखल घेण्यास न्यायालयाचा नकार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ जुलै -**

माळशिरस नगरपंचायतचे तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. विश्वनाथ वडजे यांच्याविरुद्धच्या लाच प्रकरणाची दखल घेण्यास माळशिरस येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. व्ही. ताम्हणेकर यांनी नकार दिला आहे.



नगरपंचायत माळशिरस बांधकाम विभागाकडून तिरुपती कन्स्ट्रक्शन यांना माऊली चौक माळशिरस ते कचरेवाडी हा रस्ता डांबरीकरणाचे काम मिळालेले होते. सदरचे काम तिरुपती कन्स्ट्रक्शन यांनी तक्रारदारांना सबकॉन्ट्रॅक्टर म्हणून दिलेले होते. तत्कालीन नगरपंचायत मुख्याधिकारी डॉ. विश्वनाथ वडजे यांनी रस्त्याच्या कामाचे बिल तिरुपती कन्स्ट्रक्शन यांच्या बँक खात्यात जमा केल्याच्या बदल्यात मोबदला म्हणून देयकाच्या रकमेपैकी तीन टक्के रक्कम १ लाख रुपये लाचेची मागणी तक्रारदारांकडे केलेली होती. त्यामुळे तक्रारदाराने मुख्याधिकारी डॉ. वडजे यांच्याविरुद्ध पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केलेली होती.

त्यानुसार पुणे लाचलुचपत विभागामार्फत तक्रारदाराच्या तक्रारीची पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली होती. पडताळणी दरम्यान लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न होत असल्याने मुख्याधिकारी डॉ. वडजे यांच्याविरुद्ध पुढील सापळा कारवाई करण्यात आलेली होती. परंतु मुख्याधिकारी डॉ. वडजे यांनी तक्रारदाराकडून रक्कम स्वीकारण्यास नकार दिल्याने त्यांच्याविरुद्धची पुढील सापळा कारवाई रद्द करण्यात आलेली होती. त्यानंतर माळशिरस पोलीस ठाणे येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये मागणी संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सोलापूर लाचलुचपत विभाग यांनी माळशिरस येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये डॉ. वडजे यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणातील तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. विश्वनाथ वडजे यांच्यावतीने ॲड. निलेश जोशी यांनी दोषमुक्तीसाठी व न्यायालयास गुन्हाची दखल घेता येणार नाही असा अर्ज दाखल केलेला होता.

या सुनावणीवेळी आरोपीच्यावतीने ॲड. निलेश जोशी यांनी करून सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे दाखले दिलेले होते. तो युक्तीवाद मान्य करून माळशिरस येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. व्ही. ताम्हणेकर यांनी तत्कालीन मुख्याधिकारी डॉ. विश्वनाथ वडजे यांच्याविरुद्धच्या गुन्ह्याची दखल घेण्यास नकार देऊन दोषारोपपत्र लाचलुचपत विभागाकडे परत पाठवून देण्याचे आदेश केले. सदर प्रकरणात आरोपी डॉ. विश्वनाथ वडजे यांच्या वतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड. ज्ञानेश कचरे (माळशिरस), ॲड. राणी गोडबरलू (गाजुल), ॲड. ओंकार परदेशी, ॲड. मधुश्री देशपांडे, ॲड. तेजस साळुंखे यांनी काम पाहिले.

# लाचखोर झाले उदंड; शिक्षेचे धनी मोजकेच!

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. २६ जुलै -**

गलेलठ्ठ पगार मिळत असतानाही अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी या ना त्या मार्गाचा उपयोग केला जातो. त्यातल्या त्यात सरकारी बाबूंना तर पैसा बघून जणू तोंडाला पाणी सुटते. मात्र, हे करताना त्यांना वाटते की, आपल्याला कोणी पाहतच नाही अन् ते थेट लाचेच्या जाळ्यात अडकतात. गेल्या साडेचार वर्षांत राज्यात ३ हजार ४७० लाचखोरीचे सापळे झाले.

त्यामध्ये ४ हजार ९७७ आरोपींवर गुन्हे दाखल झालेले आहेत. मात्र, यातील फक्त १०६ प्रकरणे शिक्षेपर्यंत पोहचली. त्यामुळे दाखल गुन्ह्यांच्या तुलनेत शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. झालेल्या शिक्षांमध्ये क्लास वन अधिकारी, द्वितीय व तृतीय श्रेणीसह सुमारे १३७ कर्मचाऱ्यांना दोषी मानत न्यायालयांनी शिक्षा सुनावल्या आहेत. दिवसेंदिवस लाचखोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना दुसरीकडे सापळे यशस्वी होत असताना त्याचे रूपांतर शिक्षेत होण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उपलब्ध केलेल्या माहितीच्या आधारे स्पष्ट झाले आहे.



चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापासून विविध विभागांतील वर्ग एकच्या अधिकाऱ्यांपर्यंत लाचेची मागणी केल्याचे प्रकार सापळ्यांच्या माध्यमातून समोर आले आहेत.

महसूल विभाग नेहमीप्रमाणे लाचखोरीत सर्वांत टॉपला आहे, तर त्याखालोखाल पोलिस खात्याचा नंबर लागतो.

**शिक्षा झालेली प्रकरणे...**

| सन | कारवाई | आरोपी | दोषसिध्दी | आरोपी |
|---|---|---|---|---|
| २०२१ | ७७३ | ११०१ | १८ | १९ |
| २०२२ | ७४९ | १०९३ | ३२ | ४२ |
| २०२३ | ८१२ | ११८१ | २१ | २८ |
| २०२४ | ७२१ | १००० | २० | २९ |
| २०२५ | ४१५ | ६०२ | १५ | १९ |

### फितुरीचे प्रमाण वाढण्याची शक्यता...

प्रत्यक्षात गुन्हा दाखल होण्यापासून आरोपपत्र दाखल करण्यास लागणाऱ्या परवानग्या लवकर न मिळणे, यामुळे खटले लांबतात. खटल्याची सुनावणी लांबल्यानदेखील फितुरीचे प्रमाण वाढण्याची शक्यता वाढत असल्याचे अनेकजण सांगतात. परिणामी, गुन्हा सिद्ध होण्यात अडथळे येतात.

### अभियोग पूर्वमंजुरीमध्येही बरीच प्रकरणे...

अभियोग पूर्वमंजुरीसाठीची ३७४ प्रकरणे अद्यापही प्रलंबित आहेत. त्यातील शासनाकडे ९५, तर सक्षम अधिकाऱ्यांकडे २७९ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यातील ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधी उलटल्याची २९४ प्रकरणे प्रलंबित आहेत, तर ९० दिवसांपेक्षा कमी दिवस असल्याची ८० प्रकरणे प्रलंबित आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## श्रीकृष्णासह श्रीरामाचे चरित्र मानवी जीवनाला मार्गदर्शक : हभप बोधले महाराज

### बार्शीत श्रीमद्भागवत कथा चिंतनाला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ जुलै-**

येथील श्री भगवंत मंदिरात श्रावणमासानिमित्त आयोजित २१ व्या प्रवचनमालेस शुक्रवारी, २५ जुलै रोजी भव्य प्रारंभ झाला. ह.भ.प. डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांच्या अमृतवाणीतून 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर पहिल्या सत्रात प्रबोधन झाले. श्रीमद्भागवत पुराणाचे महत्त्व आणि पुराणांचा शास्त्रीय अर्थ विशद करत महाराजांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

प्रवचनापूर्वी श्री भगवंत मंदिरात श्रीमद्भागवत पुराण ग्रंथाचे पूजन भगवंत देवस्थान ट्रस्टचे सरपंच श्री. दादा बुडुख आणि शैलजाताई बुडुख यांच्या हस्ते झाले. मंदिराचे पुजारी योगेश बडवे, सुशांत बडवे यांनी ग्रंथपूजा आणि मंत्रस्तवन केले. प्रा. विलास जगदाळे यांनी प्रस्ताविकात प्रवचनमालेच्या २१ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा आढावा सादर केला. यंदा २५ जुलैपासून सुरु झालेली ही प्रवचनमाला श्रावणात महिनाभर भक्तांना प्रबोधनाचा लाभ देईल.

डॉ. जयवंत महाराजांनी श्रीमद्भागवत पुराण हे 'महापुराण' असल्याचे सांगितले. पद्मपुराणात वेद जाणणारा श्रेष्ठ, पण पुराण जाणणारा सर्वश्रेष्ठ असतो, असे त्यांनी नमूद केले. पुराण या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना ते म्हणाले, पुराण म्हणजे पूर्वीच्या परंपरांचे वर्णन, जे पुरातन असूनही आजच्या काळात नवीन आणि प्रेरणादायी वाटते. श्रीकृष्ण आणि श्रीराम यांचे चरित्र उदाहरणादाखल देत ते म्हणाले, ही चरित्रे आजही आपल्या आचरणात आणि भावनेत जिवंत आहेत.

महाराजांनी पुराणाची शास्त्रशुद्ध पाच लक्षणे सविस्तर सांगितली: १) 'सर्ग' -विश्वाच्या उत्पत्तीचे वर्णन. २) 'प्रतिसर्ग' विश्वाच्या प्रलयाचा उल्लेख. ३) 'वंश': वंशविस्ताराचा विचार. ४) 'मनवंतर' कालानुरुप होणारी स्थित्यंतरे. ५) 'वंशानुचरितम' त्या काळातील महान विभूतींच्या चरित्रकथा. या लक्षणांमुळे पुराण मानवी जीवनाला मार्गदर्शन करते, असे त्यांनी प्रतिपादन केले. वेदात परमात्म्याच्या निर्गुण रुपाचे वर्णन आहे, तर पुराणात सगुण आणि निर्गुण दोन्ही रूपांचा समावेश आहे, असे महाराजांनी सांगितले. पुराण ऐकणारा सगुण आणि निर्गुण तत्त्वांचे अनुसरण करतो. परमात्मा हा ज्ञानस्वरूप आहे, आणि जो हे समजतो तो खरा ज्ञानी, असे त्यांनी सांगितले. महर्षी व्यासांनी रचलेल्या १८ पुराणांपैकी श्रीमद्भागवत पुराणाला महापुराण म्हणून विशेष स्थान आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. महाराजांच्या ओघवत्या वाणीने आणि सखोल चिंतनाने उपस्थितांवर गहिरा प्रभाव पडला. प्रवचन ऐकताना मनाला शांती आणि जीवनाला दिशा मिळाली, असे एका भक्ताने सांगितले. मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

ही प्रवचनमाला श्रावण महिनाभर दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत श्री भगवंत मंदिरात होणार आहे. डॉ. जयवंत महाराज पुढील सत्रांत श्रीमद्भागवत पुराणातील कथा, तत्त्वज्ञान आणि जीवनाला लागू पडणारे मार्गदर्शन सादर करतील. बोधवाणी परिवाराने सर्वांना या प्रवचनमालेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. श्रीमद्भागवत कथा ऐकून जीवनातील सत्य आणि परमात्म्याचे स्वरूप समजून घ्या, असे आवाहन आयोजकांनी केले.

# पहिल्या दिवशी आठ स्मशानभूमींची स्वच्छता

## महापालिकेची स्वच्छता मोहीम ५.०; २२ टन कचरा केला संकलित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**



महापालिकेची स्वच्छता मोहीम ५.० अंतर्गत शहरात असलेल्या स्मशानभूमीमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

मोहिमेच्या पहिल्या दिवशी एकूण १०८ कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ८ स्मशानभूमीची स्वच्छता करण्यात आली. एकूण २२ टन कचरा संकलित करण्यात आला. यामुळे स्मशानभूमीचे चित्र बदलल्याचे दिसून येत आहे.

सोलापूर शहरात असलेल्या स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्काराच्या वेळी वापरण्यात आलेल्या साहित्य तसेच तेथील झाडामुळे निर्माण होणारा कचरा पावसामुळे जागेवर कुजून त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असते. यामुळे आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवि पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १ ते ८ विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या स्मशानभूमीच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या स्वच्छता मोहिमेच्या आज पहिल्या दिवशी एकूण ८ स्मशानभूमीची स्वच्छता करण्यात आलेली आहे.कारंबा नाका, रूपाभवानी, दहीटणे, शेळगी, अक्कलकोट हिंदू स्मशानभूमी, मजरेवाडी-साखर कारखाना, सोरेगाव व देगाव येथील स्मशानभूमी येथे स्वच्छता करण्यात आलेली आहे. दैनंदिन कचरा संकलना व्यतिरिक्त आज घेण्यात आलेल्या मोहिमेमध्ये एकूण १८ ते २२ टन इतका कचरा संकलित करण्यात आला.जेसीबीच्या साह्याने स्मशानभूमी परिसरातील झाडी, झुडपे काढली. साचलेली माती हटविण्यात आली.

**१०८ कर्मचारी, तीन जेसेबी, एक डम्पर अशी यंत्रणा कार्यरत**

या मोहिमेमध्ये एकूण १०८ कर्मचारी, ३ जेसेबी व १ डम्पर अशी यंत्रणा कार्यरत राहणार आहे. महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी, सफाई अधीक्षक, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व अवेक्षक यांचे नियंत्रणाखाली सर्व झाडूवाला/झाडूवाली, बिगारी, सफाई कामगार, मजूर यांचे समन्वयाने ही मोहीम राबविण्यात आली.

## अनुभव प्रतिष्ठानचे अनुभव रत्न पुरस्कार जाहीर

### रविवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

अनुभव प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारे अनुभव रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश भाईकट्टी यांनी दिली.

श्रावण मास निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. रविवार लोकमान्य टिळक सभागृह (ॲम्पीथेटर), हिराचंद नेमचंद वाचनालय , हुतात्मा बागेसमोर, सोलापूर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुनीता देगावकर, पत्रकार उमेश कदम, प्राथमिक गांधी आश्रम शाळचे माजी अधीक्षक संजीव ढोपरे गायत्री क्लासेसच्या संचालिका अंबिका पाटील-टक्कलकी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळयास सर्व सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष महेश भाईकट्टी, शिवानंद नागणसुरे, गणेश येळमेली, सोमनाथ कालदीप, संतोष शिवशिंपी, महेश कासट,शिवानंद भाईकट्टी, मंगेश कुलकर्णी, गणेश कालदीप, सचिन लोणी, अभिषेक दुलंगे यांनी केले आहे.


**हे आहेत पुरस्काराचे मानकरी**

राहुल बिराजदार (समाजसेवक) अनीश सहस्त्रबुद्धे (उद्योजक) दौला ठेंगिल (डॉक्टर),प्रशांत जोशी (पत्रकार) अश्विनी तडवळकर (कलाक्षेत्र),संगीता गोटे (शिक्षिका), योगेश हवले(डेव्हलपर्स),अभिषेक शिरसीकर (वकील) श्वेता धर्माधिकारी (महिला पोलिस) आदी या पुरस्काराचे मानकरी आहेत. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## प्रा. दुर्गा जोशी यांना ज्ञान विकासरत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

समृद्धी पर्यटन व सांस्कृतिक मंडळ मुंबई यांच्या वतीने साहित्य व अध्यापन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल



राज्यस्तरीय ज्ञानविकास रत्न पुरस्कार प्रा. दुर्गा जोशी यांना जाहीर झाला आहे. त्यांना यापूर्वी देखील अनेक पुरस्कार मिळाले असून त्यांचे अनेक स्तरातून कौतुक आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तीन ऑगस्ट रोजी कोल्हापूर येथे हा पुरस्कार त्यांना देण्यात येणार आहे.

## मेहता शाळेत प्रज्ञाशोध परीक्षेचा बक्षीस वितरण समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

कै.वि.मो. मेहता प्राथमिक शाळेत प्रमुख अतिथी सरस्वती कोळी व मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय ए.टी.एस. प्रज्ञाशोध परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. परीक्षेस शाळेतील ४५८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ८७ विद्यार्थ्यांनी केंद्र, जिल्हा तसेच राज्याच्या यादीत स्थान मिळवत घवघवीत यश संपादन केले. या सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनीही



यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन मधुरा छत्रे यांनी केले. तर आभार शीतल जालिमिंचे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचा वर्धापन दिन साजरा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

प्रजनन आरोग्य आणि कुटुंब कल्याण क्षेत्रात ४० शाखा व ५ प्रकल्पाच्या माध्यमातून देशाच्या १८ राज्यांमध्ये काम करणाऱ्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया या स्वयंसेवी संस्थेचा ७६ वा वर्धापन दिन फॅमिली प्लॅनिंगच्या सोलापूर शाखेत मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून फॅमिली प्लॅनिंगचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष व जीवन गौरव पुरस्कार विजेते प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते तर अध्यक्षस्थानी डॉ. राजीव प्रधान हे होते.

यावेळी एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेच्या वाटचालीत मोलाचे योगदान दिले, संस्थेचा नावलौकिक वाढविलेले, फॅमिली प्लॅनिंगही सर्व सामान्यांची संस्था आहे अशी भावना तयार करण्यात योगदान दिलेल्या संस्थापक सचिव डॉ. भालचंद्र किणीकर, माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. जी. अहिरे, जेष्ठ उपाध्यक्ष डॉ. संपत बलदवा, रमणलाल सोनीमिंडे, कार्यकारणी सदस्या डॉ. गौरी कहाते, सदस्य संगमेश्वर रघोजी, सिद्राम कोथली, युवा प्रतिनिधी साक्षी सर्वगोड, ऐश्वर्या सावंत, सोलापूर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण संस्थेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट व कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र, शॉल व बुके देऊन डॉ. येळगावकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ सदस्यांनी संस्थेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला तर डॉ. गौरी कहाते यांनी अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर यांच्याकडून गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधासाठी ९ ते १४ वयोगटातील ५० मुलींना मोफत एच.पी.व्ही. लस देण्यासाठी रू. ६२,५००/- च्या देणगीचा धनादेश सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांच्याकडे सुपूर्द केला. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी संस्थेत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांविषयी व शाखेचे कार्यकारिणी मंडळ व कर्मचाऱ्यांच्या कार्यामुळे सोलापूर शाखेचे राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक वाढल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी डॉ. राजीव प्रधान यांनी अध्यक्षीय समारोप केला. सूत्रसंचालन शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक डॉ. एन. बी. तेली यांनी केले तर आभार डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले.

## 'मुंबई लोकल' १ ऑगस्टपासून संपूर्ण महाराष्ट्रात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकलच्या प्रवासात झालेल्या नजरानजरेपासून आयुष्य बदलणाऱ्या घटनेपर्यंतचा रंजक प्रवास मुंबई लोकल या चित्रपटातून उलगडणार आहे.

नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सुप्रसिद्ध अभिनेता, निर्माता स्वप्निल जोशी यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आला. मुंबई लोकल या चित्रपटाचं लेखन, दिग्दर्शन अभिजीत यांनी केलं आहे. बिग ब्रेन प्रॉडक्शन्स, आनंदी एंटरटेनमेंट आणि स्प्लेंडिड प्रॉडक्शन्सने या चित्रपटाची निर्मिती केली असून निलेश राठी, प्राची राऊत, सचिन अग्रवाल आणि तन्वी माहेश्वरी यांनी 'मुंबई लोकल' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर त्र्यंबक डागा हे सहनिर्माते आहेत. प्रथमेश परब, ज्ञानदा रामतीर्थकर ही नवी फ्रेश जोडी प्रमुख भूमिकेत असलेला हा चित्रपट १ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होत आहे.

## रॉबिन हूड आर्मीच्या वतीने ७८ लाख लोकांना जेवण देण्याचा संकल्प

### सोलापुरात १ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविणार विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

रॉबिन हूड आर्मीच्या वतीने मिशन संकल्प ७८ अंतर्गत स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून देशभरात ७८ लाख लोकांना जेवण तर देशभरामध्ये ७८ सार्वजनिक ठिकाणी बदल घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सोलापूरमध्येही दि. १ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये गरजूंना एक वेळचे जेवण, गरजू कुटुंबांना एक महिन्याचा किराणा आणि महापालिकेच्या एका शाळेची सुधारणा करून देण्यात येणार आहे, अशी माहिती हिंदुराव गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आठ वर्षामध्ये एकही दिवस सुट्टी न घेता दररोज तीनशे लोकांना जेवण तर आतापर्यंत आठ लाख पेक्षा जास्त गरजुंना एक वेळचे जेवण व पाच हजार पेक्षा जास्त गरजू कुटुंबाना धान्य किटच्या रूपात मदत करण्यात आली आहे. यंदाच्या वर्षी स्वातंत्र्य दिनानिमित्त प्राप्त अन्नपदार्थ व किराणा साहित्य ज्यामध्ये पाच किलो गहू, तीन किलो तांदूळ, दोन किलो डाळ आदी किटच्या स्वरूपात स्वीकारून शहर व ग्रामीण भागातील एकल महिला, अपंग, कुटुंब, घरातील करता पुरुष आजारी असल्यामुळे खचलेले घर व आर्थिक दृष्टीने अडचणीत असणाऱ्या कुटुंबाना मदत केली जाणार आहे. उपक्रमामध्ये मदत देण्यासाठी ३० जुलै २०२५ ही अंतिम मुदत असून, मदत करण्यासाठी ८९७१९६६१६४ या व्हाट्सअॅप नंबरवर कळ पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी अपूर्व जाधव, अर्चना आघाव, बेनझीर काझी, ओंकार अतनुरे, अनिरुद्ध कदम, प्रदीप कोटा आदी उपस्थित होते.



## थोरला मंगळवेढा तालीम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ उत्सव अध्यक्षपदी सुजित खुर्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

थोरला मंगळवेढा तालीम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ उत्सव अध्यक्षपदी सुजित खुर्द तर कार्याध्यक्षपदी नागेश दहीहंडी यांची निवड करण्यात आली.

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा आधारस्तंभ तथा शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मनपा शिक्षण मंडळ माजी सभापती तथा कुशल संघटक संकेत पिसे व मंडळाचे सर्व ज्येष्ठ सल्लागार यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार दि. २५ जुलै रोजी संपन्न झाली.

थोरला मंगळवेढा तालीम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे ज्येष्ठ हलगी वादक स्व.अर्जुन आवळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

नूतन पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी परमजीत कदम, योगेश चोपडे, सचिव ओंकार शुक्ला, खजिनदार समीर मुजावर, कुणाल दीक्षित, मिरवणूक प्रमुख विशाल चव्हाण, पूजा प्रमुख सचिन काळे, महेश गायकवाड, प्रसिद्धी प्रमुख अमोल मिस्कीन, विशाल चंदेले यांच्या निवडी करण्यात आल्या. यावेळी प्रताप चव्हाण, सदानंद येलूर, प्रकाश खुणे, पृथ्वीराज दीक्षित, प्रकाश अवस्थी, सुनील शेळके, सागर पिसे, शैलेश पिसे आदी मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष- |
| दि. २७ जुलै २०२५ | आदित्य पूजन |
| विक्रम संवत् २०८२ | चांगला दिवस |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. तृतीय (२२.४१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मघा (१६.२२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वरियान (२७.१२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१०.३६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल. प्रवासाचा योग संभवतो.

**वृषभ** : आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या. जास्त ताण घेऊ नका.

**मिथुन** : मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल. विचार बदलतील. एखादा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह** : मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या** : आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ** : एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता.

**वृश्चिक** : धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु** : कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल.

**मकर** : संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ** : इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील.

**मीन** : एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल. जीवनात यशस्वी व्हाल.

## बेलाटीत गर्भसत्य लघुपट प्रदर्शित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

बेलाटी येथील मंगल प्रताप स्त्री आरोग्य केंद्रात महिलांच्या संपूर्ण आरोग्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. या केंद्रातर्फे तयार करण्यात आलेला गर्भसत्य हा लघुपट प्रदर्शित करण्यात आला आहे, अशी माहिती डॉ. प्रिया चौहान यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गर्भाशयाबाबत माहिती देणारी गर्भसत्य ही डॉक्युमेंटरी संदीप जाधव यांनी तयार केली आहे. या केंद्राचे काम कम्युनिटी मेडिसन मध्ये एमडी झालेल्या डॉ. कुसुम मोरे तसेच डॉ. प्रिया चौहान करीत आहेत. या पत्रकार परिषदेस डॉ. अजय चौहान, संदीप जाधव, प्रतापसिंह परदेशी, डॉ. कुसुम मोरे, डॉ. शोभा शहा, संदीप जव्हेरी आदी उपस्थित होते.

# यंदा मार्कंडेय महामुनी दर्शनाचे होणार थेट प्रक्षेपण

## पद्मशाली वर्ल्डवाइड, मार्कंडेय फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या सहकार्याने पद्मशाली वर्ल्डवाइड, श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन आणि पद्मशाली सखी संघम यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूरसह देश आणि विदेशातील पद्मशाली समाज बांधवांसाठी यंदाच्या वर्षी '४ श्रावण सोमवार' आणि 'नारळी पौर्णिमा' (रक्षा बंधन) या खास दिवशी घरबसल्या श्री मार्कंडेय मंदिरातून महर्षी मार्कंडेय महामुनींच्या दर्शनाची आणि विधीवत महापूजेची थेट प्रक्षेपणाद्वारे (Live Streaming) व्यवस्था करण्यात आली आहे.



हा उपक्रम फेसबुकच्या माध्यमातून सादर करण्यात येणार असून, भारतासह ३० पेक्षा अधिक विदेशांतील पद्मशाली बांधवांना कुलदैवत महर्षी मार्कंडेय महामुनींचे दर्शन घेण्याची आणि भक्तिभावाने सहभागी होण्याची संधी यातून मिळणार आहे.

उपक्रमामागे गौरीशंकर कोंडा यांची संकल्पना असून, याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अनुप मुरलीधर अल्ले व ब्रदर्स, श्री मार्कंडेय सोशल फाऊंडेशनचे पदाधिकारी - सदस्य, पद्मशाली सखी संघमच्या महिला पदाधिकारी -सदस्यांचा सहभाग आहे. तसेच श्री मार्कंडेय मंदिराचे पुरोहित राघवेंद्र आरकाल यांचेही विशेष सहकार्य मिळत असून अधिक माहितीसाठी ९१९०२१५५१४३१ या क्रमांकावर संपर्क साधावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**थेट प्रक्षेपणाची वेळ आहे अशी**

पहिला श्रावण सोमवार २८ जुलै; दुसरा सोमवार ४ ऑगस्ट; तिसरा सोमवार ११ ऑगस्ट; नारळी पौर्णिमा (रक्षा बंधन) ९ ऑगस्ट (सकाळी ४ ते ६ या वेळेत) आणि चौथा व अंतिम सोमवार - १८ ऑगस्ट या चारही सोमवारी सकाळी ६.१५ ते ७ दरम्यान थेट पूजेसह दर्शन घेता येणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

# जिल्ह्यात लम्पीमुळे १७ जनावरांचा मृत्यू

## ७२१ जनावरे झाली बरी; पशुसंवर्धनचे संपर्काचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

जिल्ह्यातील ९ तालुक्यात लम्पी त्वचारोगाचा फैलाव वाढत असून आतापर्यंत १७ जनावरांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात १ हजार ३० जनावरांना या आजाराची लागण झाली असून ७२१ जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत. सध्या २९२ जनावरे या आजाराने बाधित असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पशुसंवर्धन विभागाकडून लसीकरण, उपचार व विलगीकरण यासह विविध उपाय राबविण्यात येत आहेत. येत्या काळात बाधित जनावरांची संख्या कमी करण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. लम्पी हा विषाणूजन्य आजार डास आणि माश्यांद्वारे गाय व म्हैस यांना होतो. या आजारात जनावरांच्या त्वचेवर गाठी, ताप आणि दुधाचे उत्पादन कमी होणे अशी लक्षणे दिसतात. पशूसंवर्धन विभागाने बाधित जनावरांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले असून, लसीकरण मोहीम तीव्र करण्यात आली आहे. ज्या जनावरांचे लसीकरण बाकी आहे, त्यांना तातडीने लस देण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, पशुसंवर्धन विभागाकडून लम्पी नियंत्रणासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. यामध्ये बाधित क्षेत्रात जैवसुरक्षा उपाय, जनावरांचे विलगीकरण आणि लसीकरणावर भर दिला जात आहे. जनावरांमध्ये लम्पीची लक्षणे आढळल्यास पशूपालकांनी तातडीने नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधण्याचे आवाहन पशूसंवर्धन विभागाने केले आहे.

**अशी घ्या काळजी**

बाधित जनावरांना सामान्य जनावरांपासून वेगळे ठेवा. गोठा वारंवार निर्जंतुक करा. संध्याकाळी कडुलिंबाचा पाला जाळून धूर करा. डास, माश्या जास्त येणार नाहीत याची काळजी घ्या. लसीकरण केले नसल्यास लसीकरण करून घ्यावे.

**प्रभारी जिल्हाधिकाऱ्यांनी काढला आदेश**

जिल्ह्यातील नऊ तालुक्यांमध्ये लम्पीचा फैलाव झाला असून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून त्या परीसरातील जत्रा, जनावर प्रदर्शन व शर्यती यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे. जनावरांची ने-आण करताना लसीकरण प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आल्याचे आदेश प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी काढले आहेत.

जिल्ह्यातील जनावरांना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मान्सूनपूर्व लसीकरण करण्यात आले आहे. जनजागृतीसाठी गावोगावी मोहिम राबवले जात आहेत. लम्पीचे लक्षणे आढळल्यास शेतकऱ्यांनी घाबरून न जाता पशूसंवर्धन अधिकार्यांशी संपर्क साधावे. लसीकरण आणि वेळीच उपचार केल्यास हा आजार नियंत्रणात येऊ शकतो.

- डॉ. विशाल येवले,
जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, सोलापूर

# अक्कलकोटमध्ये दमदार पाऊस; बळीराज सुखावला

## खरीप पिकांना जीवदान; कुरनूर धरणात विसर्ग वाढला

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ जुलै-**

अक्कलकोट तालुक्यात गेल्या दीड महिन्यापासून दडी मारलेल्या पावसाने गेल्या चार दिवसांपासून दमदार बरसात केल्याने बळीराजा सुखावला आहे.

पावसाअभावी खरीप हंगाम धोक्यात आला होता. पण सलग पाऊस पडत असल्याने खरीप हंगामातील पिके काही अंशी उत्पदनावर परिणाम होणार असला तरी हंगाम वाया जाण्याची भिती टळली आहे असे मत कृषी तज्ञ बाजार समितीचे माजी उपसभापती अप्पासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. तालुक्यात यावर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वीच मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली होती. या मान्सूनपूर्व पावसाचा आधार घेत बळीराजांनी खरीप हंगामातील पिकांची पेरणी उरकून घेतली होती तालुक्यात खरीप हंगामातील शंभर टक्के पेरणी झाली आहे. यामध्ये उडीद, मूग, सोयाबीन, तूर, कांदा, ऊस आदी पिकांची मोठ्या प्रमाणात पेरणी व लागवड करण्यात आली आहे. ऐन खरीप पिके बहरत आल्यानंतर गेल्या एक-दीड महिन्यापासून पावसाने पाठ फिरवल्याने बळीराजा चिंतातूर झाला होता. काही भागात खरीप पिके ही पावसाअभावी करपून जात होती. हजारो रुपयांचा खर्च करून पिके ही हातातोंडाशी आलेली असताना पावसाअभावी करपून जाण्याच्या परिस्थितीत होती. यामुळे शेतकरी बांधव हातबल होऊन पावसाची चातक पक्षाप्रमाणे वाट पाहत होता. पण गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पावसाने बरसात केल्याने खरीप पिकांना जीवदान मिळाले आहे. तालुक्यातील शेतीमध्ये पाणी साचले असून खरीप पिके ही जोमाने भरली आहेत. उडीद, मूग, तूर, सोयाबीन या पिकांना सततच्या पावसामुळे उभारी मिळाली असून रानावनात सृष्टीने जणू हिरवी झालर पांघरल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. तालुक्यातील नदी, नाले, ओढे यांना सततच्या मुसळधार पावसामुळे पाणी आले आहे. तर कुरनुर धरणात मोठ्या प्रमाणात मराठवाड्यातून पाण्याचा विसर्ग वाढला आहे. यामुळे कुरनूर शंभर टक्के भरल्यानंतर धरणातून पाणी सोडण्याच्या हालचाली सुरू आहेत. सतत पावसामुळे तालुक्यातील छोटे पूल पाण्याखाली गेल्याने अनेक गावातील नागरिकांना तसेच आबालवृद्धांना पाण्यातून वाट काढत जावे लागत आहे.



# तांदूळवाडीत कृषीदुतांकडून ऊस बीज प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२६ जुलै-**

तांदुळवाडी (ता. माळशिरस) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित अकलूजच्या रत्नाई कृषी म हाविद्यालयातील कृषिदूतांकडून ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

ऊस बीज लागवडीपूर्वी ऊसाचे बेणे (टुकडे) बुरशीनाशक आणि कीटकनाशकांच्या द्रावणात बुडवून घ्यावे, यामुळे रोगांचा प्रादुर्भाव कमी होत असतो असे प्रात्यक्षिकांसह शेतकऱ्यांना म ार्गदर्शन केले. यावेळी बाविस्टीन बुरशीनाशकाचा वापर करून ऊसाच्या सेट्सवरील बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण मिळवता येते अशी माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना ऊस बेणे प्रक्रिया यावर माहिती दिली. ऊस पिकातील रोगांवर नियंत्रण कसे करावे तसेच आवश्यकतेनुसार रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर, पिकाच्या वाढीच्या अवस्थेत आवश्यकतेनुसार खुरपणी आणि बांधणी करावी याची माहिती दिली. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, रत्नाई कृषी म हाविद्यालयाचे प्राचार्य आर.जी. नलावडे, प्रा. एस.एम.एकतपुरे, प्रा.एम.एम.चंदनकर, विषयतज्ञ डॉ. डी.एस.ठवरे यांचे मार्गदर्शन लाभले. कृषीदूत अविराज पवार, श्रीधर मारकड, सुयश बागल, संदेश मोरे, अनिकेत चव्हाण, महेश गंगथडे, प्रथमेश चव्हाण, विवेक थोरात यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. हे प्रात्यक्षिक तांदूळवाडी येथील प्रगतशील शेतकरी किसन गायकवाड यांच्या शेतामध्ये घेण्यात आले.

# कौशिक आश्रमतर्फे रविवारी रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

पुण्यातील कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान या संस्थांच्या वतीने रविवारी, २७ जुलै रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चतुर्थ सरसंघचालक प्रो. राजेंद्रसिंहजी उर्फ रज्जूभय्या यांच्या स्मृतिदिनानिमित्त हे शिबिर आयोजित करण्यात येते.

मित्रमंडळ कॉलनीतील कौशिक आश्रम येथे हे शिबिर होणार असून रविवारी सकाळी आठ वाजता शिबिराचे उद्घाटन होईल. ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक बबन पोतदार, प्रथितयश स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. लीना पाटणकर आणि संघाच्या पश्चिम म हाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. डॉ. सुरेश जाधव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल. हे शिबिर सायंकाळी पाचपर्यंत सुरू राहील. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्र सोलापूर आणि जनकल्याण रक्तकेंद्र पुणे यांच्या सहयोगाने हे शिबिर आयोजिण्यात आले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील राऊत यांनी केले आहे.



# कृषी कन्यांनी केले ठिबक सिंचनचे प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २६ जुलै-**

वाडी कुरोली (ता. पंढरपूर) येथील शिक्षण प्रसारक मंडळ अकलुज संलग्न रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्षातील कृषी कन्यांनी वाडी कुरोली परिसरात ठिबक सिंचनाची माहिती

यामध्ये विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे तोटे फायदे, महत्त्व, घटक व वेगवेगळ्या शासनाकडून मिळणारी स्कीम याबद्दल माहिती दिली ठिबक सिंचन म्हणजे पाण्याची बचत करणारी एक पद्धत आहे ज्यामध्ये पिकांच्या थेट मुळाशी पाणी दिले जाते यात पाण्याच्या नळ्या व ड्रीपर वापरून पाण्याची बचत केली जाते ज्यामध्ये पाण्याची कार्यक्षमता वाढते व पाण्याची बचत होते यातून विद्यार्थिनींनी पाण्याची बचत करण्याची व कमी पाण्यात उत्पन्न घेण्याची सल्ला दिले. या अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते-पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. जी. नलवडे, प्रा. एम.एस. एकतपुरे, कार्यक्रम समन्वयक अधिकारी प्रा. एम एम चंदनकर कार्यक्रम अधिकारी एच.व्ही. कल्याणी व विषयतज्ज्ञ प्रा. एम. एम. चंदनकर यांच्या मार्गदर्शनानुसार कृषिकन्या श्रुती पाटोळे भोईटे योगिता, जगदाळे सानिका, शिखरे प्रतीक्षा कहाकर साक्षी रेड्डी रोहिणी देशमुख प्रणोती घुले तनुजा, वैशाली खिलारी यांनी ठिबक सिंचनाचे महत्त्व पटवून दिले



# लक्ष्मी विद्यामंदिर येथे कारगिल विजय दिवस साजरा

**टेंभूर्णी, दि.२६ जुलै-**

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाज सेवा मंडळ संचलित, लक्ष्मी आनंद विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज टेंभुर्णी येथे २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच मान्यवराचे ग्रंथभेट देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त भारतीय लष्कर अधिकारी पंकज मोहिते उपस्थित होते. ते बोलताना म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याला लष्करी सेवेत जाता येईल असे नाही; परंतु शक्य असेल त्या प्रमाणात प्रत्येक क्षेत्रामध्ये जाऊन विद्यार्थ्यांनी आपल्या भारत मातेची आणि सर्व बांधवांची सेवा केली पाहिजे. हे देखील एक प्रकारचे राष्ट्रप्रेमच आहे. तसेच प्रशालेचे प्राचार्य विकास करळे यांनी देखील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात जाऊन आपापल्या कार्याची चुणूक दाखवून देण्याची व आपलं आपल्या प्रशालेच आपल्या गावाचं व पर्यायाने देशाचं नाव मोठं करण्याचे आव्हान देखील यावेळी त्यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी पंकज मोहिते, प्राचार्य विकास करळे उपस्थित होते. सूत्रसंचालन वजाळे तर आभार अडाणे यांनी मानले.

# वेळापूर आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करा

## ग्रामस्थांची मागणी; रिपाइंचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२६ जुलै-**

वेळापूर (ता.माळशिरस) येथील विस्तार लक्षात घेता एक सक्षम आरोग्य सेवा गरजेची असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याची मागणी ग्राम स्थांतून आहे. याबाबत रिपाई आठवले गटाच्या वतीने निवदेनही देण्यात आले आहे. १५ ऑगष्टपूर्वी कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

वेळापूर ग्रामपंचायतीने यापूर्वीच एकमताने ठराव करुन आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याची मागणी संबंधित यंत्रणांकडे पाठवली होती. याबाबत अनेक वेळा आरोग्य विभाग, जिल्हा परिषदेचे अधिकारी,तसेच तत्कालीन व विद्यमान पालकमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे. मात्र, प्रशासनाकडून याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे निवेदनद्वारे मागणी केली आहे. या निवेदनात ग्रामस्थांच्या भावना व्यक्त करत, वेळ न दवडता आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात किंवा ट्रॉमा केअर युनिटमध्ये रूपांतर करण्याची मागणी करण्यात आली आहे. १५ ऑगस्टपूर्वी आरोग्य केंद्राच्या उन्नतीसाठी ठोस पावले उचलली गेली नाहीत तर वेळापूर गावातील एसटी स्टँडसमोर राष्ट्रीय महामार्गावर तीव्र रास्ता रोको आंदोलन छेडले जाईल असा इशारा तालुकाध्यक्ष सरतापे यांनी दिला. यावेळी तालुका संपर्क प्रमुख अण्णासाहेब भोसले, लोकनेते प्रतिष्ठान अध्यक्ष जुलकर शेख, तुषार केंगार उपस्थित होते.

आरोग्य ही मूलभूत गरज असून वेळापूरसारख्या महत्त्वाच्या गावातील नागरीकांना आजही जिल्हा रुग्णालय किंवा इतर ठिकाणी जावे लागते हे दुर्दैव आहे. आम्ही आरोग्य सेवेसाठी शांततेत लढा देत आहोत पण आता संयमाचा अंत होत चालला आहे.

**- मिलिंद सरतापे**
तालुकाध्यक्ष रि.पा.इं.(आठवले गट).

# माळशिरसमध्ये 10 लाख वृक्ष लागवड करणार : आ. जानकर

## ग्रामीण कृषी पर्यटन केंद्रात बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २६ जुलै-**

माळशिरस तालुक्यात म हात्मा गांधी राष्ट्रीय फळबाग लागवड योजनेअंतर्गत १० लक्ष वृक्ष लागवड करण्याचा संकल्प डोळ्यांसमोर ठेऊन ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र चिंचणी, (ता. पंढरपूर) येथे एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आ. उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या बैठकीला कृषी विभागाचे अधिकारी, रोजगार हमी योजनेचे अधिकारी, विविध गावचे ग्राम पंचायत अधिकारी, रोजगार सेवक, माळशिरस तालुक्यातील आजी माजी लोकप्रतिनीधी, सरपंच, उपसरपंच उपस्थित होते.

बैठकीचा मुख्य उद्देश वृक्षारोपण मोहिमेची अंम लबजावणी प्रभावीपणे कशी करता येईल, यावर चर्चा करणे हा होता. वृक्षांची निवड, लागवडीसाठी योग्य भूखंड, पाणी व संरक्षणाची व्यवस्था, तसेच जनजागृती व सहभाग यावर भर देण्यात आला. आ. जानकर म्हणाले, सर्व संबंधित अधिकाऱ्यांना आणि उपस्थित प्रतिनिधींना कार्यप्रणालीबाबत स्पष्ट सूचना देऊन विशेषतः स्थानिक लोकसहभाग वाढवून वृक्षांचे संगोपन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते बोलताना पुढे म्हणाले की माळशिरस तालुक्यात होणाऱ्या वृक्षारोपणामध्ये जास्तीत जास्त फळांची रोपे लावावीत, त्याचबरोबर वड, पिंपळ, कारंजे, ही रोपे लावणे गरजेचे आहे. आपण जे काम करतो ते मनापासून केल्यास निश्चित यश मिळते, वृक्षारोपण बाबत सर्वांनी मिळून एकजुटीने प्रयत्न करूयात ज्या ठिकाणी अडचणी येतील त्या सोडवण्याचे काम मी करेन पण माळशिरस तालुक्यात दहा लाख झाडे वृक्षारोपण झाले पाहिजे, असेही जानकर म्हणाले.




## महत्त्वाचे...



# वक्तृत्व स्पर्धेत श्रेयश नष्टे प्रथम

**बार्शी, दि. २६ जुलै-**

बार्शी तालुका इंग्लिश टीचर असोसिएशन आणि यश कल्याणी सेवाभावी संस्था, करमाळा यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये श्रेयश सुनील नष्टे याने ५ वी ते ६ वी गटातील ४० स्पर्धकांमधून प्रथम क्रमांक मिळवला असून करमाळा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. श्रेयश नष्टे याने My parents या विषयावर आपले विचार मांडले. श्रेयश हा महात्मा फुले विद्या मंदिरचा विद्यार्थी असून त्यास शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक तसेच आई-वडिलांचे मार्गदन लाभले.



# नूतन सरपंच शिंदे यांचा सन्मान

**वेळापूर, दि. २६ जुलै-**

मांडवे ग्रामपंचायत सरपंचपदी तात्याबा शिंदे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान आफ उत्तमराव जानकर यांनी वेळापूर गरुड बंगला येथे केलाफ याप्रसंगी माजी सरपंच कुमार पाटील,माजी सरपंच तानाजी आबा पालवे, जेष्ठ नेते पांडुरंग साळुंखे, दीपक माने देशमुख, सोसायटीचे चेअरमन ज्ञानदेव पाटील, ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल पालवे, माजी उपसरपंच सहदेव खोमणे, ग्रामपंचायत सदस्य सुनील खुडे, ग्रामपंचायत सदस्य नाथा सिद, विजय कोल्हारे, मुन्ना ढोबळे उपस्थित होते.



# पिलीव येथील सिद्धीविनायक मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी गणेश लेंगरे

**पिलीव, दि. २६ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सिद्धीविनायक गणेश मित्र मंडळाच्या २०२५ साठी नूतन पदाधिकारी निवडीसाठी सर्व सभासदांची बैठक बोलाविणयात आली होती. यावेळी सर्वानुमते अध्यक्षपदी गणेश अर्जुन लेंगरे यांची उपाध्यक्षपदी रवि भैस, सचिवपदी रवि सुळे, सहसचिवपदी विशाल मेटकरी, मिरवणूक प्रमुखपदी बिनु पाटील व विकास पाटील तर खजिनदारपदी रणजित मदने व राहुल खुर्द यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आली. यावेळी माजी सरपंच अमोल मदने, सागर मेटकरी, दादासाहेब मदने, विश्वास तांबवे, माजी अध्यक्ष तुषार माळी, नागेश कोळेकर, मंगेश वाघमारे, अमोल कदम, सुनिल मदने, भाऊ लेंगरे, सुधीर मदने, मदने, खुर्दपाटील उपस्थित होते. निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा माजी सरपंच अमोल मदने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



# आदर्श सैनिक स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस साजरा

**कुर्डुवाडी, दि. २६ जुलै-**

आदर्श सैनिक स्कूलमध्ये १९९९ मधील कारगिल युद्धात शूरवीर भारतीय जवानांनी दिलेल्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. यानंतर आदर्श सैनिक स्कूलच्या छोट्या सैनिकांनी शहीद जवानांना शस्त्र सलामी दिली. कॅडेट्सनी सन्मान गार्ड, रायफल ड्रिल अशा शिस्तबद्ध परेड सादर करताना जय हिंद, जय भारत अशा राष्ट्रभक्तिपर घोषणांनी संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारून टाकले. कार्यक्रमात ऑपरेशन विजय, ऑपरेशन तलवार, ऑपरेशन सफेद सागर या विषयांवर कॅडेट्स व शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. समूहगीताच्या माध्यमातून शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष अमोल सुरवसे व प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# वारीदरम्यान वारकऱ्यांना दिला संरक्षणाचा विश्वास

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

केअर आणि कनेक्शनची भावना व्यक्त करत, पिडिलाईट इंडस्ट्रीज लिमिटेडचा प्रमुख वॉटरप्रूफिंग ब्रँड डॉ. फिक्सिटने महाराष्ट्राच्या श्रद्धेने भरलेल्या पंढरपूर वारीदरम्यान खास डिझाइन केलेल्या वॉकिंग रूफ्स आणि मोबाईल शेल्टर्स (चल निवाऱ्यांची) सुविधा पुरवली. दरवर्षी लाखो भाविक सहभागी होणाऱ्या यात्रेत यंदा हजारो वारकऱ्यांना या उपक्रमाचा लाभ झाला. या उपक्रमाद्वारे संरक्षणाच्या वचनाशी बांधिलकी दाखवत डॉ. फिक्सिटने या प्रदेशाच्या सांस्कृतिक रचनेशी आपली नाळ घट्ट केली आहे. ही एक प्रेरणादायी कृती असून, या आध्यात्मिक प्रवासात डॉ. फिक्सिट एक विश्वासार्ह साथीदार म्हणून पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे.पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेडचे चीफ मार्केटिंग ऑफिसर संदीप तनवानी यांनी सांगितले की,पिडिलाइटमध्ये आम्ही नेहमीच मानतो की आमचे ब्रँड लोकांशी, त्यांच्या खास क्षणांशी आणि भावनांशी अर्थपूर्ण पद्धतीने जोडले गेले पाहिजेत. वारीदरम्यान हाती घेतलेला हा उपक्रम त्याच विश्वासाचं प्रतिबिंब आहे. वारकऱ्यांसोबत चालत आणि त्यांना निवाऱ्याची सुविधा देत, आम्ही त्यांच्या प्रवासात कोणतीही अडथळा न आणता, मात्र अर्थपूर्ण पद्धतीने साथ देण्याचा प्रयत्न केला आहे.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जुलै-**

राज्याचे जलसंपदा (विदर्भ तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी शनिवारी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने लेखाधिकारी तथा प्र.व्यवस्थापक मुकेश अनेचा यांच्या हस्ते जलसंपदा मंत्री श्री म



हाजन यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे कर्मचारी तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

तत्पूर्वी जलसंपदामंत्री श्री. महाजन यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन माहिती घेतली. यावेळी लेखाधिकारी तथा प्र.व्यवस्थापक मुकेश अनेचा यांनी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली.



## महत्वाचे...



### श्री साई चॅरिटेबल ट्रस्टच्या कॅम्पसमध्ये वृक्षारोपण

**वैराग, दि.२६ जुलै-**

सासुरे वैराग येथील श्री साई चॅरिटेबल ट्रस्टच्या कॅम्पसमध्ये जिल्हा पोलिस प्रमुख अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून हरित वारी उपक्रम राबविण्यात आला.आषाढी वारी निमित्ताने जिल्हा पोलिस दलाने सुरु केलेल्या हरित वारी उपक्रमामध्ये साई आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज,साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, इंदिरा पॉलिटेक्निक कॉलेज,साई आयटीआय आदींनी सहभाग घेऊन एक हजार झाडे लावण्यात येणार आहेत. या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हा पोलिस प्रमुख अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन करण्यात आला. प्रारंभी इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इंजिनियरिंग कॉलेज प्राचार्य डॉ डी. आर. पिसाळ यांनी पोलिस प्रमुख अतुल कुलकर्णी यांचे स्वागत केले. तर अनंत देशमुख यांनी त्यांना वृक्ष रोप देऊन सत्कार केला. यावेळी वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, पोलीस निरीक्षक अतुल मोहिते, प्रभाकर चवळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन भैय्या देशमुख, विनोद दळवी, गणेश गायकवाड, सुधीर भोसले, डॉ. सतीश पाकनीकर, परमेश्वर ढेंगळे पाटील, कृष्णा जाधव, राजनंदिनी देशमुख, निधी कुणवार अनुजा उडतेवार, पवन शिंदे आदींनी केले. दशरथ शिंदे यांनी आभार मानले.



### राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शिंदे, पवार यांचा सत्कार

**वेळापूर, दि. २६ जुलै-**

राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नूतन प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांची प्रदेश अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचा पुणे येथे राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे किसान सेल राज्य कार्याध्यक्ष कमलाकर माने देशमुख व राज्य सरचिटणीस मदनसिंह जाधव यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच प्रदेश सरचिटणीस पदी आमदार रोहित पवार यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.




### वाळूज येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**वाळूज, दि.२६ जुलै-**

वाळूज (ता. मोहोळ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व जाधव वस्ती शाळेत लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नरखेड केंद्रप्रमुख शरद पवार होते. अध्यक्षपदी ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक आदिनाथ कादे होते. यावेळी ग्राम पंचायत सदस्य प्रकाश चवरे, अमोल कादे, विजया मोटे, पालक प्रतिनिधी बाबासाहेब मोटे, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष प्रकाश मोटे, तानाजी पाटील, मधुकर घाडगे, मोहिनी कादे, लक्ष्मी कादे, सरस्वती कादे, अनिल कादे, सुहास घाडगे, कुमार कादे, जनार्दन राक्षे, मुख्याध्यापक हनुमंत कादे, हरी खपाले, मुहम्मद तांबोळी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. जिल्हा परिषद शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जात असल्याचे केंद्रप्रमुख श्री पवार यांनी सांगितले. यावेळी शिक्षक नेते अनिल कादे यांचेही भाषण झाले. प्रास्ताविक सुहास घाडगे यांनी केले. गुरुराज कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. श्री.गुंड यांनी आभार मानले.

### स्कूलबस दुभाजकावर आदळून तीन विद्यार्थिनी जखमी

**सोलापूर, दि. २६ जुलै -**

शाळेत विद्यार्थ्यांना नेत असलेली बस दुभाजकावर आदळल्याने तीन विद्यार्थिनी जखमी झाल्या. हा प्रकार अक्कलकोट रेल्वे स्टेशन हंद्राळ रोडवरील पुलाजवळ शनिवारी दुपारी १२ वाजता घडली. अंबिका बिरप्पा पुजारी (वय १३), संस्कृती सुरेश तुप्पद (वय १४), कावेरी बिरप्पा पुजारी (वय १४, तिघे रा. हंद्राळ ता. अक्कलकोट) अशी जखमी झालेल्या विद्यार्थिनीची नावे आहेत. शनिवारी दुपारी बाराच्या सुमारास या विद्यार्थिनी काशिवेश्वर हायस्कूलच्या बसमध्ये बसून शाळेसाठी जात होत्या. स्कूल बस अक्कलकोट रेल्वे स्टेशन हंद्राळ रोडवरील पुलाजवळ आल्यानंतर तेथील दुभाजकावर बस आदळली. यामुळे अंबिकाच्या डोक्याला मुकामार तसेच दोन्ही पायाला मुकामार लागला आहे. संस्कृतीच्या डाव्या पायाला मुकामार लागला असून कावेरीच्या मानेला मुकामार लागल्याने अक्कलकोट येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून शिक्षक प्रकाश ननवरे यांनी दुपारी २.५० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## महत्मा बसवेश्वर स्मारकासाठी लागेल तितका निधी देणार

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची हमी

### ४५ एकर जागेची समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

राज्य सरकारकडून मंगळवेढ्यात उभारण्यात येणाऱ्या जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या स्मारकासाठी लागेल तितका निधी अर्थ खात्यातून दिला जाईल अशी हमी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिली. त्यामुळे लिंगायत समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवेढ्यात महात्मा बसवेश्वरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून या स्मारक निर्णासाठी राज्यातील सर्व लिंगायत संघटना आणि बसवप्रेमी समाजबांधवांनी केली आहे. लिंगायत लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अनास्थेमुळे तसेच अभ्यासपूर्ण पाठपुरावा न झाल्याने हा विषय गेल्या दहा वर्षांत प्रलंबित राहिला होता. त्यामुळे लिंगायत समाजात नाराजीचा सूर होता. राष्ट्रवादीचे नेते डॉ.बसवराज बगले यांनी या विषयावर लक्ष केंद्रीत करून मंगळवेढ्यात समाजबांधवांची व्यापक बैठक घेतली, तेंव्हा स्मारक कृती समितीची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर डॉ.बगले यांनी या विषयावर अभ्यासपूर्ण पाठपुरावा गतिमान केला. या स्मारकासाठी मंगळवेढ्यातील कृष्ण तलावाची पाहणी करून गट क्र. २६८६ ही शासकीय जागा उपयुक्त असल्याने ती स्मारकाच्या नावाने हस्तांतरीत करण्याची मागणी करून सतत पाठपुरावा केला. तरीही याविषयी प्रशासन उदासीन राहिल्याने स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ.बगले आणि पदाधिकाऱ्यांनी बसवजयंती पासून अन्नत्याग आंदोलनाचा इषारा दिला होता. त्यामुळे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांनीही याविषयी तगादा लावला. त्यामुळेच १५ जुलै रोजी मुंबईत बैठक घेऊन २५ एकर सरकारी जमीन लवकरच वर्ग करण्याची हमी देण्यात आली आहे. जमीनीचा प्रस्ताव शासनाकडे येताच पहिल्या टप्प्यात तात्काळ ७/१२ उताऱ्यावर स्मारकाची नोंद घेवून त्यानुसार आराखडा बनवून अंदाजपत्रकानुसार आवश्यक तेवढा निधी देण्यात येईल अशी हमी अजित पवार यांनी शिष्टमंडळास दिली.



#### ४५ एकर जमीनीसह ५०० कोटींची मागणी

या पार्श्वभूमीवर स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ.बसवराज बगले, कार्याध्यक्ष ॲड.शिवानंद पाटील आणि लिंगायत प्रमुखांनी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन चर्चा केली. या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी कृष्ण तलावासह संपूर्ण ४५ एकर जागा वर्ग करावी आणि आगामी अर्थसंकल्पात या स्मारकासाठी ५०० कोटी रूपयांची तरतूद करावी अशी विनंती केली. यासाठी आमदार डॉ.विनय कोरे, राष्ट्रवादीचे सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील आणि सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनीही शिफारस केली आहे.

## शिक्षणाधिकारी जगताप यांनी साधला शिक्षकांशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २६ जुलै -**

शिक्षण विभागाकडून येथील दाते मंगल कार्यालयात शिक्षक संवाद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मुख्याध्यापक, लिपिक व शिक्षकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी सचिन जगताप, पंढरपूरचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, विवेकवर्धिनी विद्यालयाचे प्रा. डॉ. यु. आर. मुंढे, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक स्मिता नडीमेटला, वरिष्ठ सहाय्यक अनिल पाटील, श्रीकांत धोत्रे, गुरुदाप्पा रेवे, अतिरिक्त मुख्य लिपिक राजगुरू उपस्थित होते. या बैठकीस जिल्ह्यातील मुख्याध्यापक, लिपिक आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यशाळेत ५६ शिक्षकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याचे निवारण करण्यात आले. यावेळी माध्यमांशी बोलताना शिक्षणाधिकारी जगताप यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यात १ हजार ८५ माध्यमिक शाळा असून साडेतीन लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची संख्या आहे. यासाठी ७ हजार ५०० शिक्षक काम करत आहेत. शिक्षक, पालक आणि शाळांची कामे प्रलंबित राहू नयेत. यासाठी तालुकास्तरावर शिक्षक संवाद उपक्रमाद्वारे जागेवरच तक्रारींचा निपटारा केला जाणार आहे. याचबरोबर एक कोटी वृक्ष लागवडीत सहभाग नोंदवून वृक्षारोपण कार्यक्रम तसेच घरघर संविधान, डिजिटल शाळा या विविध उपक्रमाची माहिती मुख्याध्यापक शिक्षक आणि लिपिकांना देण्यात आली.



पुढील काळात शाळेतील शिक्षकांच्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी शिक्षक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना मोबाईल मधून बाहेर काढणे गरजेचे असून मुलांना सुजाण नागरिक बनवण्यासाठी शाळांनी उपक्रमशील कार्यक्रमाचे आयोजन करावे. अशा सूचना देण्यात आल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

## बोरगांवच्या प्रशालेत शालेय साहित्य वाटप

### कै. इंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजन

### महेश इंगळेकडून शाळेस १२ पंखे भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२६ जुलै-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष महेश इंगळे यांच्या सुविद्य पत्नी कै.सौ.रूपालीताई इंगळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ बोरगाव (ता. अक्कलकोट) येथील विद्या विजय प्रशालेस १२ सिलींग फॅन तर माणूसकी फाऊंडेशनतर्फे शालेय साहित्य कीटचे वाटप करण्यात आले.

श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विद्या विजय माध्यमिक प्रशालेत हा उपक्रम महेश इंगळे यांचे सुपूत्र प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते तथा माणूसकी फाऊंडेशनचे



अध्यक्ष अनंत क्षीरसागर, उपाध्यक्ष आकाश शिंदे, सचिव आशिष हुंबे, अविनाश क्षीरसागर, श्रीशैल गवंडी, बाबूशा भालके, यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे खजिनदार प्रकाश सुरवसे होते. याप्रसंगी विद्या विजय प्रशालेच्या वतीने येथे खजिनदार सुरवसे तसेच मुख्याध्यापक अरुण पाटील यांचे आभार मानले. यावेळी संस्थेचे संचालक आनंदप्पा कलशेट्टी, सतीश सुरवसे, मुख्याध्यापक अरुण पाटील, सहशिक्षक विश्वनाथ हत्तरके, गुरुशांत स्वामी, भाग्यकांत कल्याणी, ज्योती सुरवसे, लिपिक अलिशा मकानदार, सेवक राजेंद्र हत्तरके, राजेंद्र हुक्केरी, स्वामींनाथ स्वामी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, आदीत्य गवंडी, ओंकार महाडीक, स्वामीनाथ मुसळे उपस्थित होते. सूत्रसंचालन मुस्ताक शेख यांनी केले. गुरुशांत स्वामी यांनी आभार मानले.



## एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये कारगील योध्यांना मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जुलै-**

वाखरी (ता. पंढरपूर) येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल येथे कारगिल विजय दिवस विद्यार्थ्यांकडून विविध सादरीकरणांने आणि संचलनाद्वारे शहिदांना मानवंदना देत साजरा करण्यात आला. कारगिल युद्धात भारतीय सैन्याने दाखवलेल्या अद्वितीय शौर्याच्या स्मरणार्थ दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचे स्मरण करताना शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना वृद्धिंगत झाली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थी संचलनाने झाली. विद्यार्थ्यांनी कारगिल युद्धामध्ये शहीद झालेल्या सर्व हुतात्म्यांना संचलन करत मानवंदना दिली. त्यानंतर देशभक्तीपर गीते व नृत्य विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी गवळी व आर. बी. भट्टाचार्य यांनी मार्गदर्शन केले. शिक्षिका सुप्रिया कोळी यांनी देशभक्तिपर गीत सादर केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी भारत माता की जय अशा घोषणा देत संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला. प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणांद्वारे कारगिलच्या शूर वीरांना मानवंदना अर्पण केली. प्रियांका बांदल, विशाल विभुते, विकी घनमंडे, वैष्णवी हजारी, ओंकार थोरवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## धाराशिव ट्रॅक्टर्सला एस्कॉर्ट्स कुबोटाची मानाची ट्रॉफी प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२६ जुलै-**

बार्शीतील के.टी. ट्रॅक्टर्स परिवारातील कुबोटा ट्रॅक्टरचे धाराशिव येथील वितरक धाराशिव ट्रॅक्टर्सला एस्कॉर्ट्स कुबोटा ट्रॅक्टर कंपनीकडून 'सी.एम.डी. ट्रॉफी' देऊन सन्मानित करण्यात आले. हरियाणातील गुरुग्राम येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सूरज ठोंबरे यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

एस्कॉर्ट्स कुबोटा




कंपनीकडून दरवर्षी देशभरातील ३५० डीलर्सपैकी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विक्रेत्यांना विविध निकषांवर आधारित पुरस्कार दिले जातात. यामध्ये धाराशिव ट्रॅक्टरने यंदा विक्री वाढ, ग्राहक समाधान, सेवा व सपोर्ट, प्रशिक्षित मनुष्यबळ व तत्काळ स्पेअर पार्ट उपलब्धता यासारख्या महत्त्वपूर्ण मापदंडांवर बाजी मारत ही मानाची सीमडी ट्रॉफी पटकावली. कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक निखिल नंदा, उपव्यवस्थापकीय संचालक सेजी फुकुओका, ट्रॅक्टर व्यवसाय विभागाचे मुख्य अधिकारी गुरमीतसिंग ग्रेवाल, पूर्णवेळ संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी भारत मदान, मुख्य अधिकारी, कॉर्पोरेट नियोजन विभाग अकिरा काटो या मान्यवरांच्या हस्ते ही ट्रॉफी प्रदान करण्यात आली. या सोहळ्याला देशभरातील सर्व एस्कॉर्ट्स कुबोटा ट्रॅक्टरचे अधिकृत डीलर्स उपस्थित होते. सुरज ठोंबरे म्हणाले, 'सातत्य, जिद्द आणि प्रामाणिक प्रयत्न यांच्या जोरावर हे यश मिळवता आले. कंपनीचे अधिकारी सहयोगी उपाध्यक्ष आशुतोष देशमुख, झोनल सेल्स मॅनेजर सचिन राजमाने, प्रादेशिक विक्री व्यवस्थापक जितेंद्र तांबारे व क्षेत्रीय विक्री व्यवस्थापक गणेश पाटकुलकर यांनी वेळोवेळी दिलेले मार्गदर्शनही आमच्यासाठी मोलाचे ठरले,' अशी भावना सूरज ठोंबरे यांनी व्यक्त केली.

## एखतपुरात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील एखतपूर येथे तरुणाने राहत्या घरासमोर फिनेल प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना शुक्रवारी सकाळी ११.३० च्या सुमारास घडली. सागर शिवाजी माने (वय २४, रा. एखतपूर ता उ सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. सागर हा सध्या सोलापूर येथील दमाणी नगरात राहण्यास आहे. शुक्रवारी सकाळी ११.३० च्या सुमारास घरासमोरील बगीचा येथे त्याने फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने दुपारी १.४० वाजता आकाश याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## 'विठ्ठल'चे यंदा २० लाख टन गाळपाचे उद्दीष्ट : आ. पाटील

### श्री विठ्ठल कारखान्याचे मिल रोलर पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जुलै-**

२०२५-२६ गळीत हंगामात १५ ते २० लाख मे.टनापर्यंत गाळप करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे चेअरमन तथा आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यात यंदाच्या हंगामासाठी मिल रोलर पूजन दि. २५ जुलै रोजी करण्यात आले.

आमदार पाटील, व्हा. चेअरमन प्रेमलता रोगे, संचालक कालिदास साळुंखे, सिताराम गवळी, विठ्ठल रणदिवे यांचे हस्ते पूजन झाले. यावेळी संचालक संभाजी भोसले, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, जनक भोसले, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, अशोक जाधव, सिध्देश्वर बंडगर, महेश खटके, तज्ञ संचालक दशरथ जाधव, अशोक तोंडले, निमंत्रीत संचालक धनाजी खरात, तानाजी बागल, उमेश मोरे, अंगद चिखलकर,




अशोक घाडगे, गणेश ननवरे, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील, जनरल मॅनेजर डी. आर. गायकवाड उपस्थित होते. यावेळी आमदार पाटील यांनी गेल्या वर्षीच्या हंगामात गळीतास आलेल्या ऊसास २ हजार ८०३ रूपये प्रतिटन याप्रमाणे ऊसाची बिले, तोडणी व वाहतुकदार यांची कमिशनसह सर्व बिले अदा केली असल्याचे सांगितले. सभासदांचा अपघात विमा उतरविला असून त्याचा ही फायदा सभासदांचे वारसांना मिळून दिल्याचे सांगून अपघातात मृत्यू पावलेल्या पाच सभासदांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रूपयांच्या धनादेशाचे वाटप यावेळी करण्यात आले. जेष्ठ संचालक दिनकर चव्हाण, सचिन पाटील, तुकाराम मस्के, महादेव तळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. ऊस पुरवठा अधिकारी नितीन पवार यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...




### रोटरी ई-क्लब इलाईट व यश डेव्हलपरच्यावतीने वह्या वाटप

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट व यश डेव्हलपर यांच्या सहकार्याने रविवार पेठ येथील साईनाथ विद्यालय येथे यश डेव्हलपर्सचे अध्यक्ष सुयश खानापुरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. यावेळी रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट प्रेसिडेंट बालमुकुंद राठी व ॲन दीपा राठी, सेक्रेटरी रोशन भुतडा, यश डेव्हलपर्स ॲन सोनाली खानापुरे, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, अमित इनानी, बसवराज उंबरचे, सागर राठी, राहुल डांगरे, साईनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक भूषण नरसिंह यादव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक निपा महेंद्रकुमार पटेल यांनी केले. सहशिक्षक संजय नरसगोंडे यांनी आभार व्यक्त केले.




### निमा ग्रुपकडून ३५० विद्यार्थ्यांना धनुर्वात इंजेक्शन

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

निमा सोलापूर वीकेंड क्रिकेट ग्रुप यांच्यावतीने जय जवान जय किसान शाळा येथे ३५० विद्यार्थी व शिक्षक यांना धनुर्वात इंजेक्शन शिबिर घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना जंताची औषधे देखील देण्यात आली. यावेळी वीकेंड क्रिकेट ग्रुपतर्फे डॉ. वैजनाथ स्वामी. डॉ. समीर माशाळकर, डॉ. भिमाशंकर सिंदगी, डॉ सूर्यकांत धप्पाधुळे, डॉ. सिद्धाराम बगले, डॉ. विवेक कांबळे, डॉ. अविनाश वाघमारे, डॉ. गौतम रेवणकर, डॉ. गोरख एकुंडे , डॉ. अतुल लामकाने , डॉ. प्रवीण पाटील डॉ. इम्तियाज शेख, डॉ. सुनील खट्टे, डॉ. महेश बिलुरे, डॉ. अंबादास गाजुल, डॉ. ऋषिकेश जोकारे, डॉ. योगेश उडगीकर, डॉ. मंगेश बिराजदार, डॉ. रोहित शेळवणे आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शंकर जागिलम



**सोलापूर, दि. २६ जुलै-**

न्यू पाच्छ पेठ, ७० फूट रोड येथील शंकर रायमल्लू जागिलम यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी दि. २६ जुलै सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा व आई-वडील भाऊ, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### कुसुम इंगोले



**सांगोला, दि. २६ जुलै-**

एखतपुर रोड, मस्के कॉलनी येथील रहिवासी व माजी प्राचार्य डॉ. रामचंद्र इंगोले यांच्या पत्नी कुसुम रामचंद्र इंगोले (वय-८१) यांचे वृद्धापकाळाने शनिवार दि. २६ जुलै रोजी निधन झाले. रणजित इंगोले, डॉ. राहुल इंगोले यांच्या त्या मातोश्री होत्या.

### अरुण बुलबुले



**सोलापूर, दि. २६ जुलै-**

येथील शुक्रवार पेठेत राहणारे अरुण चंद्रशेखर बुलबुले (वय ८०) यांचे शनिवार, दि. २६ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रूपाभवानी मंदिर जवळील स्मशानभूमीत विद्युत दाहिनी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### शांताई पाटील



**सोलापूर, दि. २६ जुलै-**

शांताई सिद्रामप्पा पाटील (वय ७८) यांचे शनिवार २६ जुलै रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास दीर्घ आजाराने निधन झाले. रविवार २७ जुलै रोजी सकाळी १० वाजता रुपाभवानी जवळील लिंगायत स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन कन्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ विधिज्ञ ॲड एस. आर. पाटील यांच्या त्या पत्नी होत. शिवव्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे यांच्या त्या सासू होत.

### सुनिल अड्डुणगी



**सोलापूर, दि. २६ जुलै-**

पार्क स्टेडियम येथील रेमंड शोरूमचे भागीदार सुनिल विश्वनाथ अड्डुणगी (वय ५५) यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवार २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता वीरशैव नगर, जुळे सोलापूर येथील निवासस्थानापासून निघून रूपाभवानी मंदिर जवळील लिंगायत रुद्रभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, विवाहित बहीण, वहिनी, पत्नी व २ मुले असा परिवार आहे.

# पालिका निवडणुकीसाठी काँग्रेसची तयारी

## चेतन नरोटे यांची माहिती; काँग्रेस भवनामध्ये बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या तयारी संदर्भात सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने अध्यक्ष चेतन नरोटे यांनी मिशन सोलापूर महानगरपालिका निवडणूक समिती सदस्यांची महत्वाची बैठक काँग्रेस भवन सोलापूर येथे आयोजित केली होती.

यावेळी संघटनात्मक बांधणी, जनसंपर्क, प्रभागरचना, भाजप महायुती सरकारचे अपयश, आणि स्थानिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणे याबाबत समिती सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. सोलापूर शहर काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी सुशील बंदपट्टे, उत्तर सोलापूर तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी भारत जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी आता नियोजनबद्ध कामाला सुरुवात करणे आवश्यक आहे. युती करायची की नाही, याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील. महानगरपालिकेत पदाधिकारी नसल्यामुळे महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार आणि शहराची दिवसेंदिवस बिघडत चाललेली परिस्थिती पाहता, सत्ताधाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी, महानगरपालिकेवर तिरंगा फडकविण्यासाठी बैठका, बूथ वॉर्डनिहाय यंत्रणा, प्रभागनिहाय नियोजन आणि थेट लोकांपर्यंत पोहोचण्यावर भर द्यावा. असे आवाहन शहराध्यक्ष नरोटे यांनी केले. या बैठकीस ज्येष्ठ नेते महादेव अण्णा चाकोते, माजी महापौर संजय हेमगड्डी, आरिफ शेख, अलकाताई राठोड, सुशीलाताई आबुटे, नगरसेवक रियाज हुंडेकरी, शिवा बाटलीवाला, प्रवीण निकाळजे, प्रवक्ते अशोक निंबर्गी, म. प्रदेश यंग ब्रिगेड अध्यक्ष सुदीप चाकोते, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, कार्याध्यक्ष मनोज यलगुलवार, हणमंतू सायबोलू, सुशील बंदपट्टे, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, अल्पसंख्यांक अध्यक्ष जुबेर कुरेशी, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मिडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला यांच्यासह इतर समिती सदस्य उपस्थित होते.



### चार हुतात्मा पुतळा चौकात कारगिल विजय दिनानिमित्त शहीदांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

कारगिल विजय दिनानिमित्त यशसिद्धी आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन यांच्या वतीने चार हुतात्मा पुतळा पार्क चौक येथे शहीदांना अभिवादन करण्यात आले.

वीर योद्धांना फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महादेव राऊत यांच्या हस्ते पुष्पचक्र वाहून मानवंदना देऊन सलामी देण्यात आली. यावेळी असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष माजी सैनिक शिवपुत्र घटकांबळे, शाखा अध्यक्ष कॅप्टन कमलाकर कांबळे, उपाध्यक्ष सुभेदार जयनद कांबळे, खजिनदार कॅप्टन बाबुराव बेलभंडारे, माजी सैनिक सूर्यकांत गजघाटे, माजी सैनिक लिंबाजी कांबळे, माजी सैनिक भाऊसाहेब वंजारे, माजी सैनिक प्रकाश घटकांबळे, माजी सैनिक गुंडू केंगार, माजी सैनिक राहुल साबळे, माजी सैनिक सिद्धार्थ गायकवाड, माजी सैनिक शंभूदेव सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते श्रीशैल शिवशरण, माजी सैनिक प्रमोद जाधव, माजी सैनिक गणपती आईवळे, माजी सैनिक सुरेश खळसोडे, माजी कॅप्टन मारुती मोरे, माजी सैनिक मधुकर माने, माजी सैनिक विद्याधर ढोणे, माजी सैनिक भारत कांबळे, माजी सैनिक कुंदन कांबळे, माजी सैनिक विष्णू वाघमारे उपस्थित होते.

## दुचाकी घसरल्याने शेतकरी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जुलै-**

घरातून शेताकडे जात असताना शेताच्या अलीकडे काही अंतरावर दुचाकी घसरल्याने खाली पडून शेतकरी जखमी झाला. हा अपघात १५ जुलै रोजी दुपारी चारच्या सुमारास सांगोला तालुक्यातील खिलारवाडी येथे घडला. सुधाकर बाबूरावर बागल (वय ३५, रा. खिलारवाडी ता मंगळवेढा) असे जखमी शेतक-याचे नाव आहे. सुधाकर हे १५ जुलै रोजीच्या दुपारी चारच्या सुमारास घरातून शेताकडे दुचाकी चालवित जात होते. शेताच्या जवळपास ते गेले असता, ते चालवित असलेली दुचाकी अचानक घसरली. यात ते खाली पडल्याने त्यांच्या डाव्या बाजूच्या बरगडीला मुकामार लागला. पंढरपूर येथील खासगी रुग्णालयात उपचार करून प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने शासकीय रुग्णालयात भाऊ अजय याने दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# अपहरण करून डांबून तरुणाला मारहाण

## शेती विकून पैसे देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

क्रिकेट सट्टा खेळण्यासाठी घेतलेले पैसे परत दिले नसल्याने तरुणाची अपहरण करून त्याला डांबून मारहाण करण्यात आली. दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथे जून महिन्यात घडला. या प्रकरणी वळसंग पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महादेव शंकर गुरव (वय २८ रा. आहेरवाडी ता. द. सोलापूर ) या तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून किरण सासवे ( वय ३० ) , रवी सासवे ( वय ३५), श्रीकृष्ण शामराव सासवे ( वय ४० ) , परशुराम रामचंद्र क्षेत्री (वय ४०, सव रा. आहेरवाडी ता. द. सोलापूर) विरुद्ध वळसंग पोलीस ठाण्यात अपहरण करून मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी महादेव हा एनटीपीसी प्रकल्पात कामास आहे. साधारण दोन ते तीन वर्षांपूर्वी त्याला क्रिकेट सट्टा खेळण्याचे व्यसन लागले. यातून त्याने गावातीलच आरोपींकडून पैसे घेतले. परंतु सट्टयामध्ये पैसे हरल्याने तो त्यांचे पैसे परत करू शकला नाही. त्यानंतर दोन ते तीन महिन्यांनी आरोपींनी फिर्यादीने घेतलेल्या पैशांवर ३० ते ४० टक्के व्याजाची आकारणी केली. तसेच त्या पैशासाठी वेळोवेळी त्यास अडवून मारहाण केली.

यानंतर वडिलांनी केलेली एफडी मोडून गावातील पंचा समक्ष आरोपीचे पैसे परत केले. परंतु व्याजावरून आरोपी तगदा लावत होते. दरम्यान १६ जून रोजी किरण सासवे याने मित्राचा वाढदिवस असल्याने बंकलगी चौकात बोलावल्याने फिर्यादी तेथे गेला त्यावेळी सर्व आरोपी त्या ठिकाणी आले होते. त्यावेळी आरोपींनी व्याजाच्या पैशासाठी फिर्यादीला मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी बुलेट गाडीवर बसून अक्कलकोट तालुक्यातील देवी कवटे येथे नेले. तिथे फिर्यादीला एका घरात डांबून ठेवले. तेथे आरोपींनी फिर्यादीच्या खिशातील ८००० रुपये व मोबाईल काढून घेतला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला व्याजाच्या पैशासाठी आईचा हवाला दे म्हणून दबाव टाकला. तसेच वडिलांना दोन एकर शेत विकून आमची रक्कम देण्यास सांग असे धमकावले. त्यानंतर १७ जून रोजी फिर्यादीस सोलापुरात आणले तेथे शंभर रुपयाच्या बॉण्डवर हमीपत्र लिहून घेतले. त्यानंतर १३ मैल येथे नेऊन मारहाण केली. तेथून देवी कवटे येथे नेऊन पुन्हा डांबून ठेवले. १९ जून रोजी सकाळी शौचास जाण्याचे निमित्त करून फिर्यादीने तिथून पळ काढला. त्यानंतर कर्नाटकातील नातेवाईकाच्या घरी लपून राहिला. २४ जुलै रोजी पोलीसात तक्रार दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तपास एफएसआय निंबाळे करत आहेत. सोलापुरात आणले तेथे शंभर रुपयाच्या बॉण्डवर हमीपत्र लिहून घेतले. त्यानंतर १३ मैल येथे नेऊन मारहाण केली. तेथून देवी कवटे येथे नेऊन पुन्हा डांबून ठेवले. १९ जून रोजी सकाळी शौचास जाण्याचे निमित्त करून फिर्यादीने तिथून पळ काढला. त्यानंतर कर्नाटकातील नातेवाईकाच्या घरी लपून राहिला. २४ जुलै रोजी पोलीसात तक्रार दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तपास एफएसआय निंबाळे करत आहेत.



### सान्वी गुंड हिचे भारत टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये यश

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

एज्युमीट ॲक्डमी, महाराष्ट्र यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२५ मध्ये सिद्धेश्वर कन्या प्रशालेची सान्वी गुंड हिने १०० पैकी ८० गुण मिळवून महाराष्ट्र राज्यात ३३३ वा क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल सान्वी व तिचे मार्गदर्शक शिक्षक ज्ञानेश्वर पाटील व अवधूत शिवगुंडे यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता गोटे व पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले. भारत टॅलेंट सर्च परीक्षेचे शहर समन्वयक अविनाश हिंगणे यांनीही सान्वीचे कौतुक करत यावर्षी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी बीटीएस परीक्षेत सहभागी व्हावे यासाठी नाव नोंदणीसाठी ९५०३३२४०८४ या क्रमांकावर संपर्क साधावा आणि ISRO सहलीची संधी मिळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वसतिगृहासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २६ जुलै :**

नेहरू वसतिगृहासाठी ७३ तर सावित्रीबाई फुले वसतिगृहासाठी २२ असे एकूण ९५ अर्ज प्रवेशासाठी आले आहेत. मात्र, प्रवेश क्षमता जास्त असल्याने जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने अर्ज करण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना येत्या पाच दिवसात प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे.

पार्क येथील नेहरू आणि शेळगी येथी सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहात प्रवेशासाठी ११ ते २१ जुलै दरम्यान अर्ज मागविले होते. या कालावधी दोन्ही वसतिगृहात प्रवेशासाठी एकूण ९५ अर्ज आले आहेत. मात्र, प्रवेश क्षमता ४५० आहेत. त्यामुळे प्रवेश अर्ज करण्यासाठी आणखी पाच दिवसाची मुदत देण्यात आली आहे. जवाहरलाल नेहरू वस्तीगृहात ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे.

सावित्रीबाई फुले मुलीच्या वसतिगृहात १५० मुलींना प्रवेश मिळणार आहे. मात्र, त्यासाठी कमी अर्ज आल्याने शिक्षण विभागाने अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे येत्या आठ दिवसात दोन्ही वसतिगृहात प्रवेशासाठी आणखी अर्ज येणार आहेत.

> **ऑगस्टमध्ये सुरू होणार वसतिगृह**
>
> जवाहरलाल नेहरू आणि सावित्रीबाई फुले मुलीच्या वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया ३१ जुलैपर्यंत पूर्ण करून घेण्यात येणार आहे. त्यानंतर १ ऑगस्टपासून वसतिगृह सुरू करण्याचे नियोजन प्राथमिक शिक्षण विभागाकडून करण्यात येत आहे.

# पाच वर्षात रेकॉर्डब्रेक अनुकंपा भरती




## पारदर्शक अनुकंपा भरतीमुळे सीईओंचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी विविध ११ संवर्गातील २५७ उमेदवारांपैकी १२४ जणांची अनुकंपा भरती पारदर्शक व समुपदेशनाने यशस्वी केल्यामुळे भरती झालेल्या उमेदवारांसह जिल्ह्यातून जिल्हा प्रशासनाचे कौतुक होत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम व ऊप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी अनुकंपा भरती पारदर्शक व समपुदेशनाने करण्यासाठी नियोजनबध्द यंत्रणा राबविली आहे. पाच वर्षात रेकॉर्डब्रेक १२४ उमेदवारांची विविध संवर्गात भरती करताना कोणावरही अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली. शिवाय भरतीसाठी होणारी आर्थिक उलाढालीलाही ब्रेक लावला. त्यामुळे अनुकंपा जागेवर हक्क असणाऱ्या उमेदवारांना विनंती व सोईनुसार नोकरी मिळाल्याने उमेदवारांमधून आनंद व समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

पाच वर्षात १२४ जणांची अनुकंपा भरती करताना जिल्हा प्रशासनावर प्रचंड तणाव होता. शिवाय विविध राजकीय नेत्यांकडून उमेदवारासाठी फिल्डींग साठी फोन येत होते. मात्र प्रशासनाने कोणताही मुलाहीजा न ठेवता अनुकंपावर हक्क असणाऱ्या उमेदवारांना नोकरी उपलब्ध करून दिली. त्यासाठी प्रशासनाला मोठ्या प्रमाणात कसरतही करावे लागले. यापूर्वी ११३ जागांसाठी अनुकंपा करण्यात आली होती. आता १४० उमेदवारांना बोलावून १२४ जागांची भरती विनाझंझट व विनाकटकट पूर्ण करण्यात आल्याने प्रशासनाचे कौतुक करण्यात येत आहे.

> **सीईओंची बदली व नियुक्ती पॅटर्नची चर्चा**
>
> जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी ग्रामसेवक, शिक्षक, अभियंता, आरोग्य सेविका, विस्तार अधिकारी यासह इतर विभागातिल बदली व नियुक्ती पारदर्शक व समुपदेशनाने नियुक्ती केल्याने त्यांच्या पॅटर्नची सर्वत्र कौतुक होत आहे. प्रशासन प्रमुखांनी विशेष लक्ष देऊन बदली व भरती प्रक्रीया राबविल्याने आर्थिक उलाढालीला चाप बसल्याचे सांगण्यात येत आहे.

> **सीईओंची उलट चौकशी**
>
> सीईओ जंगम व डेप्युटी सीईओ पाटील यांनी अनुकंपा भरती करून नियुक्ती आदेश दिले. समुपदेशनाच्या ठिकाणीच नियुक्ती आदेश मिळाले की नाही? याची उलटतपासणी सीईओ जंगम यांनी केली. त्यामुळे नियुक्ती पारदर्शक व आर्थिक उलाढालीशिवाय झाल्याचे दिसून आले.



### पर्यावरणाची शपथ घेत जागतिक वनसंवर्धन दिनानिमित्त वृक्षारोपण

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर ईस्ट माध्यमातून वसंतराव नाईक प्रशाला शाळेमध्ये वृक्षारोपण डॉ. नवनीत तोष्णीवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब सेक्रेटरी डॉ.मनोज देवकर, रोटरी क्लबचे सोलापूर ईस्ट अध्यक्ष अध्यक्ष कार्तिक चव्हाण यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे धडे देत सर्वांसमवेत पर्यावरणाची शपथही घेण्यात आली. मी पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याचे वचन देत आहे. मी झाडे लावीन आणि त्यांची काळजी घेईन, कचरा कमी करेन, आणि निसर्ग संसाधनांचा शहाणपणाने वापर करेन. मी जबाबदार नागरिक होण्याचे वचन देते आहे आणि एक स्वच्छ, हिरवेगार वसुंधरा पृथ्वी घडवण्यासाठी प्रयत्न करेन व इतरांना प्रेरणा देईन. अशी प्रतिज्ञा ही घेण्यात आली. २३ ते २८ जुलै जागतिक वनसंवर्धन ते जागतिक निसर्ग संवर्धन दिन हा सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

### दुचाकी घसरून अपघात; दोघे जखमी एकाची शुध्द हरपली, एकजण जखमी

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

रेल्वे स्टेशन ते होम मैदानाकडे जाताना गुडलक दुकानासमोर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात एकजण बेशुध्द झाला. तर दुसरा जखमी झाला असून त्यांच्यावर शासकीय रुगणालयात उपचार सुरु आहेत. हा अपघात शुक्रवारी रात्री ९ च्या सुमारास घडला. मोहम्मद शरीफ शेख (वय ४५,रा. जुनी मिल चाळ, डोणगाव रोड, सोलापूर) असे शुध्द हरपलेल्या तर विकास विठ्ठल रुपनर (वय ४६, रा. साठे वस्ती) असे जखमीचे नाव आहे. मोहम्मद व विकास हे शुक्रवारी रात्री ९ च्या सुमारास दुचाकीवरून रेल्वे स्टेशन येथून होम मैदानच्या दिशेने जात होते. दरम्यान गुडलक दुकानासमोर दुचाकी अचानक घसरली. यात मोहम्मद यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांना पत्नी रईसा यांनी उपचारास दाखल केले. तसेच विकास यांना भाचा अनिल बंडगर यांनी त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केल्याने त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. हा अपघात शुक्रवारी रात्री ९ च्या सुमारास घडला. यात मोहम्मद यांची शुध्द हरपल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# इंग्लंडचा ६६९ धावांचा डोंगर

## ३११ धावांची आघाडी

### शुभमन गिलचे नाबाद अर्धशतक



फटकेबाजी करताना शुभमन गिल



शतकवीर बेन स्टोक्स

**◆ मॅन्चेस्टर, २६ जुलै**

ओल्ड ट्रॅफर्डवर सुरु असलेल्या ॲण्डरसन तेंडुलकर चषक कसोटी मालिकेतील चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी बेन स्टोक्सने झळकावलेल्या शतकाच्या आधारावर इंग्लंडने भारताविरुद्ध ६६९ धावा उभारून पहिल्या डावात ३११ धावांची आघाडी मिळविली. पिछाडी भरून काढताना प्रारंभी दोन हादरे बसल्यानंतर भारताने चहापानापर्यंत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. शुभमन गिलच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर भारताने चहापानापर्यंत २९ षटकांत २ बाद ८६ धावांपर्यंत मजल मारली.

भारताच्या पहिल्या डावातील ३५८ धावांच्या प्रत्युत्तरात इंग्लंडने ६६९ धावा उभारल्या. ही इंग्लंडची कसोटीतील पाचवा सर्वोच्च धावसंख्या ठरली. काल जखमी निवृत्त झालेला कर्णधार बेन स्टोक्स आज मैदानावर परतला, तो ७७ धावांवर नाबाद राहिला होता. ७ बाद ५४४ धावांवरून बेन स्टोक्सने लियाम डावसनच्या साथीने इंग्लंडच्या डावास पुढे सुरुवात केली. यादरम्यान, बेन स्टोक्सने १६४ चेंडूंत ९ चौकारांसह आपले शतक पूर्ण केले, त्याचे हे १३ वे कसोटी शतक ठरले. डावसनने स्टोक्ससोबत आठव्या गड्यासाठी ३५ धावांची भागीदारी केली. ६५ चेंडूंत ३ चौकारांसह २६ धावा काढणाऱ्या लियाम डावसनचा बुमराहने त्रिफळा उडविला, स्टोक्सला ख्रिस वोक्सची साथ मिळाली नाही, मोहम्मद सिराजने वोक्सला (४) त्रिफळाचीत केले. याचदरम्यान बेन स्टोक्सने ब्रायडन कार्सेच्या साथीने इंग्लंडला साडेपाचशे धावांचा उंबरठा ओलांडून दिला. याचवेळी अष्टपैलू रवींद्र जडेजाला बेन स्टोक्सची घोडदौड थांबवण्यात यश मिळाले. जडेजाने स्टोक्सला साई सुदर्शनकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. बेन स्टोक्सने १९८ चेंडूंचा सामना करत ११ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने १४१ धावांची खेळी केली. जडेजाने ब्रायडन कार्सेला बाद करताच इंग्लंडचा डाव १५७.१ षटकांत ६६९ धावांत आटोपला व या बरोबरच इंग्लंडने भारताविरुद्ध पहिल्या डावांत ३११ धावांची आघाडी घेतली.

भारताकडून रवींद्र जडेजाने ४ बळी, जसप्रीत बुमराह व वॉसिंग्टन सुंदरने प्रत्येकी २ बळी, तर अंशुल कंबोज व मोहम्मद सिराजने प्रत्येकी १ बळी टिपला.

पहिल्या डावातील ३११ धावांच्या तूट भरून काढण्यासाठी भारतीय सलामीवीर दुसऱ्या डावासाठी मैदानावर उतरले, परंतु पहिल्याच षटकांत इंग्लंडने भारताच्या डावाला खिंडार पाडली. वेगवान गोलंदाज ख्रिस वोक्सने चौथ्या आणि पाचव्या चेंडूवर सलामीवीर यशस्वी जयस्वाल (०) व साई सुदर्शनला (०) भोपळा न फोडू देताच तंबूत परत पाठविले. भारताने शून्यावरच दोन महत्त्वपूर्ण मोहरे गमावले. पुढे केएल राहुल व कर्णधार शुभमन गिलने डाव सावरण्याचा चांगला प्रयत्न केला. गिलने आपले अर्धशतक साजरे केले. या दोघांनी चहापानापर्यंत भारताला २९ षटकांत २ बाद ८६ धावांपर्यंत पोहोचवले, त्यावेळी केएल राहुल नाबाद ३० धावांवर, तर गिल नाबाद ५२ धावांवर खेळत होता. (वृत्तसंस्था)

# दिव्या-हम्पी पहिली लढत बरोबरीत

## आज दुसरा क्लासिकल सामना



कोनेरू हम्पीविरुद्ध खेळताना नागपूरची दिव्या देशमुख

**◆ बटुमी, २६ जुलै**

जॉर्जियातील बटुमी येथे सुरु असलेल्या फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत उगवती स्टार नागपूरची दिव्या देशमुख आणि अनुभवी ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पी यांच्यातील बहुप्रतिक्षित अंतिम फेरीतील पहिला सामना ४१ चालींच्या तणावपूर्ण आणि गतिमान लढाईनंतर बरोबरीत सुटला.

पटावर केएच २, क्यूएफ२ अशा चालींची तीन वेळा झालेल्या पुनरावृत्तीसह असंतुलित आणि तीव्र संघर्ष सुरु होता. विशेषतः मधल्या गेममध्ये दोघीही संघर्ष करत असताना अखेर दिव्या आणि हम्पीने शेवटी समान गुण वाटून घेण्यास सहमती दर्शविली.

दिव्याने सुरुवातीला सर्जनशील कल्पनांसह प्रयत्न केले आणि थोडासा भौतिक फायदा मिळवला, परंतु हम्पीच्या सक्रिय प्रति-खेळामुळे, विशेषतः तिच्या राणी आणि रुकसह, खेळ गतिमान समानतेकडे नेला.

आता अंतिम फेरीतील दुसरा सामना रविवारी खेळला जाणार आहे. दुसरा सामनाही अनिर्णीत राहिला, तर सोमवारी टाय ब्रेक सामना खेळला जाईल व यातून विश्वचषक विजेतीचा निकाल लागेल.

स्पर्धेच्या इतिहासातील हा पहिलाच ऑल इंडियन अंतिम सामना आहे, दोन्ही खेळाडूंनी २०२६ च्या महिला कॅण्डिडेटसाठी पात्रता मिळवली आहे. ३८ वर्षीय हम्पीने उपांत्य फेरीत चीनच्या अव्वल मानांकित टिंगजी लेईला पराभूत केले, तर १९ वर्षीय दिव्या देशमुखने निर्भय खेळाने प्रभावित केले आहे, जिनर झू आणि माजी विश्वविजेत्या झोंगी टॅनसह अव्वल मानांकित खेळाडूंना आश्चर्यकारकपणे प्रभावित केले आहे.

अंतिम सामना दोन क्लासिकल गेममध्ये खेळला जाईल, गरज पडल्यास टाय-ब्रेकसह. निकाल काहीही असो, भारतीय बुद्धिबळ एका ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी सज्ज आहे. (वृत्तसंस्था)

## सात्त्विक-चिराग बाहेर

**चांगझोऊ :** सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीचे चायना ओपन स्पर्धेतील अभियान उपांत्य फेरीत संपले. त्यांना मलेशियाच्या आरोन चिया व सोह वूई यिक यांच्याकडून १८-२१, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. ■

## साईराज नायसे मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत

**पुणे :** नागपूरचा उदयोन्मुख बॅडमिंटनपटू साईराज नायसेने शनिवारी पुणे येथील पीवायसी हिंदू जिमखाना येथे झालेल्या महाराष्ट्र सब-ज्युनियर राज्य निवड बॅडमिंटन स्पर्धेच्या १७ वर्षांखालील मुलांच्या मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली. चौथ्या मानांकित साईराज आणि त्याची जोडीदार अनन्या शिंदे यांनी जोरदार पुनरागमन करत ४५ मिनिटे चाललेल्या रोमांचक १७ वर्षांखालील मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत सार्थक नलावडे आणि दितिशा सोमकुवर यांचा १६-२१, २१-१२, २१-१८ असा पराभव केला. ■

# तन्वी, वेन्नालाला कांस्यपदक



तन्वी शर्मा



वेन्नाला कलाकोटला

## आशिया कनिष्ठ बॅडमिंटन

**◆ सोलो (इंडोनेशिया), २६ जुलै**

उदयोन्मुख बॅडमिंटनपटू तन्वी शर्मा व वेन्नाला कलागोटलाने कांस्यपदके जिंकून शनिवारी येथे झालेल्या आशिया कनिष्ठ वैयक्तिक बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या प्रभावी मोहिमेचा शेवट केला. भारताचा हा पहिलाच ऐतिहासिक विजय असून या स्पर्धेत दोन भारतीय बॅडमिंटनपटूंनी प्रथमच पदके जिंकलीत.

वेन्नालाने चीनच्या लिऊ सी याविरुद्ध शौर्याने झुंज दिली, मात्र ३७ मिनिटांत वेन्नालाला १५-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला.

दुसऱ्या गेममध्ये १५-२० अशी पिछाडीवर असताना भारताच्या वेन्नालाने पुनरागमनाच्या आशा उंचावल्या, परंतु महत्त्वाच्या वेळी उशिरा झालेल्या चुकीमुळे लिऊने सरळ गेममध्ये स्पर्धा जिंकली.

दुसऱ्या कोर्टवर, दुसऱ्या मानांकित तन्वी शर्माला आठव्या मानांकित चीनच्या यिन यी किंगकडून ३५ मिनिटांत १३-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला. तन्वीने पहिला गेम गमावल्यानंतर दुसऱ्या गेममध्ये जोरदार झुंज दिली. तन्वीने ६-१ अशी आघाडी घेतली, परंतु यिनने पुन्हा एकदा ८-८ अशी बरोबरी साधली आणि नंतर आघाडी घेत विजय निश्चित केला. तन्वीसाठी, ही आणखी एक प्रभावी कामगिरी होती. गत महिन्यात अमेरिकन ओपन सुपर ३०० स्पर्धेत तन्वीने उपविजेतपद मिळविले होते. (वृत्तसंस्था)

# अव्वल सहा फलंदाजांनी सातत्य राखले, तरच कुलदीपला संधी : मोर्ने मॉर्केल

**◆ मॅन्चेस्टर, २६ जुलै**

कुलदीप यादवला अंतिम एकादशमध्ये स्थान मिळावे यासाठी भारताच्या अव्वल सहा फलंदाजांनी अधिक सातत्य राखले पाहिजे, असे मत गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केलने व्यक्त केले.

मालिकेत डावखुरा फिरकी गोलंदाज कुलदीपची अंतिम एकादशमध्ये निवड न झाल्यामुळे आतापर्यंत भारतीय संघ बराच माघारला आहे. कुलदीप हा सामना जिंकून देणारा खेळाडू आहे, असे भारत व इंग्लंडच्या माजी खेळाडूंनी मानले असून त्याचा संघात समावेश करण्याचे आग्रह धरला आहे.

तथापि, आठव्या क्रमांकापर्यंत फलंदाजी मजबूत करण्यासाठी भारताने अंतिम अकरा संघात तीन अष्टपैलू खेळाडू निवडण्यास प्राधान्य दिले आहे. या निर्णयामुळे त्यांना मिश्र परिणाम मिळाले आहेत.

कुलदीपला जागतिक दर्जाचा फिरकी गोलंदाज आहे, भारतीय संघ व्यवस्थापन कुलदीप यादव या धूर्त गोलंदाजाला संघात स्थान देण्याचा प्रयत्न करत आहे. तो आता ३१ जुलैपासून ओव्हल येथे होणारी शेवटची कसोटी खेळू शकतो, असे मॉर्ने मोर्केल म्हणाला.

आम्ही कुलदीपसाठी मार्ग शोधण्याचा प्रयत्न करत आहोत, परंतु आम्हाला आमच्या पहिल्या सहा फलंदाजांकडून सातत्यपूर्ण धावा काढणे अपेक्षित आहेत, जेणेकरून आम्ही कुलदीपसारख्या खेळाडूला संघात आणू शकू, असे मोर्केल म्हणाले. पहिल्या डावात भारतीय वेगवान गोलंदाजांच्या सामान्य कामगिरीनंतर दक्षिण आफ्रिकेचे माजी गोलंदाज मोर्केलने माध्यमांशी संवाद साधला. (वृत्तसंस्था)

## बेल्जियम ग्रांप्रीमध्ये व्हर्स्टापेनची पियास्ट्रीवर मात

**स्पा-फ्रँकोरचॅम्प्स :** फॉर्म्युला वनमध्ये नवीन रेड बुल युगाच्या सुरुवातीला बेल्जियम ग्रांप्रीमध्ये मॅक्स व्हर्स्टापेनने ऑस्कर पियास्ट्रीवर मात करून फॉर्म्युला वन स्प्रिंट रेस जिंकली. पहिल्याच लॅपमध्ये व्हर्स्टापेनने पियास्ट्रीला सरळ मागे टाकले. ऑस्ट्रेलियन १५-लॅप स्प्रिंट रेसच्या उर्वरित काळात व्हर्स्टापेनच्या अगदी जवळ होता, परंतु चार वेळा विजेत्याला मागे टाकू शकला नाही. दुसऱ्या मॅकलरेनमध्ये लॅण्डो नॉरिसने फेरारीच्या चार्ल्स लेक्लेर्ककडून स्थान मिळवल्यानंतर तिसऱ्या स्थानावर होता. पियास्ट्रीने क्रमवारीत नॉरिसवरील आपली आघाडी आठ वरून नऊ गुणांपर्यंत वाढवली. ■



**कारगिल विजय दिवस...** द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकात कारगिल विजय दिवसाच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त काढलेल्या मिरवणुकीत संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांच्यासह केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय सहभागी झाले

# भारताला सर्वतोपरी प्रयत्न करावे लागतील : पॉण्टिंग

**◆ मॅन्चेस्टर, २६ जुलै**

ओल्ड ट्रॅफर्डवर भारतीय संघाला आगीच्या कसोटीला सामोरे जावे लागत आहे. भारताने पहिल्या डावात मोठ्या प्रमाणात आघाडी गमावली. इंग्लंड संघाने वर्चस्व गाजवल्यानंतर पाहुण्या भारतीय संघाला आता खराब होत चाललेल्या मॅन्चेस्टरच्या खेळपट्टीवर टिकून राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे लागेल, असे मत ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉण्टिंगने व्यक्त केले.

पॉण्टिंगने इंग्लंडला विजयाचा प्रबळ दावेदार घोषित केले असले तरी तो अद्याप भारताला नाकारत नाही. विशेषतः भेगा पडलेल्या खेळपट्ट्यांवर खेळण्याचा अनुभव पाहता भारत जोरदार मुसंडी मारेल अशी त्याला अपेक्षा आहे.

भारताच्या ३५८ धावांना चोख प्रत्युत्तर देत इंग्लंडने तिसऱ्या दिवशी ७ बाद ५४४ धावा केल्या व १८६ धावांची आघाडी घेतली. खेळपट्टीची लक्षणीय झीज दिसून येत असल्यामुळे, मालिका गमावू नये म्हणून पाहुण्या संघाला सामन्यात परत यावे लागेल.

इंग्लंडचा संपूर्ण तिसरा दिवस चांगला गेला असेल, पण भारताला उसळी व थोड्याशा वळणासह खेळपट्टीवर खेळण्याची सवय आहे. दुसऱ्या डावात त्यांना बाद करणे कठीण होण्याची शक्यता मी नाकारणार नाही, असे पॉण्टिंग म्हणाला. (वृत्तसंस्था)




## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - २२

# फर्टलेक रन म्हणजे काय?

''फर्टलेक '' हा स्वीडिश शब्द आहे. ज्याचा अर्थ ''स्पीडसोबत खेळणं'' असा होतो. फर्टलेक रन हा एक मोकळा आणि लवचिक धावण्याचा प्रकार आहे. जिथे तुम्ही धावताना स्पीडमध्ये बदल करता. कधी जलद, कधी हळू. हे रन नियोजित (ठराविक वेळा किंवा अंतर ठरवून) असू शकतात किंवा पूर्णपणे इन्स्टिनक्टिव्ह (स्वतःच्या भावना आणि परिस्थितीप्रमाणे) असू शकतात.




**फर्टलेक रनचे महत्त्व**

- स्पीड आणि सहनशक्ती दोन्ही सुधारते.
- रेससारख्या बदलत्या परिस्थितींसाठी तयारी होते (जसे एखाद्या स्पर्धेत अचानक स्पीड वाढवणं किंवा मंदावणं).
- मेंटल टफनेस वाढतो, कारण गती बदलांमुळे शरीर आणि मन दोन्ही जास्त जागरूक राहतात.
- धावण्याचा कंटाळा येत नाही, कारण सतत वेगळं काहीतरी चालू असतं.
- ऐरोबीक आणि अनाइरॉबिक क्षमता दोन्ही सुधारतात, म्हणजे शरीर कमी ऑक्सिजनमध्येही कार्यक्षम राहतं.

**फर्टलेक रन कसे करतात**

- आधी १० मिनिट वॉर्म अप करून नंतर धावायला सुरुवात करा.
- उदाहरणार्थ, ३ मिनिटं जोरात धावा, मग २ मिनिटं आरामात धावा, मग पुन्हा १ मिनिट फारच वेगाने धावा.
- रस्त्यावरील झाडं, दिवे, किंवा इतर खूणांनुसार स्पीड बदलू शकता.
- सर्व सत्र ३०-६० मिनिटांचं असतं.

फर्टलेक रनमध्ये कठोर नियम नसतात. त्यामुळे ते ट्रैनिंग मध्ये सहज मिक्स करता येतात आणि मजेदार बनतात. ते विशेषतः मिडल डिस्टन्स ते लॉन्ग डिस्टन्स धावपटूंना सहनशक्तीबरोबर स्पीड बिल्ड करायला मदत करतात.सतत चालू असणारा सराव कधी कधी कंटाळवाणा वाटतो अश्याप्रकारचे रन सरावत वाढवल्यास वेगळी अनुभूती येते आणि शरीर तय्यार होते. **(क्रमशः)**

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३



# सोलापूरच्या संध्याराणी बंडगरची विजयी सलामी

## जागतिक मानांकन लॉन टेनिस

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

वरिष्ठांच्या चौथ्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेस येथील संध्याराणी बंडगरने विजयी सलामी दिली. तिने बंगळूरूच्या स्मीता रविंद्रचा ६-२,६-४ असा पराभव केला. सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली आयोजित कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरु झालेल्या या स्पर्धेत देशभरातून १७५ खेळाडू सहभागी झाले आहेत .

# खुल्या गटात स्वराज्य व रुक्माई स्पोर्टस् क्लबला विजेतेपद

## ईच्छा भगवंताची परिवार आयोजित अजितदादा चषक जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा : किशोर गटात विघ्नहर्ता व रुक्माई स्पोर्टस क्लबची बाजी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

अजितदादा चषक जिल्हा निवड चाचणी व अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात स्वराज्य स्पोर्ट्स क्लब व महिला गटात रुक्माई स्पोर्टस् क्लबने विजेतेपद पटकाविले. किशोर गटात विघ्नहर्ता स्पोर्टस् क्लब व किशोरी गटात रुक्माई स्पोर्टस क्लबने बाजी मारली.

लिमयेवाडी येथील शंकर भवन येथे झालेल्या अंतिम सामन्यात पुरुष गटात स्वराज्यने श्रीकृष्ण स्पोर्ट्स क्लबला हरविले. महिला गटात रुक्माई स्पोर्टस्ने श्रीराम स्पोर्टस् क्लबला नमविले. किशोर गट मुलांच्या स्पर्धेत विघ्नहर्ता स्पोर्ट्स क्लबने श्रीराम तरुण मंडळावर विजय मिळविला. किशोरी मुलींच्या गटात रुकमाई स्पोर्ट्स क्लबने युनिक पब्लिक स्कूलला पराभूत केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ईच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्था, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि नगरसेवक नागेश गायकवाड मित्र परिवाराच्या वतीनं सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने आयोजित केली होती. पारितोषिके आमदार देवेंद्र कोठे, सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोदजी हिंदूराव, ईच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी सोलापूर ग्रामीणचे अध्यक्ष उमेश पाटील, शहर जिल्हा अध्यक्ष संतोष पवार, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, मोनिका देवेंद्र कोठे, शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान, शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, माजी महिला बालकल्याण समिती सभापती अश्विनी चव्हाण, शिवसेना शहराध्यक्ष सचिन चव्हाण, माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी स्थायी समिती सभापती देवेंद्र भंडारे, माजी नगरसेवक तौफिक शेख, गुरुशांत दुत्तरगावकर, गामा पैलवान, सोलापूर महानगरपालिकेचे नगर अभियंता सारिका अकुलवार, हाजी मलंग शेठ, अप्पा रोडगे, माजी नगरसेवक पैगंबर शेख, आनंद मुस्तारे, ॲडव्होकेट सुशील सरवदे, माजी नगरसेविका संगीता जाधव, इरफान शेख, करेप्पा जंगम, नारायण माशाळकर, किरण माशाळकर, सुहास कदम, वैभव गंगणे, अमीर शेख आदींच्या उपस्थितीत देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुले यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांनी आभार मानले.

## महत्त्वाचे...

### ‘फॅबटेक’च्या विद्या आलदर यांची बृहन्मुंबई महापालिकेत इंजिनिअरपदी निवड

**सांगोला, दि.२६ जुलै-**

फॅब्टेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील माजी विद्यार्थिनी व गौडवाडी (ता.सांगोला) येथील विद्या पांडूरंग आलदर यांची बृहन्मुंबई महापालिकेच्या वतीने सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सरळ सेवा भरती परीक्षेत उत्तीर्ण होऊन बृहन्मुंबई महापालिकेत क्लास टू इंजिनिअर पदी निवड झाली असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ.अमित रूपनर यांनी दिली. सध्या त्या खंडाळा (जि. सातारा) येथील जिल्हा परिषद ग्रामिण पाणीपुरवठा विभाग येथे २०२४ पासून कार्यरत आहेत. या निवडीबद्दल फॅब्टेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ.विद्यारणी क्षीरसागर, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.धनंजय शिवपुजे, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.शिवानंद माळी, प्रा. शरद आदलिंगे, आई रुक्मिणी आलदर, भाऊ अजय आलदर, विजय आलदर यांनी विद्या आलदर यांचे अभिनंदन केले.





### पोलीस अधिक्षकांकडून एकता महिला मंचचा सन्मान

**सांगोला, दि.२६ जुलै-**

पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी व उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या हस्ते एकता महिला मंच (बार्शी तालुका) यांचा सन्मान करण्यात आला. बार्शी शहर पोलीस ठाणे, तालुका ग्रामीण पोलीस स्टेशन व पांगरी पोलीस स्टेशन आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. २०२५ आषाढी वारी निमित्त पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या संकल्पनेतून आषाढी वारी हरित वारी हा उपक्रम राबवण्यात आला होता. यावेळी माजी पोलीस उपविभागीय अधिकारी नानासाहेब कदम, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत काटकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा सत्कार पार पडल. एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर, प्रभावती साबळे, लक्ष्मी सुतार पल्लवी भालेराव, नुरजहा शेख स्वाती सातपुते, जास्मिन शेख, स्वाती चौधरी, पूजा भोसले, प्रिया गाटे, रोहिणी मस्के,पदमजा बनसोडे, सविता गाटे, सारिका मुंबरे, निर्मला साळुंखे, शीला साबळे, रेश्मा करंडे, वनमाला कोळी, रत्नमाला कोळी, मैनाबाई जाधव, स्वाती मते, कांचन सातपुते उपस्थित होते.



### बार्शीकरांच्यावतीने कारगील विजय दिनानिमित्त जवानांना अभिवादन

**सांगोला, दि.२६ जुलै-**

२६ जुलै रोजी भारत कारगिल विजय दिवस, शौर्य दिवस म्हणून साजरा केला जातो. बार्शीतील शहीद जवान स्मारक येथे कारगिल युद्धातील शूरवीर जवानांना आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी मा. आ. राजेंद्र राऊत, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, नगर अभियंता विवेक देशमुख, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, लाडू शिंदे, भैय्या बारंगुळे उपस्थित होते.



### महात्मा फुले कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक

**टेंभुर्णी, दि.२६ जुलै-**

खरीप हंगामासाठी बियाण्यांवर बीज प्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे आहे याच विषयाचा आधार घेत महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज टेंभुर्णीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये बीज प्रक्रिया या विषयावर प्रात्यक्षिक पूर्ण केले. बीज प्रक्रिया म्हणजे बियाणे पेरणीपूर्वी बियाण्यांवर प्रक्रिया करणे, बियाणे निवडणे, स्वच्छ करणे, औषध फवारणी करणे याचा यामध्ये समावेश होतो. बीज प्रक्रिया केल्यामुळे बियाण्यांची चांगली उगवण क्षमता, पिकाचे कीड व रोग यांच्यापासून संरक्षण, निरोगी पीक व त्यामुळे मिळणारे चांगले उत्पन्न याबद्दल सर्व माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. बियाणे प्रक्रिया करताना हाताला ग्लोव्हज आणि तोंडाला मास्क लावावा. बियाणे प्रक्रिया केलेले बियाणे खाण्यासाठी वापरू नये, ते विषारी असू शकतात, रासायनिक बुरशीनाशकांचा वापर व बीज प्रक्रिया केल्यानंतर हात व्यवस्थित धुणे याबाबतीत बीज प्रक्रिया करताना काळजी घेण्याबद्दल विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. बीज प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी भुईमुग व ज्वारी या दोन पिकांवर बीज प्रक्रिया केली. त्यामध्ये बुरशीनाशक, कीटकनाशक व जैविक खतांचा वापर करण्यात आला. भुईमुगासाठी रायझोबियम तर ज्वारीसाठी एझाटोबॅक्टर या जैविक खताची प्रक्रिया करून शिक्षक व विद्यार्थी यांनी वेगवेगळी पिके व त्यावर केली जाणारी बीज प्रक्रिया यावर चर्चा केली. प्रमोद ननवरे यांनी विद्यार्थ्यांना बीज प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती दिली, ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, विद्यालयाचे प्राचार्य विजय यादव, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शोएब बागवान यांनी सहकार्य केले.

# नगरपरिषदेच्या ५६ कर्मचाऱ्यांना अडीच कोटी मिळणार

### • सेवानिवृत्तांना उपदानाची रक्कम अदा होणार; अॅड वाळुजकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जुलै -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवृत्त झालेल्या ५६ सफाई कर्मचारी, लिपिक, शिपाई यांना उपदानाची रक्कम रुपये २ कोटी ४२ लाख, रजा वेतनाची रक्कम रुपये १ कोटी ७० लाख देण्यात देण्यात यावी, अशी मागणी केली होती. ती मान्य करण्यात आली असून दोन दिवसात रक्कम देण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी आश्वासन दिले असल्याची माहिती कामगार संघटनेचे जनरल सेक्रेटरी अॅड. सुनील वाळुजकर यांनी दिली.

या संदर्भात माहिती देताना अॅड. वाळुजकर यांनी सांगितले की, पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटना इंटकच्या वतीने नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रोकडे, उपमुख्याधिकारी रवींद्र सूर्यवंशी यांच्यासमवेत




बैठक आयोजित केली होती. यावेळी आपल्यासह कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव आदापुरे, कार्याध्यक्ष नानासाहेब बाघमारे, उपाध्यक्ष संतोष सर्वगोड, धनाजी वाघमारे, दिनेश साठे, जयंत पवार, सतीश सोलंकी व इतर पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. मुख्याधिकारी रोकडे यांनी सकारात्मक भूमिका घेत उपदानाची रकम रुपये २ कोटी ४२ लाख देण्याचे मान्य केले आहे. तसेच उर्वरित रजा वेतनाची रक्कम लवकरच देण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच जे सफाई कर्मचारी, शिपाई, कर्मचारी सॅनिटरी इन्स्पेक्टर, इंजिनीअर ग्रॅज्युएट उच्च शिक्षण घेतलेल्यांना त्यांच्या शिक्षणानुसार कामे देण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला. पंढरपूर नगरपरिषद कर्मचारी पतसंस्था नंबर १ याचे सुमारे ६० ते ७० लाख रुपये नगरपरिषदेने दिलेले नव्हते. त्या देय रकमा देण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. मलेरिया विभागाकडील रिक्त पदावर गेले अनेक वर्षांपासून कर्मचारी कंत्राटी पद्धतीने काम करीत आहेत. या कर्मचाऱ्यांना या रिक्त पदावर सामावून घेण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. सदरची पदांची भरती करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी कामगार संघटनेचे सहकार्याध्यक्ष शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, उपाध्यक्ष जयंत पवार, धनाजी वाघमारे, संतोष सर्वगोड, दत्तात्रय चंदनशिवे, चेतन चव्हाण, अनिल अभंगराव, संजय वायदंडे, महाबीर कांबळे, दिनेश साठे, प्रीतम येळे, मोहन अधटराव, संजय माने, पराग डोंगरे, संदेश कांबळे, संभाजी देवकर, दर्शन वेळापुरे, संजय माने, राणी गायकवाड आदी उपस्थित होते.

#### सफाई कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य विमा पॉलिसी

सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी वर्षातून दोनदा आरोग्य शिबिरही घेण्यात येणार आहेत. कामगार वस्तीवर लायब्ररी व ओपन जीम ही करण्याची कार्यवाही लवकर करण्यात येईल. कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा काढण्यात येणार असून वातील ५० टक्के होणारी रक्कम नगरपरिषद व ५० टक्के रक्कम कर्मचाऱ्यांकडून घेण्यात येणार आहे. जेणेकरून किमान पाच लाखापर्यंत कोणताही आजार झाला तर त्याचा खर्च विमा कंपनी उचलेल.

## बार्शीतील व्यक्तीची १७ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२६ जुलै-**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली १० टक्के व्याजाचे आमिष दाखवून बार्शीतील एका व्यक्तीने आपल्या मित्रांसह मिळून ३० लाख रुपये गुंतवले. यापैकी १३ लाख रुपये परत मिळाले. मात्र उर्वरित १७ लाख रुपये परत न देणाऱ्या गडहिंग्लज येथील राजेंद्र शिवाजी गुंडप यांच्याविरुद्ध बार्शी पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी चंद्रसेन धन्यकुमार गुळवे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

चंद्रसेन गुळवे (वय ४९, रा. सुभाषनगर, बार्शी) हे लातूर येथील गणेश बेकरीत मॅनेजर म्हणून काम करतात. त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, जानेवारी २०२२ मध्ये कोल्हापूर येथे कामानिमित्त असताना त्यांची ओळख राजेंद्र गुंडप (रा. साधना हायस्कूलजवळ, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) यांच्याशी झाली. गुंडप यांनी शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करुन दरमहा १० टक्के व्याज देण्याचे आश्वासन दिले. इतर लोकांकडून गुंडप यांच्या विश्वासार्हतेची माहिती मिळाल्याने गुळवे यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला. गुंडप यांनी आपल्या मोबाइलवर शेअर मार्केटचे ट्रेंडिंग आणि नफा दाखवून गुळवे यांचा विश्वास संपादन केला. फेब्रुवारी २०२२ मध्ये गुळवे यांनी गुंडप यांना बार्शी येथे बोलावून ३ लाख रुपये रोख दिले. यानंतर गुंडप यांनी दरमहा ३० हजार रुपये व्याज देण्यास सुरुवात केली, ज्यामुळे गुळवे यांचा विश्वास वाढला. यानंतर गुळवे यांनी आपले मित्र रविंद्र बन्सी करपे आणि परमेश्वर अंधारे यांना याबाबत माहिती दिली. दोघांनीही गुंतवणूक करण्यास सहमती दर्शवल्याने गुळवे यांनी त्यांची गुंडप यांच्याशी भेट घडवून आणली. यावेळी करपे यांनी ६ लाख रुपये आणि अंधारे यांनी ५० हजार रुपये रोख स्वरुपात पांडे चौकातील एका हॉटेलमध्ये गुळवे यांच्या हस्ते गुंडप यांना दिले. यानंतर गुंडप यांनी काही महिने ६५ हजार रुपये व्याज दिले. करपे यांचा विश्वास वाढल्याने त्यांनी वेळोवेळी ५ लाख, ७० हजार याप्रमाणे एकूण २० लाख रुपये रोख आणि ऑनलाइन स्वरूपात गुळवे यांच्यामार्फत गुंडप यांना दिले. अंधारे यांनीही अतिरिक्त ५० हजार रुपये दिले. यापैकी ७ लाख रुपये गुंडप यांच्या गडहिंग्लज येथील आय.सी.आय.सी.आय. बँक खात्यात २६ एप्रिल २०२२ ते ६ ऑगस्ट २०२२ दरम्यान ऑनलाइन पाठवले गेले, तर १३ लाख रुपये रोख स्वरुपात येथे दिले गेले. अशारीतीने गुळवे यांचे ३ लाख, करपे यांचे २६ लाख आणि अंधारे यांचे १ लाख असे एकूण ३० लाख रुपये गुंडप यांच्याकडे गुंतवले गेले. गुळवे यांनी २५ जुलै २०२५ रोजी बार्शी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीत म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२२ ते डिसेंबर २०२३ दरम्यान गुंडप यांनी विश्वासघात करुन १७ लाखांची आर्थिक फसवणूक केली. पोलिसांनी गुंडप यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन तपास सुरु केला आहे. पोलीस निरीक्षक यांनी सांगितले की, गुंडप यांचा शोध घेण्यासाठी पथक रवाना करण्यात आले असून, बँक खात्याच्या व्यवहारांचीही चौकशी केली जाईल.

## ‘कर्मयोगी’च्या २० विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जुलै-**



कर्मयोगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (अभियांत्रिकी) महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनियरिंग विभागातील आठ तर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील बारा अशा वीस विद्यार्थ्यांची मुलाखतीमधून कंपनीमध्ये निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांनी दिली.

पुणे येथील शाफ्लर इंडिया प्रा. लि. या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखातीमधून मेकॅनिकल इंजिनियरिंग विभागातील प्रथमेश बिनवडे, आकाश खंदारे , गौरव लांडगे, प्रतीक क्षीरसागर, ओम मुंडे, निलेश केसकर, संतोष माने, शिवलिंग सूर्यवंशी यांची तर एपिटॉम कोम्पोनंट्स प्रा. लि. या कंपनीने इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील काशीनाथ आंदेवाडी, प्रदीप पाटील, प्रज्ञा पाटील, आकांक्षा गायकवाड, प्राची भाग्यवंत, प्रतीक्षा पवार, आकांक्षा पाटील, स्वामींनी चव्हाण, वैभव गायकवाड, आविष्कार चव्हाण, सूरज डोके, अनिकेत सातपुते या विद्यार्थ्यांची निवड केली आहे. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ.पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजीस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मोहसीन शेख, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, विभागप्रमुख डॉ. एस.एम. लंबे, डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. अनिल बाबर, प्रा. दीपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समन्वयक विद्यासागर जगताप, प्रा.सुशील कुलकर्णी, प्रा.दत्तात्रय चौगुले, प्रा.योगेश माने व इतर सर्व प्राध्यापक यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### तोल जाऊन पडल्याने जखमी

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

कुमठा नाका परिसरातील यशवंत गृहनिर्माण संस्था, स्वागत नगर येथील घराजवळून पायी जाताना अचानक तोल जाऊन पडल्याने तरुण जखमी झाला. हा प्रकार ११.३० वाजता घडला. पवन महेश कोनापुरे (वय २४, रा. कुमठा नाका, सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे.

पवन हा शुक्रवारी सकाळी ११.३० च्या सुमारास राहत्या घराच्या परिसरात पायी चालत जात होता. त्यावेळी अचानक तो तोल जाऊन पडला. यात त्यांच्या डोक्याला जखम झाल्याने दुपारी ३ वाजता श्रीकांत कोनापुरे यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. हा प्रकार ११.३० वाजता घडला.

## सचिवांच्या निर्णयानंतरच पशूसंवर्धन होणार वर्ग

### कार्यपध्दतीविषयी संभ्रमावस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

पशूसंवर्धन, अर्थ आणि ग्रामविकास विभागाच्या सचिव पातळीवरील बैठकीनंतरच जिल्हा पशूसंवर्धन विभाग राज्य सरकारकडे वर्ग करण्यात येणार आहे. सीईओ कुलदीप जंगम यांनीही वरीष्ठांच्या मार्गदर्शनानंतर पशूसंवर्धन विभाग वर्ग करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर पशूसंवर्धन सरकारकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

राज्य सरकारने यापूर्वी कृषी विभागाचे वर्गीकरण करून जिल्हा परीषद कृषी विभागाकडे मर्यादीत अधिकार दिला आहे. कृषी विभागाकडे कृषीच्या केवळ तीनच योजना असल्याने या विभागात शुकशुकाट दिसून येत आहे. त्यानंतर जून महिन्यापासून जिल्हा परीषद पशूसंवर्धन विभागाचे राज्य सरकारकडे वर्गीकरण करण्याचे आदेश काढले असून पशूसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. विशाल येवले यांनी पदभारही स्वीकारला आहे.

मात्र जिल्हा परीषदेकडून पशूसंवर्धन विभाग हस्तांतर करण्यात आला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कार्यपध्दती व पशूसंवर्धन विभागावरील नियंत्रणाबाबत वरीष्ठांकडे मार्गदर्शन मागविला आहे. त्यानंतरच पशूसंवर्धन वर्ग होणार आहे. उपायुक्त डॉ. येवले यांनीही पदभार स्वीकारल्यानंतर वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरच कामकाज करणार असल्याचे सांगितला आहे. त्यामुळे दोन्ही विभागाच्या संभ्रमावस्थेत पशूसंवर्धन विभागाचे वर्गीकरण रखडला आहे.

#### वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शनाची गरज



जिल्हा परीषद पशूसंवर्धन विभाग राज्य सरकारकडे वर्ग करण्याविषयी पत्र मिळाला आहे. मात्र या विभागाची कार्यपध्दती व त्याच्यावर नियंत्रण याबाबत संभ्रम असल्याने वरीष्ठ अधिकार्यांकडे मार्गदर्शन मागविण्यात आला आहे. पशूसंवर्धन विभाग वर्ग करण्यात येईल.

**- कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी**



### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

वळसंग ते लिंबीचिंचोळीच्या दिशेने जाताना हॉटेल वळसंगवाडापासून दोनशे मीटर अंतरावर पाठीमागून आलेल्या चारचाकी वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घडला. सूर्यकांत मल्हारी भुसनगी (वय ४७, रा. वळसंग ता द सोलापूर) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. सूर्यकांत हे शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास दुचाकीवरून वळसंग येथून लिंबीचिंचोळी येथे जात होते. गावातून काही अंतर गेल्यानंतर ते चालवित असलेल्या दुचाकीला पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाच्या चालकाने धडक दिली. यात उजव्या हाताला आणि डाव्या पायाला मार लागल्याने रुगणवाहिकेतून त्यांना शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी केला अभ्यास

**सोलापूर, दि.२६ जुलै-**

वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दररोजच्या आहाराच्या निवडी दीर्घकालीन आरोग्यावर कसा परिणाम करतात याचा सखोल अभ्यास केला. फिजिशियन्स कमिटी फॉर रिस्पॉन्सिबल मेडिसिन येथील डॉ. झीशान अली यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या संवादात्मक सत्रात विद्यार्थ्यांनी वनस्पती-आधारित आहाराच्या पुराव्यांचा अभ्यास केला, जो मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदय रोगांसारख्या सामान्य आजारांच्या प्रतिबंध व व्यवस्थापनासाठी प्रभावी उपाय ठरू शकतो. तज्ज्ञ डॉ. अली यांनी २१० पेक्षा जास्त विद्यार्थी व प्राध्यापकांना संबोधित करत भावी डॉक्टरांना क्लिनिकल केअरमध्ये पोषणाचे समावेश करण्याचे आवाहन केले.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर महानगरपालिका, सोलापूर शहर हद्दीतील कुमठा नाका येथील मदर इंडिया झोपडपट्टी मधील म्युनिसीपल घर नंबर ६४, यांसी यांसी सो.म.पा मिळकत क्र. ०७०७६०२८७६, यांसी एकूण क्षेत्रफळ १३५ चौ. फूट इतकी असून या वर्णनाची घरजागा व यातील तंदगभूत वस्तूसह.

ज्याअर्थी वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही मूळतः मोगलय्या गौरय्या भंडारी यांच्या कब्जे वहिवाटीची होती. आमचे अशिल रुक्मिणीबाई मोगलय्या भंडारी यांचे मोगलय्या गौरय्या भंडारी यांचे ता. १२/०३/२०२२ रोजी निधन झाले आहे. वर नमूद मिळकतीचे मयताच्या पश्चात आमचे अशिल रुक्मिणीबाई मोगलय्या भंडारी हेच वारसदार आहेत. तरी नमूद केलेल्या मिळकतीच्या ग.व.सु,च्या कर आकारणी दप्तरी मयत मोगलय्या गौरय्या भंडारी यांचे नाव कमी करून आमचे अशिलांची नावाची नोंद करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना विशेषतः जिल्हा सोलापूर शहर सोलापूर लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर ०३ दिवसांचे आत मयत मोगलय्या गौरय्या भंडारी यांचे वारसदारांचे नावे वर नमूद मिळकतींस नोंद करण्यासाठी कोणाचीही व कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास याखाली नमूद विधिज्ञ यांचे पत्त्यावर लेखी स्वरूपात पुराव्यानिशी सादर करावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २५/०७/२०२५

सही/-
अॅड. दिपाली बी. मडूर
बी.ए., एल.एल.बी.
पद्माई निवास, प्लॉट नं. ३३,
आदर्श नगर, सोलापूर ९८२३४३०२२२
अशिलातर्फे अॅडव्होकेट

दि.कि. अर्ज नं. ३६/२०२५
निशाणा न. ५

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**बार्शी येथील मे.सि.ज.ज्यु.डी. सो यांचे कोर्टात**

१) **नवनाथ भिमाशंकर घोंगडे**
वय-६६ वर्षे, धंदा-शेती
रा. सुभाष नगर, बार्शी, ता. बार्शी जि.सोलापूर.
२) **सोमनाथ भिमाशंकर घोंगडे**
वय-६९ वर्षे, धंदा-शेती रा.सदर.
३) **पार्वती शिवाजी साखरे**
वय - ७९ वर्षे, धंदा-शेती रा.सदर.
— **अर्जदार**

विरुद्ध

**कोणी नाही**

**अर्ज-भारतीय पुरावा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे**

ज्या अर्थी यातील अर्जदार नं १ ते ३ यांना मयत बहिण काशीबाई हनुमंत वैद्य (लग्नापूर्वीचे नाव काशीबाई भिमाशंकर घोंगडे) ह्या असून, काशीबाई हनुमंत वैद्य ह्या दि. २०/१०/२०२४ रोजी शैलजा हॉस्पिटल बार्शी येथे मयत झालेल्या आहेत. त्यांचे पश्चात त्यांचे पती नामे हनुमंत नीलकंठ वैद्य हे देखील दि. १७/१२/२०२३ रोजी मयत झाले आहेत. यातील मयत नामे काशीबाई हनुमंत वैद्य (लग्नापूर्वीचे नाव काशीबाई भिमाशंकर घोंगडे) यांचे त्यांच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा बार्शी शाखा अधिकारी यांनी अर्जदार नं १ ते ३ यांना वारसप्रमाण पत्र आणायला सांगितल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कुणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधितानी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमलेले तारखेस ३०/९/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः व वकीलामार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रार, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश होतील. दि. २४/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

**मध्य रेल्वे**

**पुरवठा, स्थापना आणि विविध इतर कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस अँड टी), पहिला मजला, पार्सल ऑफिस बिल्डिंग, पी.एफ. क्रमांक १३ जवळ, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-४०००१, भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने आणि त्यांच्या वतीने प्रतिष्ठित कंत्राटदारांकडून **ई-निविदा** (खुली निविदा) आमंत्रित करत आहेत. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ २९/०८/२०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. **कामाचे नावः** भारतीय रेल्वेवरील एकात्मिक संप्रेषण कणासाठी मध्य रेल्वेच्या मुंबई, पुणे, सोलापूर, भुसावळ आणि नागपूर विभागातील विविध स्थानकांवर आयपी-एमपीएलएस नेटवर्क उपकरणांचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे. **अंदाजे किंमतः ७५३१००९७४.७२. ईएमडीः ३९१५५००/-.** बंद होण्याची तारीख आणि वेळः १५.०० तास. २९/०८/२०२५ रोजी. वैधताः ९० दिवस. पूर्ण **कालावधीः १२ महिने.** शुद्धीपत्रकासह निविदांची संपूर्ण माहिती भारतीय रेल्वेच्या अधिकृत वेबसाइट www.ireps.gov वर उपलब्ध आहे. संपूर्ण निविदा कागदपत्रे वेबसाइटवरून डाउनलोड करता येतील. निविदांची संपूर्ण माहिती विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस अँड टी) कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई- ४०० ००१ च्या नोटीस बोर्ड मध्ये देखील उपलब्ध आहे. **ही निविदा सार्वजनिक खरेदी धोरण आदेश २०१७ दिनांक १५/०६/२०१७ सह संकलित केली आहे.**

**ओपन ई-निविदा सूचना क्रमांकः**CR-BB-SNT-P-TELE-2025-39 Sai/307

**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**

## महत्त्वाचे...




### महावीर हायस्कूलमध्ये नागपंचमी सणानिमित्त मार्गदर्शन

**सोलापूर, दि, २६ जुलै-**

विकास नगर येथील महावीर हायस्कूल येथे नागपंचमी सणानिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मधूरा सलवारु यांनी मार्गदर्शन केले.आपल्या मार्गदर्शनात त्यांनी साप, सापांचे प्रकार त्यांच्या विविध जाती, त्यांच्या शरीराची रचना, त्यांच्या क्षमता, साप आणि निसर्ग यांचा परस्पर संबंध या बद्दल सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला पाटील होत्या. यावेळी पर्यावरण संरक्षण जागृती प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन सहशिक्षक बसवराज बिराजदार यांनी केले.



### शहा कोठारी प्रशालेत सायबर गुन्ह्यावर व्याख्यान

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये विद्यार्थी सुरक्षा अंतर्गत सायबर गुन्हे व पोक्सो कायदा या विषयावर सायबर तज्ञ अविनाश पाटील, सचिन अंबलगी व अश्विनी लोणी यांचे व्याख्यान झाले. मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी सायबर तज्ञ पाटील यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करतांना कोणती काळजी घ्यावी. ऑनलाइन दुनियेत आपण इंटरनेटचा वापर कसा केला पाहिजे सायबर गुन्हे कशाला म्हणतात या विषयी मार्गदर्शन केले. अंबलगी यांनी पोक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन केले. आपल्यावरील अत्याचार बिनधास्तपणे निदर्शनास आणून देण्याचे सांगितले. लोणी मॅडम यांनी सायबर गुन्ह्यातील कलम आणि शिक्षा याविषयी मार्गदर्शन केले. आपली झालेली फसवणूक किंवा आपल्याला होणारे त्रास असतील तर आपण आई वडील, शिक्षक व पोलिस स्टेशनच्या निदर्शनास आणून देण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन एस. एम. बगले यांनी केले. माने ए. एस. यांनी आभार मानले.



### दमाणी प्रशालेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**सोलापूर, दि. २६ जुलै-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी-२०२५ मध्ये झालेल्या ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत बी.एफ. दमाणी प्रशालेतील १४ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सृष्टी निकम, आराध्या उंबरे, श्रीराम मोरे, स्वराज घाळे, विधय बिराजदार, अनुप लंगोटे यांनी तर आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत श्रेया जाधवर, रिद्धी पट्टणशेट्टी, रणधीर ढोले, सृजन तापडिया, प्राची काकडे, समीक्षा निकम, रणवीर ढोले, वर्धन दरगड या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. या विद्यार्थ्यांना समीर कुलकर्णी, गणेश म्हमाणे, लक्ष्मण दळवी, श्रीराम फुलारी, प्रभानंद पाटील व संगीता जहागीरदार यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे स्थानीय अध्यक्ष कालीदास जाजू, सचिवा मंगल काबरा, सहसचिव उज्वल तापडिया, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, पर्यवेक्षक राहुल इंगळे आदींनी अभिनंदन केले.




### अक्कलकोटमधील श्री स्वामी समर्थ आयटीआय मध्ये कारगिल विजय दिन

**अक्कलकोट दि.२६ जुलै-**

येथील श्री. स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कारगिल विजय दिवसानिमित्त शूरवीरांना आदरांजली वाहण्यात आली. शिल्प निदेशक दिनेश मंठाळे यांनी प्रास्ताविक केले. निदेशक एम.जी.नदाफ यांनी स्वागत केले. यावेळी माजी सैनिक श्री. लोडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रशिक्षणार्थींनी आपल्या मनोगतामध्ये शूरवीरांची गाथा सांगितली. प्रा. अभिजीत लोके यांनी आपल्या व्याख्यान मध्ये अखंड देशाकरिता अनेक शूरवीर शहीद झाले. आपल्या देशावर परकीयांचे आक्रमण अनेक वेळा झाले असता त्या आक्रमणांना विरोध करून अनेक ऐतिहासिक लढाया जिंकून देशाचे संरक्षण शूरवीरांनी केले या सर्व गोष्टींची स्मरण प्रशिक्षणार्थींना करून दिले. संस्थेतील निदेशक नदाफ, श्री मंठाळे,श्री बिराजदार, गवल त्याचप्रमाणे सर्व प्रशिक्षणार्थींनी परिश्रम घेतले.

# शहर-जिल्ह्यात सर्वदूर संततधार

### खरिपाच्या पिकाला अमृतसंजीवनी

### शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

महाराष्ट्रात सध्या जोरदार पाऊस सुरु आहे. मुंबई उपनगरात संततधार तर विदर्भात ढगफुटीसारखा पाऊस पडत आहे. यामुळे अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली असून, काही ठिकाणी रस्ते बंद झाले आहेत आणि काही भागात जीवितहानी होत आहे. दरम्यान, २ दिवसांपासून सोलापूर शहर-जिल्ह्यात झालेल्या सर्वदूर संततधार पावसामुळे शेतीला दिलासा मिळाला आहे. खरिपातील पिकांनी अक्षरशः माना टाकल्या होत्या; अशा पिकांना हा पाऊस पोषक ठरला असून, शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मे महिन्याच्या अवघ्या १५ दिवसात जिल्ह्यात २३० मिमी असा ऐतिहासिक पाऊस झाला तर जून-जुलै महिन्यात अवघ्या ९४ मिमीची नोंद झाली, हे विशेषच आहे.

महाराष्ट्रात सध्या पावसाचा हाहा:कार पाहायला मिळत आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून सक्रिय झाला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सोलापूर हरातही आज (दि. २६) दिवसभर पावसाची रिपरिप असल्याने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले. आभाळी वातावरणामुळे आज सुर्यदर्शनच झाले नाही. शालेय विद्यार्थी अन् चाकरमान्यांचेही हाल झाले. तर वाहनधारकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागली. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात या आठवड्यात अधूनमधून पाऊस पडत आहे. गेल्या २ दिवसांपासून संततधार आहे. यामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. सध्या काळ्या ढगांनी आकाश भरून आले असून, आजही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, पावसाच्या अनियमिततेमुळे राज्यातील बळीराजा मात्र कमालीचा अडचणीत येत आहे.

# बोरीउमरगेत यल्लालिंग महाराज जीवन चरित्र कथा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ जुलै-**

श्रीक्षेत्र बोरी उमरगे (ता. अक्कलकोट) येथे श्री सिध्दलिंग शिवयोगी कन्नूर गुरु मठात श्रावण महिन्यात २५ जुलै ते २४ ऑगस्टपर्यंत महाचैतन्य मुघोळखोड श्री यल्लालिंग महाराज यांच्या जीवन चरित्र पुराण सुरू करण्यात आल्याची माहिती गुरु मठाचे मानकरी सिध्दलिंग पाटील यांनी दिली.




वे.ईरय्या स्वामी मठपती यांच्या अमृतवाणीतून, हार्मोनिक लक्ष्मण लंपट्टी व तबलावादक लक्ष्मुपुत्र बिराजदार यांच्या साथसंगतीने दररोज संध्याकाळी ७ ते रात्री १० पर्यंत कथा आहे. गोपाळ पाटील नंदी बसवण्णा रूपात सेवा करीत असून तीपण्णा पाटील, विठ्ठल पाटील, विरक्तानंद पाटील, मल्लिनाथ पाटील, अशोक पाटील, सिध्दलिंग सलगरे, चंद्रकांत वागदरे सह महिला वर्ग बारा अभंग व भजन कार्यक्रमांची सेवा बजावत आहे. परंपरेनुसार गेल्या तीन पिढ्या पासून पाटील परिवार श्रावण महिन्यात पुराण कार्यक्रम करत आहेत. श्रीचे दर्शन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन गुरुनाथ पाटील, चिदानंद पाटील यांनी केले आहे.

# हजरत पीर शेख मदारशाह कादरी (रहे.) यांच्या उरुसाला उद्यापासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

जेऊर (ता. अक्कलकोट) येथील हजरत पीर शेख मदारशाह कादरी, अतिकी, अलकदिरी (रहे.) यांचा २५ वा उरुस सोमवार दि. २८ जुलैपासून सुरू होत आहे.

हलकट्टा शरीफ येथील हजरत साहेब कदिरी, यांचे जानशीन हजरत ख्वॉजा सय्यद अबुतुराबशाह कादरी, चिश्ती, यमनी, बंदानवाजी, तुराब कादरी यांच्या असिम कृपाशिर्वादाने जेऊर (अक्कलकोट स्टेशन रोड) येथील हजरत पीर शेख मदारशाह कादरी, अतिकी, अलकदिरी (रहे.) यांचा उरुस सोमवार, दि. २८ जुलै २०२५ पासून प्रारंभ होत आहे. सायंकाळी ७ वा. गावातील हजरत राजेबागसवार दर्गाहपासून संदल शरीफ (गंध) ची मिरवणूक निघणार असून प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत संदलचा कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच रात्री १० वाजता सोलापूर येथील प्रसिद्ध मुन्ना कव्वाल यांचा कव्वालींचा कार्यक्रम होणार आहे. मंगळवार, दि. २९ जुलै मंगळवार रोजी चिरागाँ (दिपोत्सव) व महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. बुधवार, दि ३० जुलै रोजी सकाळी ८:३० वाजता जियारत व



फातेहाखानी होऊन महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व हिंदू-मुस्लिम भाविकांनी वरील कार्यक्रमास उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे जानशीन हजरत महिबुबशाह कादरी खलिफा-ए-हजरत साहेब कदिर यांनी कळविले आहे.

# अरण ग्रामप्रदक्षिणेनंतर श्री विठ्ठल पालखी पंढरपूरकडे

### गिड्डेवाडी येथे पादुका पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब,दि.२६ जुलै-**

भक्ती, भाव आणि भगवंताच्या स्मरणात रंगलेल्या अरण (ता. माढा)येथे रविवारी एक भावस्पर्शी सोहळा संपन्न झाला. श्री विठ्ठल व संत सावता महाराजांच्या पालखीची ग्रामप्रदक्षिणा पार पडली. टाळ-चिपळ्यांच्या गजरात, जय जय रामकृष्ण हरीच्या भक्तिगीतांत आणि अभंग गायनात दंग झालेल्या वारकरी भाविकांनी आपल्या लाडक्या पांडुरंगास गावाच्या शिवेपर्यंत चालत नेऊन, अश्रुपूर्ण डोळ्यांनी निरोप दिला.

भक्तीने फुललेल्या मळ्याला देवाने आपल्या नेत्रांमध्ये साठवून घेतले. दुपारी बारा वाजता देव परतीच्या प्रवासासाठी पंढरपूरकडे निघाले. परतीच्या प्रवासात गिड्डेवाडी शिवारात पालखी



दाखल होताच फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत झाले. पालखीच्या स्वागतासाठी गावातील महिलांनी रांगोळ्या काढल्या, तर अनेकांनी तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन सहभाग नोंदवला.श्री विठ्ठल पालखीवर ग्रामस्थांकडून पुष्पवृष्टी करण्यात आली.यावेळी गिड्डे यांना मान असतो. श्री विठ्ठल पादुकांना श्री.दत्तात्रय शंकर गिड्डे कुटुंबियांच्या वतीने दुग्धाभिषेक व पूजा करण्यात आली. पांडुरंग परमात्म्यांच्या पादुकांचे विधिपूर्वक पूजन करण्यात आले. यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी विष्णु गिड्डे, मोडनिंब रोटरी क्लबचे अध्यक्ष निलेश गिड्डे, राजेंद्र गिड्डे, पोपट गिड्डे, अभिमान गिड्डे, महादेव गिड्डे आदी उपस्थित होते. आज पालखीचा आष्टी येथे मुक्काम आहे. उद्या पंढरपूरकडे प्रस्थान करेल.

# उत्तम समाज निर्मितीसाठी दानाचे महत्व मोठे

### उत्तमजी महाराज : संगीतमय शिवपुराण महाकथेस भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

निष्काम भावनेने भुकेल्याला अन्नदान केल्याने मनुष्याला पुण्य लाभते. उत्तम समाज निर्मितीसाठी दानाचे महत्व मोठे आहे, असे प्रतिपादन उत्तमजी महाराज यांनी केले. मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखा आणि राजश्री लड्डा परिवारातर्फे श्रावण मासानिमित्त तुळजापूर वेस येथील माहेश्वरी सांस्कृतिक भवनात आयोजित संगीतमय भव्य महाशिवपुराण कथेमध्ये उत्तमजी महाराज यांनी शनिवारी दुसऱ्या दिवशी मार्गदर्शन केले.

कथेच्या दुसऱ्या दिवशी उत्तमजी महाराज यांनी महाशिवपुराण कथेतील शिवलिंग स्तंभ, भक्त कन्नाप्पा या प्रकरणावर विवेचन केले. उत्तमजी महाराज म्हणाले, भारतीय संस्कृतीत शारीरिक संतुलनासाठी उपवासाचे महत्व सांगितले आहे. उपवासाच्यादिवशी आपल्याला झोप येणार नाही इतकेच खावे. आणि भगवंतांचे नामस्मरण करावे. परंतु उपवासाच्यादिवशी आपण रोजच्या तुलनेत चौपट खातो. हे अयोग्य असल्याचे त्यांनी सांगितले.



सूर्यसंक्रांत, चैत्र नवमी, अश्विन नवमी, सूर्य दक्षिणायन, मकर संक्रांत, सूर्यग्रहण अशा दिवशी केलेले दान अधिक फलदायी ठरत असल्याचेही उत्तमजी महाराज यांनी सांगितले. संतांची सेवा, सत्संगामुळे दानाप्रमाणेच पुण्य मिळते, असे उत्तमजी महाराज म्हणाले. कलियुगात अधर्म वाढला आहे. आपण प्रभू श्रीरामचंद्रांचा आदर्श घेऊन कार्य केल्यास जीवन सफल होईल. भाव, विश्वास आणि श्रद्धा असेल तर भगवंत निश्चित पावतो, असेही उत्तमजी महाराज यांनी सांगितले. याप्रसंगी उत्तमजी महाराज यांनी बेल पत्र, भस्म, रुद्राक्ष, गायीचे तूप यांचे महत्व सांगितले. यावेळी अध्यक्षा राणी होलाणी, कार्यक्रम प्रमुख ज्योती चंडक, सुनिता बजाज, नंदा लाहोटी, शोभा मालू, विजया भैय्या, राजश्री लड्डा, रामेश्वर करवा, गोविंद लाहोटी, गोविंद चंडक, श्रीकांत बजाज, विलास बजाज, श्रीकांत लड्डा, लक्ष्मीकांत लड्डा आदी उपस्थित होते.




### ‘सनराइज’मध्ये कारगिल विजयदिनानिमित्त आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२६ जुलै-**

सनराईज गुरुकुल स्कूलमध्ये कारगिल विजय दिवसानिमित्त शूर जवानांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश तथा बाबाराजे बोबडे, सचिवा सुरजाताई बोबडे, डायरेक्टर शाहिदा पठाण, मुख्याध्यापक प्रभाकर, सनराईज कमांडो ट्रेनिंगच्या माध्यमातूनच्या या कार्यक्रमात मान्यवरांनी अमर जवान ज्योतीला पुष्पचक्र अर्पण केले. सैनिकी पद्धतीने अभिवादन करण्यात आले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी जवानांच्या वेशभूषेत कारगिल विजय दिन साजरा करताना भारतीय सैन्य दलाप्रमाणेच अमर जवान ज्योतीस अभिवादन करत शौर्यवीरांना मानाचा मुजरा दिला. यावेळी कमांडो ट्रेनिंग हेड पंकज मोहिते यांनी माहिती दिली.

# अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा खून केल्याप्रकरणी पत्नीसह चौघांवर गुन्हा दाखल

### मार्च २०२२ मध्ये घडलेली घटना

### न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ जुलै -**

मार्च २०२२ मध्ये कट रचून शेतात नेऊन अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी पांगरी पोलिस ठाण्यात बार्शी न्यायालयाच्या आदेशानुसार तीन वर्षानंतर पत्नीसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.



तुकाराम त्र्यंबक लुंगसे (वय ४३, रा. पुरी, ता. बार्शी) असे खून करण्यात आलेल्यांचे नाव आहे. याबाबत नामदेव त्र्यंबक लुंगसे (वय ४८) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नरसिंग शिवाजी डीडवळ (वय ४५), जनाबाई तुकाराम लुंगसे (वय ३७), शालन शिवाजी डिडवळ (वय ६०), शिवाजी निवृत्ती डिडवळ (वय ६८, सर्व रा. पुरी, ता. बार्शी) यांच्याविरध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत तुकाराम लुंगसे आणि जनाबाई हे पती-पत्नी होते. तर जनाबाई हिचे नरसिंग डिडवळ याच्याशी अनैतिक संबंध होते. ते जनाबाई यांचे पती तुकाराम यांना समजले होते. त्यामुळे अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या तुकाराम याचा कायमचा काटा काढण्याचा कट तुकाराम यांची पत्नी जनाबाई, तिचा प्रियकर नरसिंग डिडवळ व इतरांनी केला होता. तुकाराम यांच्यावर पाळत ठेऊन त्यांचा खून करण्याच्या उद्देशाने पूर्वनियोजित कट रचून १ मार्च २०२२ रोजी रात्री तुकाराम यांना एकट्यास गाठून पुरी येथील शेतात नेऊन पत्नी जनाबाई, नरसिंग व इतरांनी त्यांचा खून केला. तुकाराम यांच्या बनियनवरचे रक्त जनाबाई हिने पाणी ओतून धुवून घालवले. तसेच गुन्ह्यात वापरलेले साहित्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याबाबत तुकाराम यांचे बंधू नामदेव लुंगसे यांनी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात ७१५/२०२२ क्रमांकाने अर्ज देऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्यावर सुनावणी होऊन अखेर बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पांगरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक काटकर पुढील तपास करीत आहेत.

# पंढरपुरातील सराईत वाळू तस्कर पिल्या बंदपट्टे येरवड्यात स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

पंढरपूरातील सराईत वाळू तस्कर पिल्या बंदपट्टे यास जिल्हाधिकारी यांनी एमपीडीएअंतर्गत येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. पिल्या उर्फ गंगाधर नागनाथ बंदपट्टे (रा. महात्मा चौक, संत पेठ, पंढरपूर) असे येरवड्यात स्थानबध्द करण्यात आलेल्या वाळू तस्कराचे नाव आहे.



पिल्या बंदपट्टे हा गंभीर शरीराविषयीचे गुन्हे करून अवैधरित्या वाळु चोरी करणे, ती विक्री करणे सोयीचे व्हावे या करीता दहशत माजवुन वाळुचे कारणावरून जिव घेणे हल्ले करणे तसेच पंढरपूर शहर व पंढरपूर शहरा लगतच्या परीसरातील लोकांना दमदाटी, मारहाण करून, गौण खनिज (वाळु) चोरी करणे असे गुन्हे करायचा. भारतीय न्याय संहिता २०२३ मधीत प्रकरण ६ व १७ मधील अपराधी स्वरूपाची त्याची कृत्ये असून सदरची कृत्ये करण्याची त्यास सवय जडली होती. एक धोकादायक व्यक्ती व वाळु तस्कर म्हणुन त्याने स्वतःला सिध्द केले होते. त्याचे विरूध्द अनेकवेळा गंभीर स्वरूपाचे शरीराविषयीचे तसेच खुनाचा प्रयत्न करणे व अवैध वाळु व्यवसाय बद्दल गुन्हे दाखल होवुन त्यामध्ये अटक करण्यात आली होती. परंतु तो सदर गुन्हयात जामीन मिळवुन त्याने पुन्हा गंभीर शरीराविषयीचे गुन्हे करणे, तसेच अवैध वाळु व्यवसाय अव्याहतपणे सुरूच होता. तो कायदयाला जुमानत नव्हता म्हणुन पिल्या बंदपट्टे याचेविरूध्द पंढरपूर शहर पोलिस ठाण्याकडून महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टी व औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती, द्रकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती, अत्यांवश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती, वाळू तस्कर यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे विषयीचा कायदा सन १९८१ मधिल कलम ३(१) अन्वये स्थानबध्द करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे मार्फतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे पाठविला होता. त्यास जिल्हाधिकारी यांनी मंजूरी दिल्यानंतर पंढरपूर शहर पोलिस ठाण्याचे एक पथक पिल्या बंदपट्टे यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, पंढरपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप, पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक आशिष कांबळे, पोलिस उपनिरीक्षक राजेश गोसावी, सहायक फौजदार कल्याण ढवणे, पोलीस नाईक सचिन इंगळे, शिवाजी पाटील, सिरमा गोडसे, प्रसाद औटी, सचिन हेंबाडे, विठठल विभुते, कपिल माने, शहाजी मंडले, बजरंग बिचकुले, धनाजी मुटकुळे, दिपक नवले, अनिस शेख तसेच रतन जाधव यांनी केली .

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)